# लोकराज्य

मार्च २०१६ / पाने ६० / किंमत ₹१०



## कर्तृत्वाला आधार सामर्थ्याचा

# शिवनेरीवर शिवजन्मोत्सव....





१. शिवकुंज येथील राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केले. यावेळी पालकमंत्री गिरीश बापट, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, गृह राज्यमंत्री राम शिंदे, आमदार शरद सोनवणे, आमदार विनायक मेटे आदी उपस्थित होते.

२. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त किल्ले शिवनेरी गडावर (ता. जुन्नर) शिवजन्मस्थळाच्या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शिवजन्माचा पारंपरिक पाळणा सादर करण्यात आला.

वर्ष ६७ वे | अंक ९ | मार्च २०१६

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग



## सामर्थ्य आहे कर्तृत्वाचे...

लोकसंख्येमध्ये साधारणत: ५० टक्के असलेल्या महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत अनेक निर्णय वेळोवेळी घेण्यात आले आहेत. या निर्णयांचा फायदा राज्यातील महिलांना झाला असून त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे. तसेच त्या विविध क्षेत्रात कर्तृत्वाची नवीनवी शिखरे गाठत आहेत.

६



१८

## मेक इन इंडियात झळकला महाराष्ट्र


महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक भरारीला उभारी देणारा 'मेक इन इंडिया सप्ताह' नुकताच मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलात पार पडला. मेक इन इंडियातून मेक इन महाराष्ट्राला प्रचंड बळकटी मिळाली आहे. या सप्ताहांतर्गत २५९४ सामंजस्य करार झाले आहेत.

## निर्धार स्वच्छतेचा, सुंदर महाराष्ट्राचा

'स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत गेल्या वर्ष-सव्वा वर्षात ५५ शहरे हागणदारीमुक्त व तीन संपूर्ण स्वच्छ शहरे झाली आहेत. या यशात महिला नगराध्यक्षांचा महत्त्वाचा वाटा आहे.

२२

## पर्यटनाचे दीपगृह



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबईनजीकच्या ७८ दीपगृहांचा पर्यटन विकास करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या अनुषंगाने त्यांच्याशी केलेली खास बातचीत....

२८

## प्रबोधनातून व्यसनमुक्तीकडे...



३०

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त देशातील चौथे व्यसनमुक्ती साहित्य संमेलन गोंदिया येथे झाले. त्याचा विशेष वृत्तांत..



## आपले वन, आपला अभिमान

आपल्या महाराष्ट्राची वनसंपदा बघता महाराष्ट्राला वनराष्ट्र म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जागतिक वन दिनानिमित्त विशेष लेख...

३२

## घर सुखाचे, घर आनंदाचे

आयुष्य मावळतीकडे कलताना ज्यांना मदतीच्या हातांची आणि काळजी घेणाऱ्या मनांची गरज असते, त्या ज्येष्ठ नागरिकांसाठी झटणाऱ्या संजीवन वृद्धाश्रमाची प्रेरणादायी यशोगाथा...




३४

## याशिवाय

॥ संस्कृती ॥


निरामय

भ्रमंती






## यशकथा भावल्या





लोकराज्यचा फेब्रुवारी २०१६ चा 'पर्व नवे संपन्नतेचे' या मथळ्याखाली प्रकाशित झालेला अंक आवडला. औद्योगिक क्षेत्रात राज्याने घेतलेल्या भरारीचे तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छ झालेल्या शहरांच्या यशकथा आवडल्या. त्याचबरोबर अंकातील मुख्यमंत्र्यांची वॉर रूम, 'आपले सरकार', उद्योगांच्या सामाजिक जबाबदारीबातच्या उपक्रमावरील लेख, रायगड महोत्सवाचा विशेष वृत्तांत, संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानावर मुख्यमंत्र्यांनी केलेले भाषण, माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी वाटले. खुर्चीपलीकडचे मुख्यमंत्री हा लेखही अत्यंत आवडला.

**– दीपाली कदम, मोहोने, कल्याण**

## अनमोल ठेवा

लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय असतात. नाशिक–कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर काढलेला अंक विशेष आवडला. पौराणिक संदर्भ हे सर्वसामान्याच्या ज्ञानात भर टाकणारे आहेत. लोकराज्यने असेच माहितीपूर्ण अंक आम्हापर्यंत पोहोचावेत हीच अपेक्षा. लोकराज्यचा अंक जपून ठेवण्याजोगा असतो हे विशेष.




**– माणिक ज. खैरनार, सातारा परिसर, औरंगाबाद**

## महत्त्वूपर्ण माहिती

लोकराज्य डिसेंबर २०१५ चा अंक अंत:करणापासून आवडला. 'गौरव महामानवाचा' या लेखाद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पंचतीर्थांबद्दल महत्त्वपूर्ण माहिती या अंकाद्वारे प्रसिद्ध झाली. त्याबद्दल आपले आभारी आहोत. पंचतीर्थांच्या विकासाबाबतचा विस्तृत लेख आवडला. पंचतीर्थांच्या विकासासाठी पुढाकार घेणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार.

**– अशोक इंगळे, शेलगांव अटोल, ता.चिखली, जि. बुलढाणा.**

## सामाजिक न्यायाचा आरसा

सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारावर लोकराज्य मासिक चालते. नोव्हेंबर २०१५ च्या अंकातील विविध मंत्र्याचे लेख खूप वाचनीय आहेत.

**– निलेश भालेराव, श्रीरामपूर**

## माहितीपूर्ण

जानेवारी २०१६ चा लोकराज्य अंक वाचून अतिशय आनंद झाला. अंकाचे मुखपृष्ठ अत्यंत बोलके व प्रबोधनात्मक आहे. संकल्प २०१६, विविध विधेयक व समाजाभिमुख कार्यक्रमाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत या अंकातून पोहोचली. सचित्र लेख, नावीन्यपूर्ण माहिती, मंत्रिमंडळाचे निर्णय, उपक्रमांची माहिती या अंकातून मिळते.

**– मधुकर धो. जोशी, पो. रातोळी, जि. नांदेड**

## सुरेख अंक

जानेवारी २०१६ वर्षातील पहिल्या अंकास व संपादकीय मंडळास माझ्या मन:पूर्वक शभेच्छा! जानेवारीचा अंक सुरेख व वाचनीय आहे. सरकारने केलेले कार्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे मदत कार्य लोकराज्य करीत आहे.


**– दीपक सातोरे, पंचशील नगर,नांदेड**




## आश्वासक

लोकराज्य नोव्हेंबर २०१५ चा अंक राज्य शासनाच्या आश्वासक वाटचालीची ओळख करून देणारा आहे. लेखन आणि भाषा, सुलभ व आकलनक्षम आहे. गतिमान परिवर्तनासाठीचे आपले सरकार, सेवाहमी, कर्जमाफीऐवजी शाश्वत सिंचन, 'मेक इन महाराष्ट्र' याबाबतचे सविस्तर शब्दांकन आवडले. आपली मांडणी, शब्दांकन हे माझ्यासारख्या शिक्षकाला आश्वासित करणारे आहे. माझ्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हे मासिक उत्तरोत्तर अधिकच मौल्यवान ठरत आहे. धन्यवाद....

**– राहुल ह. निपसे, कोलोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर**




## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# सामर्थ्य आहे कर्तृत्वाचे

महिलांना समान संधी व त्यांचे सक्षमीकरण यासाठीच्या जाणीवजागृतीसाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय महिला दिनी विविध उपक्रम राबवले जातात. मात्र, महिलांना आत्मविश्वास व आत्मशक्ती देणारे हे उपक्रम एका दिवसापुरते मर्यादित न ठेवता; वर्षभर तितक्याच उत्साहाने राबवले जाणे आवश्यक असून, हा आपल्या दैनंदिन जगण्याचाच भाग व्हायला हवा. तरच त्यांना विकास आणि प्रगतीच्या समान संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. ही बाब लक्षात घेऊनच महाराष्ट्र शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या सर्वांगीण हिताच्या विविध योजना अत्यंत प्रभावीपणे राबवत आहे. या योजनांचा लाभ घेऊन आज अनेक महिलांनी उंच भरारी घेतली आहे. या अंकात आम्ही महिला दिनानिमित्त शासनाच्या विविध योजनांची विस्तृत माहिती दिली आहे, शिवाय त्या अनुषंगाने शासनाचा दृष्टिकोन व भविष्यातील दिशा याविषयी महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे आणि राज्य मंत्री विद्या ठाकूर यांच्या विशेष मुलाखती समाविष्ट केल्या आहेत.

फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राने आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'मेक इन इंडिया सप्ताह' अत्यंत यशस्वीरीत्या आयोजित केला. या आयोजनाचे कौतुक प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्यासह सगळ्याच मान्यवरांनी केले. या सप्ताहामुळे आपल्या देशाची असीम क्षमता जशी दिसून आली त्याचबरोबर आपण केलेली आतापर्यंतची कामगिरी डोळे दिपवून टाकणारी आणि अभिमान बाळगावी अशीच असल्याची जाणीव करून दिली. या सप्ताहात महाराष्ट्राने आठ लाख कोटी रुपयांचे विविध उद्योगांचे सामंजस्य करार केले. यामुळे महाराष्ट्रातील विविध भागातील औद्योगिक विकासास मोठी चालना मिळून आपले राज्य औद्योगिक प्रगतीत सर्वांपुढे राहील यावरही शिक्कामोर्तब होणार आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्याने संकल्पपूर्तीचा दुसरा टप्पा नुकताच गाठला. ज्या ३६ नगरपालिकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. त्याचा विशेष वृत्तांत सर्वांसाठी प्रेरणादायी असा आहे.

देश आणि राज्यातील दीपगृह परिसराचा पर्यटनाच्या अनुषंगाने विकास करण्यासाठी केंद्र सरकारच्या संकल्पना आणि योजना याविषयी जाणून घेणारी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांची मुलाखत आम्ही या अंकात समाविष्ट केली आहे.

या अंकातील प्रेरणा, भ्रमंती, निरामय, संस्कृती, महाराष्ट्रातील गडकिल्ले ही नेहमीची सदरे वाचकांच्या ज्ञानात भर घालणारी आहेत.

हा अंक आमच्या इतर अंकाप्रमाणेच आपणांस आवडेल, अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**











# सामर्थ्य आहे कर्तृत्वाचे...

**लोकसंख्येमध्ये साधारणत: ५० टक्के असलेल्या महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक निर्णय वेळोवेळी घेण्यात आले आहेत. या निर्णयांचा फायदा राज्यातील महिलांना झाला असून त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे. तसेच त्या विविध क्षेत्रात कर्तृत्वाची नवीनवी शिखरे गाठत आहेत. काही महत्त्वाच्या योजनांचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे.**

आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. मग ती बचतगटात सहभागी होऊन संसाराला हातभार लावणारी महिला असो किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातील उत्तम अधिकारी. सगळ्या जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडताना तिलाही जाणवते आहे की, हे स्पर्धेचे युग आहे. जग मोठ्या प्रमाणात बदलत आहे. नवे विचार, नवे संशोधन, नव्या गोष्टी आपल्या आजूबाजूला घडत आहेत. त्यामुळे चूल आणि मूल यापलीकडे जाऊन या सावित्रीच्या लेकींनी आपली स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. ज्या समाजातील आणि ज्या राष्ट्रातील स्त्री सक्षम असते ते राष्ट्र आणि तो समाज नेहमीच विकासात पुढे असतो. तेथे प्रगल्भ लोकशाही नांदत असते. त्या दृष्टीने महाराष्ट्र नेहमीच भाग्यवान राहिला आहे. महाराष्ट्राला स्त्री चळवळीची मोठी परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराजांच्या विचारांनी ही भूमी अधिक संपन्न झाली आहे. त्यामुळेच सुरुवातीला कुटुंबाला मदत म्हणून घराबाहेर पडलेल्या स्त्रीमध्ये आत्मभान आले, आत्मसन्मान आला. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटींच्या वर आहे, त्यातील जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची आहे हे लक्षात घेतले तर समाजाचा अर्धा भाग असलेल्या या घटकाच्या विकासात सर्वांनीच योगदान देणे अपेक्षित आहे. महिलांच्या कर्तृत्वावर विश्वास असणारे हे शासन आहे.

शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत विविध कल्याणकारी

योजना राबवण्यात येतात. महिलांचे शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण करण्यावर या योजनांमधून विशेष भर देण्यात येतो.

### समुपदेशन केंद्र

महिलांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचे अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना (टास्क फोर्स) करण्यात आली आहे. सध्या राज्यात १०५ समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत.

### मनोधैर्य योजना

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसीड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, बालके व त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत व मानसोपचार तज्ज्ञांची सेवा देणे, अशा महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न, वित्तीय साहाय्य, समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत देणे हा योजनेचा उद्देश आहे.

### महिलांचे संरक्षण अधिनियम

केंद्र शासनाच्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर नवीन पूर्णवेळ ३७ संरक्षण अधिकाऱ्यांची, ३७ विधी सल्लागारांची व ३७ डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे निर्माण केली आहेत. त्यापैकी ३० संरक्षण अधिकारी व ३० विधी सल्लागारांची पदे भरण्यात आली असून ते जिल्हास्तरावर पूर्णवेळ कार्यरत आहेत. तसेच तालुकास्तरावरही पूर्ण वेळ संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी दोन तालुक्यांना मिळून एक याप्रमाणे २१६ कनिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.




**व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन**

**शासनमान्य संस्थेत नर्सिंग, पॅकिंग, टेलिफोन ऑपरेटर, टंकलेखन, संगणक, आयटीआय इ. प्रशिक्षण घेणाऱ्या, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील महिला व मुलींना; प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये दरमहा १०० रुपये इतके विद्यावेतन देण्यात येते.**



### महिला प्रशिक्षण केंद्रांना साहाय्यक अनुदान

आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबांमधील १८ ते ४० वर्षे वयोगटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्या आधारे त्यांना स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवता यावा यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत महिला प्रशिक्षण केंद्रे चालवण्यात येतात. या प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिवणकला, टंकलेखन, संगणक, स्क्रिन प्रिंटिंग, हस्तकला, अंगणवाडी, बालवाडी प्रशिक्षण इ. प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. या केंद्रामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना ७५ रुपये प्रमाणे दरमहा विद्यावेतन देण्यात येते. स्वयंसेवी संस्थेस प्रशिक्षण केंद्रासाठी यंत्रसामग्री व कार्यालयीन साहित्य खरेदीकरिता २८ हजार ५०० रुपये इतके अनावर्ती अनुदान एकदाच देण्यात येते. त्यानंतरच्या ६ महिन्यांच्या एका प्रशिक्षण सत्रास २१ हजार ५०० रुपये याप्रमाणे आवर्ती अनुदान संस्थेस देण्यात येते.

या प्रशिक्षण केंद्रामध्ये लाभार्थी महिला स्वत: प्रवेश घेऊ शकतात. प्रवेश घेण्यासाठी महिलेचे वय १८ ते ४० वर्षे या वयोगटातील असणे तसेच महिला आर्थिकदृष्ट्या मागास व गरीब कुटुंबातील (वार्षिक उत्पन्न १५ हजार रुपये) असावी अशी अट आहे. एका प्रशिक्षण केंद्रामध्ये ३० महिला याप्रमाणे एका सत्रामध्ये एकूण २६२ प्रशिक्षण केंद्राद्वारे ७ हजार ८६० महिलांना प्रशिक्षित करण्यात येते.

### निराश्रित मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य

अनाथालये, शासकीय महिला वसतिगृहे (राज्यगृहे), संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे व शासन अनुदानित बालगृहे या योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांमधील निराश्रित मुलींच्या विवाहासाठी शासनामार्फत साहाय्यक अनुदान देण्यात येते. अनाथ मुलींच्या पुनर्वसनासाठी शासनाने ही योजना सुरू केली आहे. या संस्थांमधील अनाथ मुलीच्या विवाहासाठी हे अनुदान २५ हजार रुपये इतके करण्यात आले आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्यामार्फत या रकमेचा धनादेश संबंधित मुलीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्याची कार्यवाही केली जाते.

### महिला जिल्हा महिला सल्लागार समिती

हुंडा पद्धतीचे निर्मूलन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक महिला जिल्हा सल्लागार समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समितीस दरवर्षी ४५ हजार रूपये इतके अनुदान देण्यात येते. या समितीकडून हुंडा पद्धती नष्ट करणे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमांच्या कामकाजाचा आढावा घेणे, अनैतिक व्यापारात बळी पडलेल्या महिला व मुलींचे पुनर्वसन करणे, महिलांचे सक्षमीकरण करणे इ. क्षेत्रात प्रचार, प्रसिद्धी व त्या अनुषंगाने शासनास शिफारशी करण्याचे कामकाज करण्यात येते.

### महिलांना फ्लिट टॅक्सी ड्रायव्हिंगचे मोफत प्रशिक्षण

राज्यातील महिलांना फ्लिट टॅक्सी चालविण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भात राज्य शासनाचा महिला, बालविकास विभाग आणि आय केअर लाईफ (आय केअर लर्निंग प्रा. लि. अंतर्गत) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. आय केअर लाईफमार्फत निवड झालेल्या प्रशिक्षण इच्छुक महिलांना फ्लिट टॅक्सी चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे तीन महिन्याचे प्रशिक्षण पूर्णतः मोफत असेल. यात महिलांना वाहन चालवण्याबरोबरच स्वसंरक्षण, संवाद-कौशल्य, प्रवाशांशी व्यवहार, संबंधित शहराचा इतिहास, भूगोल याबरोबरच त्या शहराची रचना, रस्ते, नकाशा आदींबाबतही प्रशिक्षण दिले जाईल. राज्याच्या विविध भागात प्रशिक्षण इच्छुक महिलांची उपलब्धता होईल. त्यानुसार ही प्रशिक्षणे सुरू केली जाणार आहेत. प्रशिक्षणाच्या समाप्तीनंतर राज्यातील प्रमुख फ्लिट टॅक्सी ऑपरेटर कंपन्यांशी या प्रशिक्षित महिलांचा संपर्क साधून त्यांना



फ्लिट टॅक्सीबरोबरच रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. येत्या तीन वर्षात राज्यातील साधारण १० हजार महिलांना हे प्रशिक्षण आणि त्यानंतर रोजगार उपलब्ध करून देण्याचा महिला आणि बालविकास विभाग तसेच आय केअर लाईफ यांचा मानस आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी आय केअरलाईफचा टोल फ्री क्रमांक १८००१०३१९१८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय icarelearning.in, psec.wcdmaharashtra.gov.inया ई-मेल पत्त्यावरही संपर्क साधता येईल.

### जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण समिती

जिल्हा परिषदेतील महिला व बाल कल्याण समितीमार्फत महिला व बाल विकासाची विविध कामे करण्यासाठी जिल्हा परिषदांना साहाय्यक अनुदान दिले जाते. तसेच जिल्हा परिषदेमार्फत त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून १० टक्के रक्कम याकरिता उपलब्ध करून दिली जाते. त्याशिवाय जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या तरतुदीतून प्रतिवर्षी २० लाख रुपये अनुदान या समितीस उपलब्ध करून दिले जाते. सद्य:स्थितीत ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या १८ योजना या समितीमार्फत राबवल्या जातात.

### वसतिगृहे

१६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परीत्यक्ता, घटस्फोटित, कुमारीमाता, लैंगिक अत्याचारीत, अनैतिक व्यापारात अडकलेल्या, सामाजिक संकटग्रस्त महिलांना या वसतिगृहांमध्ये प्रवेश दिला जातो. राज्यामध्ये १८ जिल्ह्यांत एकूण २० संस्था कार्यरत असून प्रत्येक संस्थेची मान्य संख्या १०० इतकी आहे. एकूण मंजूर प्रवेश क्षमता २ हजार इतकी आहे. गरजू महिला स्वेच्छेने या वसतिगृहात प्रवेश घेऊन २ ते ३ वर्षे राहू शकतात. सुधारित माहेर योजनेंतर्गत प्रवेशित महिलेस दरमहा १ हजार रुपये अनुदान दिले जाते. महिलेबरोबर तिची लहान मुले असल्यास पहिल्या मुलाला ५०० रुपये व दुसऱ्या मुलासाठी ४०० रुपये दरमहा जादा अनुदान दिले जाते. हे अनुदान जास्तीत जास्त एक वर्षासाठी दिले जाते.

### महिला संरक्षणगृहे

अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ कायद्याखाली ही योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत पोलिसांमार्फत कुंटणखान्यातून सोडवून आणलेल्या व न्यायालयाने आदेशित केलेल्या १८ वर्षांवरील महिलांचे संरक्षण व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाद्वारे संरक्षणगृहे चालवली जातात. महाराष्ट्रात एकूण २ शासकीय संरक्षणगृहे मुंबई व नागपूर येथे कार्यरत असून त्यांची मान्य संख्या २०० आहे. तसेच ५ संरक्षणगृहे स्वयंसेवी संस्थांमार्फत कार्यरत असून या संस्था विनाअनुदान तत्त्वावर चालवण्यात येतात. या संस्थाची मंजूर संख्या २६५ इतकी आहे.

### आधारगृहे

समाजातील नैसर्गिक, अनैसर्गिक संकटे व असामाजिक कृतीतून निर्माण होणाऱ्या समस्याग्रस्त महिलांना समाजात पुन्हा स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी १६ ते ६० वर्ष या वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त महिलांना आश्रय देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी, स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृहे चालवण्यात येतात. राज्यात ६ जिल्ह्यांमध्ये ९ आधारगृहे कार्यरत असून त्यांची मान्य संख्या ५९० इतकी आहे. या संस्थामध्ये महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय मदत, शिक्षण व प्रशिक्षण सुविधा आणि कायदेविषयक सल्ला इत्यादी सेवा पुरवण्यात येतात. या योजनेंतर्गत दरमहा, दरडोई ९५० रुपये इतके साहाय्यक अनुदान दिले जाते.

---

## काही महत्त्वाचे संपर्क क्रमांक

- **महिला व बालकांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री साहाय्यता कक्षाचा टोल फ्री क्रमांक १८३**
- **मुंबईतील महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस सहायता कक्षाचा टोल फ्री क्रमांक १०३**
- **मंत्रालयातील विविध विभागाची माहिती घेण्यासाठी ०२२ २२०२४२४३**
- **पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालय माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२६३३००५२/५७**
- **विविध विभागातील महिलाविषयक योजनांची माहिती घेण्यासाठी या संकेतस्थळाला भेट द्या.**
  https://womenchild.maharashtra.gov.in
  https://www.maharashtra.gov.in
- **आपली प्रतिक्रीया मुख्यमंत्र्यांपर्यंत मांडण्याकरिता वेबपोर्टला भेट द्या**
  https://aaplesarkar.maharashtra.gov.in

## देवदासींसाठी कल्याणकारी योजना

शासनातर्फे ४० वर्षांवरील देवदासींना उदरनिर्वाहाकरिता दरमहा ६०० रुपये इतके निर्वाह अनुदान या योजनेंतर्गत देण्यात येते. ही वैयक्तिक लाभाची योजना असून देवदासींचे प्राबल्य असणाऱ्या ११ जिल्ह्यांमध्ये (मुंबई, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, लातूर व उस्मानाबाद) जिल्हास्तरावरून राबवण्यात येते.

## विवाहासाठी अनुदान

अविवाहित देवदासी व देवदासींच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान ही योजना राज्यात राबवली जात आहे. हे अनुदान १८ वर्षांवरील देवदासी किंवा देवदासीच्या मुलीच्या विवाहासाठी दिले जाते. देवदासी किंवा देवदासींच्या मुलींना विवाहासाठी मुलगी पदवीधर नसल्यास २५ हजार रूपये तसेच मुलगी पदवीधर असेल तर ५० हजार रुपये अनुदान तिच्या राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यात जमा करण्यात येते.

## गणवेश व शालेय साहित्यासाठी अनुदान

देवदासींच्या पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींच्या शिक्षणास मदत होण्यासाठी मुलासाठी १ हजार ६०० रुपये व मुलीसाठी १ हजार ७५० रुपये एवढे दरडोई अनुदान वर्षातून एकदा देण्यात येते. या अनुदानासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यातील अर्ज करावा लागतो.

## वसतिगृह

देवदासींच्या मुलामुलींना योग्य शिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील कोल्हापूर व सांगली या दोन जिल्ह्यांमध्ये देवदासींच्या मुलामुलींकरिता वसतिगृह ही योजना राबवण्यात येते.

## बहुउद्देशीय महिला केंद्रे

महिलांना आवश्यक तो सल्ला व मार्गदर्शन तसेच आपद्ग्रस्त महिलांना मदत मिळावी या दृष्टीने राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व औरंगाबाद या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे ५ बहुउद्देशीय महिला केंद्रे कार्यरत आहेत.




## 'निर्भया पुरस्कार'

राज्यातील महिलांच्या अत्याचाराच्या विरुद्ध कामगिरी करणाऱ्या नागरिकांसाठी शासनाच्या वतीने 'निर्भया 'पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## कौशल्य विकास व उद्योजकता

कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत राज्यात कौशल्य आधारित उद्योगांमुळे महिलांना खूप संधी निर्माण झाल्या आहे. शिक्षण अर्धवट झालेल्या किंवा शिक्षण घेऊ न शकलेल्या महिलांना त्यांच्यातील कौशल्यास जाणून, उच्च प्रतीचे प्रशिक्षण देऊन; रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहे.

## जननी सुरक्षा योजना

जननी सुरक्षा योजनेचा उद्देश अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील गरोदर महिलांचे आरोग्य संस्थेत होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण वाढवणे व मातामृत्यू आणि अर्भकमृत्यूचे प्रमाण कमी करणे हे आहे. या योजनेनुसार अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील गरोदर महिलांची शासकीय अथवा शासन मानांकित आरोग्य संस्थेत प्रसूती झाल्यास ग्रामीण भागात ७०० रुपये तर शहरी भागात ६०० रुपये इतका लाभ धनादेशाद्वारे महिलेला देण्यात येतो. तसेच फक्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील गरोदर महिलेची प्रसूती घरी झाली तर ५०० रुपये इतका लाभ धनादेशाद्वारे महिलेला देण्यात येतो. या योजनेचा लाभ सर्व शासकीय आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, स्त्री रुग्णालये, सामान्य रुग्णालये, जिल्हा रुग्णालये आणि शासन मानांकित खाजगी रुग्णालयात प्रसुती झालेल्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील महिलांना देण्यात येतो.

### महिलासुरक्षा गस्त पथक

**मुंबई शहराची आव्हाने मोठी असून सुरक्षित महाराष्ट्राच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. आजघडीला महाराष्ट्र हे महिलांच्या सुरक्षिततेबद्दल अग्रेसर राज्य आहे. मुंबई पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबवत असून महिलासुरक्षा गस्त पथक वाहने हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. या वाहनांमुळे महिलांना तत्काळ सुरक्षा मिळण्यास मदत होत आहे. मुंबई पोलीस दलातर्फे शहरातील ९३ पोलीस ठाण्यांसाठी अत्याधुनिक सोयीसुविधांसह सज्ज असलेली ५ मोबाइल वाहने खरेदी करण्यात आली आहेत.**



## गरोदर माता व स्तनदा मातांना मोफत सेवा

गरोदरपणात, बाळंतपणात व बाळंतपणानंतर ४२ दिवसापर्यंत मातांना शासकीय दवाखान्याद्वारे या सेवा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. मोफत साधारण बाळंतपण व गरज पडल्यास मोफत सिझेरियन शस्त्रक्रिया प्रसूती, मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा चाचण्या व इतर तपासण्या (अर्थात आरोग्य संस्थेच्या दर्जानुसार जेथे या सुविधा उपलब्ध असतील



तेथे) दिल्या जातात. सामान्य बाळंतपण झाल्यास ३ दिवसापर्यंत तर सिझेरियन पद्धतीने बाळंतपण झाल्यास ७ दिवसापर्यंत मोफत आहार देण्यात येतो.

घरापासून शासकीय दवाखान्यापर्यंत येण्यासाठी, गरज पडल्यास एका शासकीय दवाखान्यातून दुसऱ्या शासकीय दवाखान्यात जाण्यास आणि शासकीय दवाखान्यातून घरी परत जाण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते.

### सेवांचा लाभ घेण्यासाठी

राज्यात पुणे येथे राज्यस्तरीय मदत केंद्र (कॉल सेंटर) सुरू केलेले आहे. येथे २४ तास सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कॉल सेंटरशी संपर्क साधण्यासाठी १०२ व १०८ या क्रमांकावर टोल फ्री दूरध्वनी सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या क्रमांकावर फोन केल्यास लवकरात लवकर वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते.

### मातृत्व अनुदान योजना

नवसंजीवनी योजनेंतर्गत मातृत्व अनुदान योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. गरोदर मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये गरोदरपणामध्ये रुपये ४००/- रोखीने व रुपये ४००/- ची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकूण रुपये ८००/- चा लाभ दिला जातो.

## कन्याशाळा

**आदिवासींचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. विशेषत: महिलांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. आदिवासी भागातील मुलींना चांगले शिक्षण घेता यावे, यासाठी कन्याशाळा चालवल्या जात आहेत. राज्यात आदिवासी विकास विभागाच्या अधीनस्थ एकूण २५ कन्याशाळा आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या संदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीने काही वेळा बऱ्याच अडचणी उद्भवतात. त्यामुळे ५२९ शासकीय आश्रमशाळांपैकी काही आश्रमशाळांचे कन्या शाळेत रूपांतर करण्याचे शासनाने ठरवले. त्यानुसार एकूण २५ आश्रमशाळांचे कन्या शाळेत रूपांतर करण्यात आलेले आहे. या सर्व आश्रमशाळा माध्यमिक स्वरूपाच्या आहेत.**

### परिवहन विभाग

- स्वाती अभय पास योजना- मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापर्यंत उर्वरित शैक्षणिक सत्रासाठी एसटीचा पास मोफत
- हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजनेंतर्गत एस.टी कर्मचाऱ्यांच्या घरी १ एप्रिल २०१६ पासून पुढे जन्मास येणाऱ्या मुलीच्या नावे १७,५०० रुपयांची रक्कम एस.टी बँकेच्या मुदत दामदुप्पट योजनेत गुंतवणार. मुलगी २१ वर्षाची झाल्यानंतर तिच्या विवाहासाठी १ लाख रुपयांची रक्कम अदा केली जाणार.
- महिलांना रिक्षा परवान्याच्या वाटपात ५ टक्के आरक्षण. महिलांची रिक्षा अबोली रंगाची.
- हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजनेंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीस नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून ऑटो रिक्षा परवाने.
- राज्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक आणि औरंगाबाद शहरात नवीन रिक्षा परवान्यांना परवानगी नाही. परंतु आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीसाठी ही अट शिथिल.
- शेतकऱ्याच्या विधवा पत्नीस योजनेंतर्गत ऑटोरिक्षा खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून १०० टक्के कर्ज पुरवठयाची व्यवस्था होईल या दृष्टीने प्रयत्न.
- ऑटोरिक्षा परवानाधारकाकडे ऑटो रिक्षा लायसन्स आणि बॅच असणे आवश्यक आहे. तथापि या विशेष योजनेद्वारे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांसाठी ही अट शिथिल.
- राज्यातील एस.टी महामंडळाची उपहारगृहे महिला बचतगटांना चालवण्यासाठी देण्याचे प्रस्तावित
- भगिनी सन्मान योजनेद्वारे शेअर टॅक्सीमधील चालकाशेजारील पहिली सीट महिलांसाठी राखीव
- शिवनेरी बसमध्ये महिलांसाठी १० आसने राखीव
- मानवविकास योजनेतून फक्त विद्यार्थ्यांना प्रत्येक तालुक्यात २ याप्रमाणे २४४ नवीन बस उपलब्ध.
- दुर्दैवाने एस.टी बसला अपघात झाला आणि जीवितहानी झाली तर अशा मृत पुरुष किंवा महिला यांच्या कुटुंबीयांना हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात साहाय्य निधी योजनेंतर्गत दहा लाख रुपयांपर्यंत अपघात विमा.

### अल्पसंख्याक समाजातील महिलांसाठी स्वयंसहायता बचत गट योजना

अल्पसंख्याकबहुल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक समाजातील महिलांसाठी

## सन्मान आणि सक्षमीकरण

- **मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात प्राणाची बाजी लावणाऱ्या कै. बापूसाहेब धुरगुडे यांच्या मुलीस अरूणा बापूसाहेब धुरगूडेची विशेष बाब म्हणून साहाय्यक विक्रीकर आयुक्त, गट– अ या पदावर नियुक्ती**
- **जीवनावश्यक वस्तूंवरील करमाफीस मुदतवाढ**
- **महिलांच्या पर्स, हॅन्डबॅग्जवरील मूल्यवर्धित कराचा दर १२.५ टक्क्याहून कमी करून तो ५ टक्के इतका खाली आणला.**
- **दहा हजार रुपयांपर्यंत मासिक वेतन असणाऱ्या महिलांना व्यवसाय करातून सूट**
- **स्वग्राम आणि महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीमधील कुटुंबाच्या व्याख्येत सुधारणा. अविवाहित राज्य शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्याला महाराष्ट्र दर्शन आणि स्वग्राम प्रवास सवलत योजनेचा लाभ देताना त्याच्यावर अवलंबित आईवडील, अवलंबित अविवाहित अज्ञान भाऊ–बहीण यांनाही सवलतीचा लाभ**
- **दोन वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास पूर्णवेतनी प्रसुती रजा मंजूर करताना सेवा कालावधीची अट शिथिल.**
- **सेवेत असताना अथवा सेवानिृत्तीनंतर एकट्या शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास चरितार्थाचे साधन नसल्याने पूर्णत: तिच्यावर अवलंबून असलेले तिचे पालक महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन अधिनियमानुसार कुठल्याही निवृत्तीवेतनास पात्र नव्हते. सामाजिक सुरक्षिततेचा उपाय म्हणून सेवानिवृत्तीवेतन अधिनियमात आता सुधारणा करण्यात आली आहे. यातील कुटुंबाची व्याख्या विस्तारित करताना एकट्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या पालकांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.**
- **सरोगसीपद्धतीने जन्मलेल्या मुलाच्या संगोपनासाठी राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची विशेष रजा. ही रजा संपूर्ण सेवा कालावधीत एकदाच घेता येईल.**

स्वयंसहायता बचतगट योजना. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवण्यात येते. राज्यातील अल्पसंख्याकबहुल शहरांमधील अल्पसंख्याक (मुस्लीम, बौद्ध, जैन, पारशी, ख्रिश्चन, शीख) महिला या योजनेच्या लाभार्थी आहेत.






**योजनेचे उद्दिष्ट :** राज्यातील अल्पसंख्याकबहुल शहरांमध्ये स्वयंसाहाय्य महिला बचतगटाच्या माध्यमातून अल्पसंख्याक लोकसमूहातील महिलांना संगठित करणे, त्यांना पतपुरवठ्याची संधी तसेच उद्योजकीय विकासाची संधी उपलब्ध करून देणे. या योजनेमार्फत अल्पसंख्याक महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे.

**योजनेचे स्वरूप :** राज्यातील नांदेड, मुंबई उपनगर,



**'जरूरी नही होता रोशनी चिरागोंसे ही हो, बेटिया भी घर मे उजाला करती है या विचारांशी मी पूर्णत: सहमत आहे. जगातील सर्वात उत्तम व्यवस्थापक कोण असे जर तुम्ही मला विचाराल तर मी म्हणेन महिला. मग ती घर-कुटुंब सांभाळणारी असो किंवा या सर्वाबरोबर नोकरी-व्यवसाय करणारी असो, वेळेचे उत्तम व्यवस्थापन आणि प्राप्त निधीतून कुटुंबांच्या गरजांचे उत्तम नियोजन महिलांइतके दुसरे कुणी चांगले करू शकत नाही'.**

**- वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार...**

मुंबई शहर आदी शहरांसह कारंजा (जिल्हा वाशिम), मालेगाव, परभणी, भिवंडी, औरंगाबाद, नागपूर, पूणे, मुंब्रा (जिल्हा ठाणे), सांगली आणि मिरज येथे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महिलांचे स्वयंसहाय बचतगट स्थापन करणे. या बचतगटात अल्पसंख्याक प्रवर्गातील गरीब व गरजू महिलांचा समावेश करण्यात येतो. ७० % अल्पसंख्याक महिला व ३०% इतर समाजातील महिलांचा समावेश करण्यात येतो.

### सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना

फक्त एक किंवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील जोडप्यासाठी सुधारित सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना राबवण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २००७ पासून ही योजना सुधारित स्वरूपात लागू करण्यात आलेली आहे.

सदर योजना फक्त दारिद्र्यरेषेखालील जोडप्यांनाच लागू आहे. जोडप्यास मुलगा नसावा व एक किंवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असावी. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या जोडप्यास एक मुलगी असल्यास व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असल्यास सदर व्यक्तीस २००० रुपये व ८००० रुपये रोख मुलीच्या नावे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात देण्यात येतात.

जर जोडप्यास २ मुली असल्यास व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असल्यास सदर व्यक्तीस २००० रुपये व ४००० रुपये रोख प्रत्येक मुलीच्या नावे (एकुण ८००० रुपये) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरूपात देण्यात येतात.

**डॉ. सुरेखा मुळे, इर्शाद बागवान, गजानन पाटील,**
**रेखा पालवे आणि टीम लोकराज्य**

विशेष मुलाखत

# सक्षमीकरण व कौशल्य विकास

**राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागामार्फत महिलांचे कल्याण आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. राज्य शासनामार्फत मागील साधारण दीड वर्षात या अनुषंगाने विविध निर्णय घेण्यात आले आहेत. यापुढील काळात महिला सक्षमीकरणासाठी शासनामार्फत व्यापक प्रयत्न केले जाणार आहेत. राज्याच्या ग्रामविकास, महिला आणि बालविकास, जलसंधारण आणि रोहयो मंत्री पंकजा मुंडे यांनी यासंदर्भात 'लोकराज्य'शी संवाद साधला.**

**इर्शाद बागवान**

**बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी काही विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत का ?**

महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बचतगटांची चळवळ बळकट करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (मावीम) विविध योजना राबवण्यात येत आहेत. ग्रामविकास विभागामार्फत महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान राबवण्यात येत आहे. मुंबईत नुकतेच महालक्ष्मी सरस प्रदर्शन झाले. अशा प्रदर्शनांच्या माध्यमातून बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल. नागपूर आणि औरंगाबाद येथे बचतगट उत्पादनांच्या विक्रीसाठी स्वतंत्र मॉल उभे करण्यात येतील. याशिवाय महानगरांमध्ये असलेल्या मॉलमध्येही बचत गट उत्पादनांच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देणे अनिवार्य करण्यात येईल. स्वतंत्र ई-पोर्टल सुरू करून बचतगटांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली.

**'उमेद' अभियानाचे नेमके स्वरूप काय ?**

मानवाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने ग्रामविकास व महिला आणि बालविकास विभागाची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. गरिबी दूर करून त्यांना आत्मसन्मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे, गरिबांना सकस अन्न, अंगभर वस्त्रे, पक्का निवारा, आरोग्याच्या उत्तम सुविधा आणि दर्जेदार शिक्षण मिळावे आणि त्यांची जीवनोन्नती व्हावी या उद्देशाने शासनाने उमेद अभियान सुरू केले आहे. या अभियानात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिला व युवक-युवती तसेच शेतमजूर, मजूर, भूमिहीन, कामगार आणि आदिवासी आदी कुटुंबातील किमान एका महिलेचा स्वयंसाहाय्यता समूहामध्ये (बचतगटात) समावेश करण्यात येणार आहे.

**मुलींच्या वसतिगृहांसाठी काही तरतूद करण्यात आली आहे का ?**

मुलींच्या वसतिगृहांसाठीच्या निधीमध्ये दुपटीने वाढ करून मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात ११२ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली. मुलींच्या सर्व वसतिगृहांना येत्या ३ वर्षात संरक्षक भिंती बांधण्यात येणार असून यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद मागील अर्थसंकल्पात करण्यात आली असून हे काम सुरू करण्यात आले आहे.






## मुलींचे घटते प्रमाण रोखण्यासाठीच्या उपाययोजना कोणत्या?

महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि आरोग्य रक्षणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'आणि राज्य शासनाच्या 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेमार्फत मुलीच्या जन्माला प्रोत्साहन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानासाठी महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, जालना, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, वाशिम, कोल्हापूर, सांगली या १० जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेंतर्गत राज्यात 'माझी कन्या भाग्यश्री योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मुलीला जन्म देणे, तिचे शिक्षण करणे, बालविवाह रोखणे आणि तिचा कौशल्य विकास करणे याकरिता कुटुंबांना शासनाद्वारे आर्थिक प्रोत्साहन देण्यात येईल. या योजनेंतर्गत मुलगी, आई, आजी आणि गावाला पुरस्कार देण्यात येईल. अशा विविध उपाययोजनांच्या माध्यमातून मुलीच्या जन्माला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या वर्षी रुपये १५३ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. एकुलत्या एक मुलीच्या पहिल्या ५ वाढदिवसासाठी रुपये ५ हजार तसेच पोषण आहारासाठी रुपये १० हजार तसेच १२ वी पर्यंतच्या शिक्षण व पोषणासाठी रुपये २१ हजारांचा लाभ देण्यात येणार आहे. या मुलींच्या जन्मानंतर रुपये २१ हजार २०० रुपयांचा विमा काढण्यात येणार आहे. त्यामुळे तिला रुपये १ लाखापर्यंतचे अपघाती विम्याचे फायदे मिळतील.

## अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीसंदर्भात शासनाचा निर्णय काय?

राज्य शासनाने अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला आहे. अंगणवाडी सेविकांना ९५० रुपये, मदतनीसांना ५०० रुपये तर मिनी अंगणवाडी सेविकांना ५५० रुपयांची मानधन वाढ देण्यात आली आहे. मागील वर्षाच्या थकीत भाऊबीज भेटीसह चालू वर्षाची भाऊबीज भेट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढीव मानधनासाठी प्रतिवर्ष सुमारे १७६ कोटी रुपये अतिरिक्त खर्च होणार आहे. १ लाख ९७ हजार २६२ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना या मानधनवाढीचा लाभ मिळणार आहे. याशिवाय अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रणालीव्दारे मानधन वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा ठाणे जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर शुभारंभ करण्यात आला आहे. संपूर्ण राज्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महत्त्वाचे कार्यक्रम, निर्णय इत्यादींची माहिती अंगणवाडी कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी एसएमएस गेटवे सेवा सुरू करण्यात येणार आहे.




## महिला सुरक्षिततेसाठीच्या उपाययोजना कोणत्या?

महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाचा गृह विभाग नेहमीच दक्ष असतो. अडचणीत सापडलेल्या महिलांना मदत करण्यासाठी १८१ या टोल फ्री क्रमांकावर मुख्यमंत्र्यांची हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. ही सेवा २४ x ७ कार्यरत असते.

## कौशल्य विकासासाठीच्या उपाययोजना कोणत्या?

महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आय केअर संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. महिला आणि बालगृहातील बालकांच्या कौशल्य विकासासाठी राज्य तांत्रिक शिक्षण विभागाबारोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणासाठी कार्यक्रम हाती घेण्याबाबत खासगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

## कृपया हिरकणी कक्षाची माहिती द्या.

राज्यातील मोठ्या शासकीय कार्यालयांमध्ये महिला कर्मचाऱ्यांना आपल्या बाळांना स्तनपान करणे सुलभ व्हावे, यासाठी हिरकणी कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रालयात नुकताच हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला असून मंत्रालयातील महिला कर्मचाऱ्यांना तसेच मंत्रालयात येणाऱ्या स्तनदा अभ्यागत मातांना त्याचा लाभ मिळत आहे.

## जलसंधारण विभागाच्या महिलांसाठीच्या योजना कोणत्या?

महाराष्ट्र राज्य, गेल्या काही वर्षांपासून दुष्काळ किंवा पाणीटंचाई सारख्या आपत्तींचा सातत्याने सामना करत आहे. टंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी शासन सर्वतोपरी उपाययोजना करीत आहे. शासनाने गावागावांत विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणारे तसेच जलसंधारणाची लोकचळवळ गतिमान करणारे जलयुक्त शिवार अभियान हे एक महत्त्वाकांक्षी अभियान राबवण्यास सुरुवात केली आहे. गावांमध्ये घरगुती वापरासाठी पाणी भरण्याची जबाबदारी ही विशेषत्वाने महिलांकडेच असते. यासाठी आजही महिलांना दूरवर जावे लागते. महिलांच्या डोक्यावरील हंड्याचा भार कमी करण्याचाही उद्देश जलयुक्त शिवार अभियानातून साधण्याचा आमचा मानस आहे.

**(लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०७७३८७९३७२२**

# मायेची पाखर

**बालक हेच उद्याचे राज्यकर्ते आणि पालक. त्यामुळे या बालशक्तीला जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हिरिरीने आणि तितक्याच तळमळीने महिला व बालविकास राज्यमंत्री विद्या ठाकूर या करत आहेत. महिला व बालकांच्या कल्याणासाठी काम करणे हीच आपली जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी आपल्या विभागाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली...**

महिलांचे सक्षमीकरण होणे हे आवश्यकच आहे, पण त्याचबरोबर राष्ट्राची शक्ती असलेल्या बालकांचे कल्याण होणे आवश्यक आहे. म्हणूनच बालकांच्या विविध प्रश्नांपासून मी कामाला सुरुवात केली. बालनिरीक्षणगृहे असो किंवा मग अनाथ आश्रमामध्ये राहत असणारी मुले या सर्व बालकांच्या वाढीसाठी निकोप आणि सुदृढ वातावरण मिळणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.



गेल्या वर्षभरापासून मी बालकांच्या कल्याणासाठी काम करीत आहे. बालनिरीक्षणगृहांची सुधारणा करणे आणि बालगृहांतील मुलांचे प्रश्न सोडविणे यासाठी मी राज्यातील काही बालनिरीक्षणगृहांना भेटी दिल्या. या भेटीनंतर माझ्या लक्षात आलेल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न सुरू केला. या दृष्टीने पहिले पाऊल टाकले ते म्हणजे अनाथाश्रमातल्या मुलांसाठी बाल आधार कार्ड देण्याचे. यानंतर बालगृहाचे आधुनिकीकरण करणे, बालगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे ही कामे हाती घेण्यात येत आहेत. बालगृहांमध्ये असलेल्या मुलांना लवकरात लवकर त्यांच्या पालकांकडे सुपुर्द करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

राज्यातील आणि देशातील वेगवेगळ्या भागातून मुले काही कारणांमुळे घरातून पळून येतात. या मुलांना मुंबईत आल्यावर काय करायचे हे माहीत नसते, मग ही मुले मिळेल ती कामे करतात आणि मग बालकामगार कायद्यामुळे पकडली जातात. त्यानंतर ही मुले बालगृहात येतात. अशा घरातून पळून येणाऱ्या मुलांचे समुपदेशन होणे फार आवश्यक आहे.

स्त्री भ्रूणहत्येस प्रतिबंध करणे आणि शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवणे यासाठी प्राधान्याने मी प्रयत्न करीत आहे. महिला व बालकांमध्ये कुपोषण निर्मूलनासाठी जनजागृती करणे, बालगृहांची सुधारणा करणे, महिला आणि बालकांची सुरक्षितता या बाबींना मी प्राधान्य देणार आहे. बाल सुधारगृहातील मुले व मुलींच्या कल्याणासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी आणि महिला बचतगटाच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन करण्यात येणार आहे. याची सुरुवात तर मी माझ्यापासून केली आहे. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी माझ्या मतदारसंघात बचतगट स्थापन केले आहेत. मला असे वाटते की, महिलांना सक्षम करण्यासाठी राज्यभरात बचतगटांचे जाळे विकसित करणे आवश्यक आहे. महिलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्यात बचतगटांचा मोठा वाटा आहे. यामुळे महिलांची आर्थिक आणि सामाजिक प्रगती होत असते. याबरोबरच आगामी काळातील आव्हाने लक्षात घेऊन महिलांना व्यावसायिक वाहनचालकांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. येत्या तीन वर्षात राज्यातील मुलींच्या वसतिगृहांना संरक्षक भिंती बांधण्यात येणार असून यासाठी वसतिगृहांच्या निधीमध्ये दुपटीने वाढ करण्यात आली आहे. महिला व बालकांमध्ये कुपोषण निर्मूलनासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे. महिलांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचा मी नेहमीच प्रयत्न करीत असते. स्त्री भ्रूणहत्येस प्रतिबंध करणे आणि शिक्षणात मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी केंद्र सरकारच्या 'बेटी बचाव बेटी पढाव' योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू केली आहे. आगामी काळात महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही, याकडे मी प्राधान्याने लक्ष देणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**

# पंखांना बळ नवे...




### अल्पमुदती निवासगृहे

मानसिक तणाव, सामाजिक व नैतिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या स्त्रिया, लैंगिकदृष्ट्या शोषित स्त्रिया, निराधार, निराश्रित, घटस्फोटित महिलांना निवासगृहात आश्रय देऊन त्यांना वैद्यकीय उपचार, मानसिक उपचार, व्यक्तीचिकित्सा, समुपदेशन, व्यवसाय प्रशिक्षण, खेळ व मनोरंजन इत्यादी प्रकारच्या सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांमार्फत अल्पमुदती निवासगृहे चालवली जातात.

या योजनेंतर्गत ३० महिलांकरिता ५० हजार रुपये इतके अनावर्ती अनुदान व साधारण ४ लाख रुपये इतके आवर्ती अनुदान दिले जाते. केंद्र शासनातर्फे या योजनेसाठी १०० टक्के साहाय्यक अनुदान संस्थेस परस्पर दिले जाते.

### नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह

नोकरी करणाऱ्या एकट्या, अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या स्त्रियांची संरक्षणाच्या दृष्टीने राहण्याच्या जागेची सोय करणे हे योजनेचे उद्दिष्ट आहे. याबाबतच्या केंद्राच्या नवीन नियमानुसार नोकरी करणाऱ्या महिलेचे मासिक उत्पन्न शहरी भागात ३० हजारपेक्षा जास्त नाही व ग्रामीण भागात २५ हजार रुपयांपेक्षा जास्त नाही अशा स्त्रियांना प्रवेश दिला जातो. ही वसतिगृहे स्वयंसेवी संस्थेमार्फत चालवण्यात येतात. स्वयंसेवी संस्था ही नोंदणीकृत असावी. या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थेला इमारत बांधकामाच्या एकूण खर्चाच्या ७५ टक्के रक्कम केंद्र शासनाकडून अनुदानाच्या स्वरूपात हप्त्याहप्त्याने दिली जाते. या योजनेंतर्गत १२९ संस्था कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता १०,१६८ इतकी आहे.

### स्टेप (महिलांसाठी प्रशिक्षण व रोजगाराकरिता कार्यक्रम)

या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांमधील कौशल्य वाढवून त्यांची व्यावसायिकदृष्ट्या उत्पादकता वाढवणे हा आहे. जेणेकरून त्या स्वत:च्या पायावर उभे राहून सक्षम होऊ शकतील. या योजनेंतर्गत महिलांना पशुपालन, डेअरी, मत्स्यव्यवसाय, हस्तकला, खादी ग्रामोद्योग, रेशमी किड्यांचे पालन इ. प्रकारच्या विषयातील प्रशिक्षण देण्यात येते. ही योजना स्वयंसेवी संस्थेमार्फत चालवण्यात येते. या योजनेंतर्गत लाभार्थींना प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता, त्यासाठी कर्मचारी वर्गाची नियुक्ती, कच्च्या मालाची उपलब्धता, पूरक सेवा उपलब्ध करणे यासाठी केंद्र शासनाकडून एकूण खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिले जाते. उर्वरित १० टक्के रक्कम ही स्वयंसेवी संस्थांनी उभारावयाची आहे. या योजनेसाठी कमीतकमी ५०० व जास्तीत जास्त १ हजार महिला असणे आवश्यक आहे. संस्थेला दोन हप्त्यात अनुदान दिले जाते. या योजनेंतर्गत १६ संस्था कार्यरत आहेत.





### उज्ज्वला

**महिला व मुलींच्या मानवी वाहतुकीला आळा घालण्यासाठी, स्त्रिया व मुलींचे लैंगिकशोषण थांबवण्यास व अशा पीडित महिलांची सुटका करून त्यांना संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करून त्यांना परत समाजात पुनर्स्थापित करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. यासाठी 'अ' गट शहरात २२ लाख ३६ हजार रुपये व 'ब' गटाच्या शहरासाठी २१ लाख ७६ हजार रुपये इतके आवर्ती साहाय्यक अनुदान दिले जाते. अ व ब गटाच्या शहरास १६ हजार रुपये इतके अनावर्ती अनुदान दिले जाते. अनैतिक वाहतूक प्रतिबंधासाठी कार्यरत असलेल्या उज्ज्वला या योजनेंतर्गत राज्यात एकूण ३४ प्रकल्प कार्यान्वित आहेत.**

### स्वाधार

या योजनेमध्ये निराधार, निराश्रित महिला, कैदी महिला, नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार झालेल्या, कुंटणखान्यातून मुक्त केलेल्या, बलात्कारित, लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या, हुंडाग्रस्त, एड्सग्रस्त महिलांना स्वेच्छेने प्रवेश दिला जातो. या महिलांना अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी सुविधांखेरीज मेडिकल सेंटर, हेल्पलाइन, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, मानसोपचार केंद्र, समुपदेशन केंद्र इत्यादी लाभ पुनर्वसनाच्या दृष्टीने देण्याचा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांना भाड्याची इमारत असल्यास प्रथम वर्षी १०० टक्के व दुसऱ्या वर्षापासून ७५ टक्के अनुदान दिले जाते किंवा बांधकामासाठी १०० स्त्रियांच्या निवासस्थानासाठी २५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. राज्यामध्ये ४८ संस्था मंजूर असून त्यांची लाभार्थी क्षमता २ हजार ५०० इतकी आहे.

**टीम लोकराज्य**

महिला दिन विशेष मुलाखत

# 'देऊ महिलांना समर्थ आधार'

**राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून श्रीमती विजया रहाटकर यांनी २४ फेब्रुवारी २०१६ रोजी पदभार स्वीकारला. लोकराज्य टीमशी बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या कार्यकाळात सर्व घटकातील महिलांना न्याय मिळेल, त्यांच्या समस्या सोडवल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. ८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त त्यांची ही खास मुलाखत.**

**दिल्लीमध्ये देशपातळीवर कार्य केल्यानंतर महाराष्ट्रामध्ये महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली आहे. हा बदल कसा वाटतो?**

दिल्लीमध्ये काम करताना मी जवळपास संपूर्ण देश पालथा घातला आहे. या निमित्ताने वेगवेगळ्या राज्यांमधल्या महिलांना भेटले. त्यांची परिस्थिती, समस्या या निमित्ताने माझ्यासमोर आल्या. परंतु महिला आयोगाची अध्यक्ष म्हणून प्रत्यक्ष या समस्यांवर काम करण्याची संधी आणि अधिकार मिळणे हा एक प्रकारे माझ्या आतापर्यंतच्या कार्याचा सन्मान आहे असे मला वाटते. त्यामुळे देशपातळीवर काम केल्याच्या अनुभवाच्या शिदोरीचा उपयोग मला ही जबाबदारी सांभाळतांना होईल असा मला विश्वास वाटतो.

**महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविताना नेमक्या कोणत्या सुधारणा कार्यकाळात करण्याचे ठरवले आहे?**

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर राज्यास एकीकडे मुंबई ते गडचिरोली अशा विविध स्तरांच्या भागात राहणाऱ्या शिक्षित-अशिक्षित, दुर्बल व आधुनिक घटकातील महिला आहेत. हा मोठा कॅनव्हास समजून घेताना नेहमी असे वाटते की, समाजमनाची जागृती आणि प्रबोधन हाच एकमेव या समस्यांना सोडवण्याचा उपाय आहे. महिलांच्या समस्या या फक्त त्यांच्यापुरत्या नसून त्यामध्ये संपूर्ण कुटुंब कधीकधी भरडले जाते. त्यामुळे फक्त महिलांचा विचार न करता पूर्ण कुटुंबाला महिलाविषयक हक्काप्रती जागरूक करणे व यासाठी उपाययोजना करण्याचे लक्ष्य आहे. त्यामुळे प्रबोधनामध्ये फक्त महिलांचे प्रबोधन करून चालणार नाही तर त्याबरोबरच त्यांच्या आजूबाजूला वावरणाऱ्या पुरुषांचे प्रबोधन करावे लागेल. त्यामुळे मी असे म्हणेल की, येत्या काळात महिला आयोग हा परिवार आयोग म्हणून कार्य करेल.

**आयोगाचे कार्य महिलांपर्यंत पोहोचवणे व आयोगामार्फत महिलांच्या समस्या सुटतात हा आत्मविश्वास कसा निर्माण कराल ?**

यासाठी व्यापक प्रमाणात जनप्रबोधनाचे व्रत आम्ही हाती घेणार आहोत. सर्वप्रथम आम्ही आमची यंत्रणा बळकट करणे आणि प्रशिक्षित करणे याकडे लक्ष देणार आहोत. महिला आयोगाकडे सुनावणीसाठी येणाऱ्या प्रकरणांची विभागवार वर्गवारी करून या सुनावण्या विभागीय स्तरावर घेण्याचा आमचा प्रयत्न असेल. यापुढे आयोगाचे काम जिल्हा तसेच तालुका असे घटक करून स्थानिकस्तरावर आयोग महिलांपर्यंत पोहोचवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. पुढील काळात एक हेल्पलाइन सुरू करण्यात येईल. याशिवाय एक मोबाइल ॲप महिलांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही तयार करणार आहोत. हे ॲप ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्हीप्रकारे चालू शकेल आणि संकटात असणाऱ्या महिलांचा कॉल ती ज्या भागात आहे त्या भागातल्या जवळच्या पोलीस स्टेशनला आपोआप



जोडला जाईल. याशिवाय जिल्हास्तरावर पोलिसांची महिला पथके कार्यरत आहेत. या महिला पथकांना प्रत्येक जिल्ह्यात वेगळे नाव आहे. कुठे दामिनी, रक्षिता, सौदामिनी अशी नावे या पथकांना देण्यात आली आहेत. या सर्व पथकांना एकत्रित आणून दामिनी नावाचे महिला पथक सुरू करण्याचे आम्ही ठरवले आहे.

**प्रवीण टाके**

**ग्रामीण भागातील महिला मोठ्या प्रमाणात अत्याचाराला बळी पडतात त्यांच्यासाठी आयोग नेमके काय करेल ?**

महाराष्ट्राच्याच नव्हे एकूण देशाच्या सर्व महिला समूहाचा विचार केला तर सध्याचा काळ हा सांस्कृतिक प्रदूषणाचा (कल्चरल पोल्यूशन) आहे. पूर्वापार परंपरा आणि मान्यतांना छेद बसला आहे. शेकडो नवे बदल रोज आमच्या संस्कृतीत मिसळत आहेत. अशावेळी समाजाची मानसिकता मात्र त्याप्रमाणात आणि त्या गतीने बदलत नाही. या परिस्थितीमध्ये आर्थिक

दुर्बलता असल्यामुळे, ग्रामीण भागातील महिलांना मोठ्या प्रमाणावर अत्याचारांना बळी पडावे लागते हे वास्तव आहे. त्यांचे प्रश्न हे कधीकधी कौटुंबिक, सामाजिक स्वरूपाचे असतात हे सोडवताना एक घाव दोन तुकडे करून चालत नाही. मला वाटते तसे करूही नये. कारण यामुळे या समस्यांवर कायमचे उपाय सापडत नाहीत. माझ्या दृष्टीने सोडवलेल्या प्रश्नांवर शाश्वत उत्तर मिळते, त्यामुळे हे सामोपचाराने सोडवावेत असे मला वाटते. महिलांना त्यांच्यासाठी असलेल्या कायद्याचे ज्ञान देण्यात आले तर त्या अधिक सक्षमपणे या प्रश्नांना सामोरे जाऊ शकतात. यासाठी आम्ही ग्रामीण भागातील महिलांच्या समुपदेशावर भर देण्याचे ठरविले आहे. बचतगटातल्या महिलांना दिवसभरातल्या एका विशिष्ट वेळेमध्ये गावातल्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पोलिसांना भेटता येईल, त्यांच्या समस्या सांगता येतील. तसेच कायद्यासंबंधी माहिती घेता येईल. यामुळे पोलीस आणि महिलांमध्ये एक सुसंवाद निर्माण होईल आणि समस्यांवर लगेच उपाययोजना होऊ शकेल. याशिवाय महिन्यातून एकदा गावागावांमध्ये महिला चौपाल (महिलांची चावडी) भरवण्याचाही आमचा विचार आहे ज्यामुळे महिलांना स्थानिकस्तरावर आयोगाची मदत मिळू शकेल.

**नोकरी-व्यवसाय करणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढत आहे. त्यांच्या समस्यांवर आयोगाचे काय धोरण असेल?**

कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिक शोषण ही तर समस्या आहेच याशिवाय त्यांची सुरक्षितता ही तेवढीच जटिल समस्या झाली आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीने लिव्ह इन रिलेशनशिप, सरोगसी यातून उदभवणाऱ्या समस्यांना नव्याने जन्माला घातले आहे. यातच सायबरक्राइम सोशल मीडियाद्वारे होणारी महिलांची छळवणूक याने भर घातली आहे. यासाठी या आधी सांगितलेले सुरक्षिततेचे उपाय आम्ही तर करणार आहोत, महिला शोषणासंबंधी कार्यालयीन स्तरावर कार्य करणाऱ्या विशाखा समितीची मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देण्यात येतील. तसेच या समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. सक्षमपणे त्यांनी महिलांच्या पाठीशी उभे राहावे यासाठी त्यांना अधिकारांचा वापर कसा करावचा हे शिकविले जाईल.




शाळा/महाविद्यालयीन स्तरांपासून एकमेकांचा आदर करणे त्यांना कसे शिकवता येईल हे बघायला हवे. नुसते मुलींना कायद्याचे ज्ञान देऊन चालणार नाही तर त्यांच्या बरोबरीने काम करणाऱ्या पुरुषांना, मुलांना महिलांप्रती आदर करणे शिकवावे लागेल.

**स्त्रीभ्रूण हत्येच्या प्रश्नासंबंधी तुम्ही एक पुस्तक लिहिले आहे, महाराष्ट्रातल्या या समस्येकडे तुम्ही कसे बघता ?**

संपन्न समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील भागांमध्ये स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण इतर मागास भागांपेक्षा अधिक आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यामागे समाजाची मानसिकता दिसून येते. स्त्री भ्रूणहत्येविरोधी कायदे पुरेसे कडक आहेत. पण त्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे झाली पाहिजे. महिला आयोग यासाठी कार्य करेल असे मी तुम्हाला सांगू शकते. महाराष्ट्रासारख्या आधुनिक राज्यात स्त्री भ्रूणहत्येसारखी समस्या असणे हे राज्याला लांच्छनास्पद आहे. त्यामुळे समाज प्रबोधनाद्वारे ही समस्या सोडवण्याचा आयोग प्रयत्न करेल.

**संपर्क : ०९७०२८५८७७७**

## दृष्टिपथात महिला आयोग

### पार्श्वभूमी

स्त्रियांच्या समाजातील दर्जाला संरक्षण देण्याच्या हेतूने भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ व १६ अन्वये स्त्रियांसंबंधी हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने, स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, राज्याच्या महिला धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विशेषत: संविधानाच्या अनुच्छेद ३८, ३९, ३९-अ व ४२ करिता राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर १९९३ साली महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

### आयोगाची रचना

आयोगामध्ये अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य, एक सदस्य सचिव, एक पदसिद्ध सदस्य म्हणून पोलीस महासंचालक राहतील.

### आयोगाची उद्दिष्टे

- स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे.
- स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करणे.
- स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्यांचे परिणामकारकरीत्या संनियंत्रण व अंमलबजावणी करणे.
- स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देणे.

### आयोगाचे अधिकार

आयोग एक वैधानिक व स्वयंशासित संस्था आहे. आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त असून या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी शासनाच्या सहमतीने राज्याच्या किंवा सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींच्या सेवांचा वापर करील. कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास फर्मावू शकेल. दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावू शकेल. कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवू शकेल.

**या ठिकाणी महिलांना साधता येईल संपर्क**

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

Email- mscwmahilaayog@gmail.com | Website- www.mahilaayog.maharashtra.gov.in

**दूरभाषा - ०२२-२६५९०७३९ (अध्यक्ष) / समुपदेशक - ०२२-२६५९०४७४, २६५९०८७८**




'मेक इन इंडिया सप्ताह' प्रदर्शनातील महाराष्ट्राच्या दालनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

# 'मेक इन इंडिया'त झळकला महाराष्ट्र

**महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक भरारीला उभारी देणारा एक राष्ट्रीय सोहळा 'मेक इन इंडिया सप्ताह' १३ ते १८ फेब्रुवारी या काळात मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलात पार पडला. मेक इन इंडियातून मेक इन महाराष्ट्राला प्रचंड बळकटी मिळाली आहे. या सप्ताहांतर्गत २५९४ सामंजस्य करार झाले आहेत. जवळपास ८ लाख कोटी रुपयांची महाराष्ट्रात गुंतवणूक होणार असून ३० लाख नवीन रोजगारांची निर्मिती होणार आहे.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वबळावरील भारत निर्माणाचे स्वप्न या माध्यमातून जगासमोर मांडण्याची संधी मेक इन इंडिया सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्राला मिळाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणि त्यांच्या टीम महाराष्ट्राने जागतिक पातळीवरील हॅनोव्हर उद्यममेळ्याच्या तोडीचे यशस्वी आयोजनातून या संधीचे सोने केल्याचे जगाला दिसून आले. या माध्यमातून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या 'टीम महाराष्ट्रा'ने गुंतवणूकच नव्हे तर 'मेक इन महाराष्ट्रा'ची मुहूर्तमेढ रोवली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कामगिरीकडे या सर्वांचे लक्ष होते. राज्य शासनाच्या उद्योग विभागाने केंद्र शासनाच्या औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभाग व भारतीय औद्योगिक महासंघ (सीआयआय) यांच्या सहकार्याने मेक इन इंडिया सप्ताहाचे आयोजन केले होते. भारताची उत्पादन निर्मिती क्षमता, डिझाइन क्षेत्रात देशाचे स्थान या सोहळ्यामुळे

## महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले धोरण

- किरकोळ व्यापार धोरण
- इलेक्ट्रॉनिक्स धोरण
- सागरी किनारा विकास धोरण
- एक खिडकी योजना
- अनुसूचित जातीजमातींच्या उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रोत्साहन योजना

अधोरेखित झाले. मेक इन इंडियाचे यशस्वी आयोजन करतानाच देशविदेशातील उद्योगांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी तयार करण्याचे मोठे आव्हान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह उद्योग विभागासह विविध विभागाकडे होते. मात्र, गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्र आजही पहिल्या पसंतीचे राज्य असल्याचे या सप्ताहात झालेल्या सामंजस्य करारातून दिसून आले आहे. जगातील अनेक देश मंदीच्या गर्तेत सापडत असतानाच भारत मात्र अजूनही आर्थिकदृष्ट्या स्थिर आहे. एवढेच नव्हे तर भारताने उत्पादन निर्मितीत आपण मागे नाही तर जगाच्या दोन पावले पुढे आहोत हे मेक इन इंडिया सप्ताहाच्या आयोजनातून दाखवून दिले आहे.

### उद्योगजगतातही आकर्षण

याशिवाय भारतीय उद्योग जगतातील टाटा ग्रुपचे रतन टाटा व सायरस मिस्त्री, बिर्ला ग्रुपचे कुमारमंगलम बिर्ला, अदानी ग्रुपचे गौतम अदानी, जीव्हीके ग्रुपचे जी.व्ही. संजय रेड्डी, पिरामल ग्रुपचे अजय पिरामल, आयटीसी ग्रुपचे वाय.सी. देवेश्वर यांच्यासह विदेशातील सिस्को सिस्टिमचे जॉन चेंबर्स, स्वीडनचे मार्कूस वेलबर्ग, हाकेन बुस्के, म्वेचे डोग्यू देव्होस, अमेरिकेचे एडवर्ड मोन्सर, पोलंडमधील इरिक्सन कंपनीचे मॅटस् एच ओलसन आणि कारोल झाराझोल या उद्योगातील आयकॉन्सनी भारतीय उद्योग क्षेत्राबद्दल माहिती घेऊन गुंतवणुकीच्या संधीचे अवलोकन केले.

## विविध क्षेत्रातील गुंतवणूक (रोजगार निर्मिती)

- ऊर्जा – २ लाख ३० हजार ६२६ कोटी (२० हजार, ८१७)
- औद्योगिक निर्मिती – १ लाख ६५,९०९ कोटी (१ लाख ३२ हजार २९६)
- औद्योगिक सुविधा – ९२,४४०.२३ कोटी (६ लाख ८८ हजार १५८)
- रियल इस्टेट – १,१०,००० कोटी (७ लाख ६५ हजार)
- सिडको – ३७,८६१ कोटी
- दूरसंचार – ३१,००० कोटी (४ हजार)
- वस्त्रोद्योग – २२ हजार ७३५ कोटी ५२ लाख (२ लाख ३ हजार ७७१)
- टो अँड टो कंपोनंन्ट – २२ हजार १३९ कोटी ४९ लाख (२० हजार ९८)
- सूक्ष्म आणि लघुउद्योग – २२,१३७ कोटी (१ लाख १७ हजार)
- माहिती तंत्रज्ञान पार्क – २१ हजार २४६ कोटी (३ लाख ९१ हजार ४२५)
- पर्यटन – १२ हजार ४९९ कोटी ५१ लाख (५,१२७)
- कृषी व अन्नप्रक्रिया – ८ हजार ५२५ कोटी ४ लाख (६ हजार ८२२)
- महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (एमएमबी) – ६ हजार कोटी (१ हजार)
- माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवा क्षेत्र (आयटीईएस) – ३७७२ कोटी ६ लाख (१ हजार ५१०)
- किरकोळ व्यापार – ३ हजार ५८५ कोटी (१९ हजार ३४० )
- वैद्यकीय – २ हजार कोटी (३ हजार)
- पशुसंवर्धन – २५० कोटी (४००)
- इतर क्षेत्रातील गुंतवणूक – १३२९.२० कोटी (८ हजार १७३)
- कौशल्य विकासातून ७ लाख २ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.

## महाराष्ट्रातील विभागनिहाय गुंतवणूक

- मराठवाडा व विदर्भ – १ लाख ५० हजार कोटी रुपये
- खानदेश – २५ हजार कोटी
- पुणे – ५० हजार कोटी,
- मुंबईसह कोकण विभाग – ३ लाख २५ हजार

## ठळक आणि ठसठशीत

- **देशातील एकूण गुंतवणूक – १५ लाख २० कोटी**
- **गुंतवणुकीसाठी विचारणा – १ लाख ५ हजार कोटी रुपये**
- **सहभाग – १०२ देश व १७ राज्ये**
- **बैठकांची संख्या – ८ हजार २४८**
- **चर्चासत्रांमधील सहभागी वक्ते – १२५० वक्ते**
- **सप्ताहाला भेट देणाऱ्यांची संख्या – ९ लाख**

## 'मेक इन इंडिया'तील गुंतवणूक करार

- बीएई आणि महिंद्रा कंपनी एम ७७७ हॉत्झरचे असेम्बलिंग करार
- ओरॅकल कंपनी ४०० मिलियन डॉलर्सची गुंतवणूक करणार असून एकूण ९ इन्क्युबलेक्शन सेंटर उभारणार
- त्रिव्हीट्रॅन कंपनीद्वारे चेन्नईमध्ये आरोग्यविषयक उत्पादनाचे युनिट
- गुजरात राज्य शासन व व्हेटास (डेन्मार्क) यांच्यात पवन ऊर्जेसाठी लागणारे पंखे तयार करण्यासंदर्भात करार.
- गुजरातमध्ये मरिन ॲप्लिकेशन उभारणीसाठी गुजरात राज्य व फ्रान्सची टार काव्होस सिस्टिम कंपनी यांच्यात करार
- नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पासाठी फ्रान्सची टारकाव्होस सिस्टिम आणि कर्नाटक शासन यांच्यात करार
- एस बँक आणि आयआरइडीए यांच्यात नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी वित्त पुरवठ्यासंदर्भात करार
- असेनडास ही कंपनी ४ हजार ५७१ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून १.९ लाख रोजगार निर्माण होणार
- झारखंड राज्य शासन व वेदांता लिमिटेड यांच्यात करार
- झारखंड राज्य शासन व अदानी समूह यांच्यात थर्मल पॉवर प्रकल्पासाठी करार. यातून १६०० मेगावॅट वीज निर्मिती होणार.
- कोळशावर आधारित खत निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी झारखंड व अदानी समूह यांच्यात करार
- महाराष्ट्र शासनाचे कौशल्य व उद्योजकता विकास विभाग व उबेर यांच्यात करार
- महाराष्ट्र शासन व सोलर उद्योग यांच्यात नागपूर येथे संरक्षण विभागासाठी शस्त्र बनवण्यासंदर्भात महत्त्वाचा करार

## विदेशी नेत्यांची हजेरी

**मेक इन इंडिया सप्ताहात स्वीडनचे प्रधानमंत्री स्टेफन लोफेव्हेन, पोलंडचे प्रधानमंत्री जुहा सिफिला, पोलंडचे पहिले उपपंतप्रधान पिटर ग्लिनस्की, जपानचे उद्योग, अर्थ विभागाचे मंत्री योसुकू ताकाजी, मेक्सिकोचे आशिया व मध्य पूर्व विभागाचे मंत्री सेसर फेरगोसी, इंडोनेशियाचे परिहवन मंत्री इग्नासीस जोहान, जपानचे उद्योगमंत्री सोमप्रसाद पांडे हे जागतिक नेते आणि विविध उद्योगसमूहांचे प्रमुख उपस्थित होते.**

मेक इन इंडिया सप्ताहाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र शासनाचे तीन महत्त्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये व्टिन स्टार टेक्नॉलॉजी (वेदांत ग्रुप) मराडवाडा किंवा विदर्भात सुमारे २ हजार कोटींची गुंतवणूक करून एलसीडी फॅब प्रकल्प उभारणार आहे. कोकाकोला संत्रा उत्पादनासाठी प्रयत्नशिल असून नागपूर आणि अमरावती येथे संत्र्यावर प्रक्रिया प्रकल्प उभारणार आहे. रेमंड इंडस्ट्रिज कंपनी १ हजार ४०० कोटी रुपये गुंतवून नागपूर येथे एकात्मिक वस्त्रोद्योग प्रकल्प उभारणार आहे.

सिडकोच्या नैना प्रकल्पासाठी खालापूर येथील शेतकऱ्यांनी स्वयंप्रेरणेने देऊ केलेल्या ३५०० हेक्टर जमिनीबाबतचा राज्यशासन आणि शेतकरी यांच्यातील सामंजस्य करार हा सप्ताहातील सर्वात महत्वाचा ठरला.



**जर्मन शिष्टमंडळासोबत मैत्री करार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.**




## मॅग्नेटिक महाराष्ट्राचे विशेष दालन

या सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांनी सर्वाधिक भेट दिलेले मॅग्नेटिक महाराष्ट्राचे विशेष दालन. या दालनाने अन्य दालनाच्या तुलनेत गर्दीचा उच्चांक मोडला. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, वनक्षेत्र, उद्योगनगरी, चित्रपट उद्योग, वस्त्रोद्योग, हस्त व्यवसाय, वाद्य निर्मिती अशा अनेक पोस्टर्स, चित्रमय कलाकृती प्रेक्षकांच्या नजरेत भरत होत्या. या ठिकाणी या खास आयोजनासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित करण्यात आलेला महाराष्ट्र अहेड हा अंक राज्याची औद्योगिक भरभराट व्यक्त करीत होता. प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांनी या दालनाचे फित कापून उद्घाटन केले. महाराष्ट्राच्या औद्योगिक, कृषी, पायाभूत सुविधा आदी क्षेत्रातील भरभराटीच्या प्रतिकृती या ठिकाणी पाहावयास मिळाल्या. देशविदेशातील शिष्टमंडळांनी या दालनाला भेट दिली.

मेक इन इंडियामध्ये १०२ देशांनी सहभाग नोंदवला. राज्य आणि देशविदेशातील संस्थांकडून प्रदर्शनासाठी सज्ज झालेली २१५ दालने त्यामध्ये १५० कार्यक्रमांमध्ये १२५० वक्त्यांनी सहभाग नोंदवला. देशविदेशातून आलेल्या ९ लाख नागरिकांनी भेट दिली. या मैदानावर गर्दी पाहायला मिळाली ती तरुणाची! तरुणांना संशोधन आणि नवनवीन कल्पनांना वाव मिळावा म्हणून एक स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत विजयी ठरला तो राजेश मनपट हा तरुण! त्याने वेअर हाऊसिंग सॉफ्टवेअरसाठी 'आर्करोबोट' नावाचे सॉफ्टवेअर सादर केले होते. त्याला पुढील संशोधनासाठी दोन कोटी रुपयांचा चेक दिला गेला.

'मेक इन इंडिया सप्ताहा'च्या निमित्ताने अनेक राज्याच्या दालनामध्ये पारंपरिक लोकजीवनाची दालने होती. विविध राज्यांच्या दालनात त्या त्या राज्याची संस्कृती त्यांनी उभी केली होती. दालनाबाहेर मात्र विविध राज्यांतील लोककलांचे आविष्कार आणि लोकसंगीताचे स्वर घुमत होते. यामध्ये काश्मीर, पंजाब, केरळ, हरयाणा, राजस्थान, आंध्रप्रदेश, तामीळनाडू सगळ्याच राज्यांची लोककला सादर होत होती.

**– डॉ. संभाजी खराट, नंदकुमार वाघमारे आणि टीम लोकराज्य**

## महाराष्ट्रातील महत्त्वाचे गुंतवणूक करार

- फळांवर प्रक्रिया करणारा प्रकल्प सुरू करण्याबाबत राज्याचा कृषी विभाग आणि पेप्सिको कंपनी यांच्यात सामंजस्य करार.
- मोन्सेन्टो कंपनीतर्फे बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथे देशातील सर्वात मोठे सीड हब उभारणार
- क्रेडाई आणि एमसीएचआय हे राज्यात १.१ लाख कोटी रुपये गुंतवून ५ लाख ७ हजार परवडणारी घरे बांधणार
- महिंद्रा आणि महिंद्रा कंपनी चाकण येथे ६५०० कोटी व नाशिक येथे १५०० कोटी रुपये गुंतवणूक करणार
- रिलायन्स उद्योग समूह ५० हजार कोटींची गुंतवणूक राज्यात करणार आहे.
- महाराष्ट्र शासनाचे कौशल्य व उद्योजकता विकास विभाग व उबेर यांच्यात करार
- महाराष्ट्र शासन व सोलर उद्योग यांच्यात नागपूर येथे संरक्षण विभागासाठी शस्त्र बनवण्यासंदर्भात १५०० कोटींचा करार
- राष्ट्रीय रासायनिक आणि खते कंपनी (आरसीएफ) ६ हजार २०४ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार
- गोदरेज इन्डस्ट्रीज ३ हजार कोटी गुंतवणूक करणार असून २ हजार रोजगार निर्माण होतील.
- जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लिमिटेड कंपनी ६ हजार कोटी रुपये गुंतवणूक आणि एक हजार रोजगार निर्मिती
- सिडको व ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल इंडियामध्ये सामंजस्य करार
- देशातील पहिल्या हवाई रुग्णवाहिकेसंदर्भात राज्य शासन व मॅब एव्हिएशन यांच्यात १० हवाई रुग्णवाहिकांचा करार
- किरकोळ व्यापार क्षेत्रातील फ्यूचर ग्रुप (८५० कोटी रुपये), ट्रेन्ट हायपरमार्केट (४०० कोटी), डी मार्ट (२५० कोटी), मेजर ब्रँडल (५० करोड), मेट्रो शूज (५० करोड), शॉपर्स स्टॉप (३० करोड) या कंपन्यांबरोबर करार
- अभियांत्रिकी क्षेत्रातील ऑटोडेस्क कंपनी ४१२ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार
- भिवंडीमध्ये एकात्मिक औद्योगिक वसाहत उभारणीसाठी रेनेसान्स कंपनी ८५६९ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार
- तारापूर येथे लिनन कापड निर्मितीसाठीचा ५३५ कोटी रुपयांचा प्रकल्प लिनन आर्ट प्रायव्हेट लिमिटेड तर्फे उभारण्यात येणार
- जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टलगत बायोडिझेल निर्मितीचा प्रकल्प सुमेरू कंपनीतर्फे उभारण्यात येणार आहे.
- व्होडाफोन कंपनीतर्फे सहा हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा सर्व्हिस केंद्र आणि नेटवर्क विस्तारीकरणाचा प्रकल्प उभारण्यात येणार
- नागपूरमधील मिहान येथे जागतिक दर्जाचा लॉजिस्टिक पार्क तयार करण्यासाठी सनटेक रियलटीची १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक

# निर्धार स्वच्छतेचा, सुंदर महाराष्ट्राचा




समृद्ध आणि सशक्त राष्ट्रउभारणीची वाट पायाभूत सुविधांबरोबरच स्वच्छतेतून जाते. स्वच्छतेतून समृद्धीकडे जाण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी 'स्वच्छ भारत अभियान'ची घोषणा केली. स्वत: हातात झाडू घेऊन स्वच्छतेला सुरुवात केली. स्वच्छ भारतचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मे २०१५ मध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या प्रेरणेने आणि नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर–म्हैसकर यांच्या पुढाकाराने महाराष्ट्राने 'स्वच्छतेची सप्तपदी' टाकली. या कार्यक्रमांतर्गत विविध नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांनी व मुख्याधिकाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. अवघ्या चार महिन्यात २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने 'स्वच्छ भारत अभियान' यशस्वितेकडे वाटचाल करत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान'ची घोषणा केली. प्रधानमंत्र्यांच्या 'एक कदम स्वच्छता की ओर' या आवाहनास प्रतिसाद देत महाराष्ट्राने 'एक कदम' नव्हे तर 'सप्तपदी स्वच्छतेची'च्या माध्यमातून सात पावले टाकली आहेत. गेल्या वर्ष-सव्वा वर्षात ५५ शहरे हागणदारीमुक्त व तीन शहरे संपूर्ण स्वच्छ शहरे झाली आहेत. या यशात महिला नगराध्यक्षांचा सिंहाचा वाटा आहे. स्वच्छता ही सवय बनल्यास २०१९ पूर्वीच महाराष्ट्र हे देशातील पहिले स्वच्छ राज्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.**

**राजाराम देवकर**

१९ नगरपरिषदा हागणदारीमुक्त झाल्या. त्यानंतर या अभियानाने आणखी जोर पकडला. हे अभियान न राहता लोकचळवळ बनले. याचाच परिपाक म्हणजे अवघ्या तीन-चार महिन्यात म्हणजेच २ ऑक्टोबर २०१५ ते २६ जानेवारी २०१६ या कालावधीत तब्बल ३६ शहरे हागणदारीमुक्त व स्वच्छ झाली. ३५ शहरांचे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी तसेच पहिल्या हागणदारीमुक्त कोल्हापूर महानगरपालिकेचे महापौर व आयुक्त यांचा सत्कार समारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे ३ फेब्रुवारी २०१५ रोजी पार पडला. यावेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई, नगरविकास राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, नगरपालिका संचालनालयाच्या आयुक्त तथा संचालक (प्रशासन) श्रीमती मीता लोचन आदी उपस्थित होते. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची भूमिका मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, 'भौतिक सुविधा निर्माण करून राष्ट्र विकसित होत नाही, तर जोपर्यंत आपण पर्यावरणपूरक व आरोग्यदायी राहणीमान तयार करीत नाही; तोपर्यंत विकसित राष्ट्र होऊ शकत नाही. आपण निसर्गाशी खेळ केल्याने निसर्गही आपल्याशी नैसर्गिक आपत्ती, रोगराईच्या माध्यमातून खेळ करीत असतो. त्यामुळे हागणदारीमुक्त शहरे, घनकचरा विलगीकरण, सांडपाणी प्रक्रिया या माध्यमातून निरोगी शहरे निर्माण करून शाश्वत विकास साधता येईल.' त्याचबरोबर शहरे स्वच्छ करण्यासाठी सोप्या तंत्रज्ञानाची निवड, नागरिकांवर कराचा कमी बोजा व अधिकाधिक, नवनवीन कल्पना वापरून शाश्वत विकास हे तंत्र अवलंबण्याच्या सूचना त्यांनी नगरपालिकांना केल्या.




## पथदर्शी



**स्वच्छ महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीच्या दिशेने ३६ शहरांनी टाकलेले यशस्वी पाऊल इतरांसाठी पथदर्शी ठरणार आहे. स्वच्छ झालेल्या शहरांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. त्यांना सर्व योजनांचा लाभ दिला जाईल. हागणदारीमुक्त व संपूर्ण स्वच्छ झालेल्या अ, ब व क वर्ग नगरपरिषदांना अनुक्रमे दोन, दीड व एक कोटी रुपये एवढे अनुदान प्रोत्साहन म्हणून दिले जाईल. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला आता लोकचळवळीचे रूप आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र २०१७ पर्यंत हागणदारीमुक्त व २०१९ पर्यंत संपूर्ण स्वच्छ होणार आहे, असा मला विश्वास आहे.**

### स्त्री शक्तीचा स्वच्छता जागर

२ ऑक्टोबर २०१५ ते २६ जानेवारी २०१६ या कालावधीत हागणदारीमुक्त व स्वच्छ झालेल्या ३५ नगरपरिषदांपैकी २२ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षा महिला आहेत. या नगरपरिषदांच्या बहुतांश मुख्याधिकारी महिला आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील पहिल्या हागणदारीमुक्त झालेल्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौरदेखील या महिला आहेत. त्यामुळे घरासोबतच आपला परिसर, शहरेदेखील महिला स्वच्छ ठेऊ शकतात हे त्यांनी सिद्ध केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सत्कार समारंभाच्या वेळी सांगितले. त्यांचे विशेष अभिनंदनही त्यांनी केले. त्यासोबतच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)ची धुरा सांभाळणाऱ्या नगरविकास विभागाच्या सचिवदेखील महिला आहेत याकडे लक्ष वेधून मुख्यमंत्र्यांनी श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या कार्याचे कौतुक केले. दरम्यान स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत १ मे २०१६ पर्यंत १०० हून अधिक शहरे हागणदारीमुक्त व २५ शहरे संपूर्ण स्वच्छ करण्याचा निर्धार कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात श्रीमती पाटणकर-म्हैसकर यांनी व्यक्त केला.

### स्वच्छ शहरांसाठी प्रोत्साहन अनुदान

स्वच्छ महाराष्ट्र अभियान यशस्वी करण्यासाठी राज्यात अधिकाधिक स्वच्छ शहरे निर्माण व्हावी म्हणून हागणदारीमुक्त व संपूर्ण स्वच्छ झालेल्या नगरपरिषदांना प्रोत्साहन निधी दिला जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. अ वर्ग नगरपरिषदेस २ कोटी रुपये, ब वर्ग नगरपरिषदेसाठी १.५ कोटी रुपये तर क वर्ग नगरपरिषदेसाठी १ कोटी रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. हे अनुदान दोन टप्प्यात दिले जाईल. पहिल्या टप्प्यात ३० टक्के अनुदान तर उर्वरित ७० टक्के रक्कम ६ महिन्यांनंतर पुनर्तपासणीनंतर दिली जाणार आहे.

### सभागृह भारवले...

मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे ३ फेब्रुवारी २०१६ रोजी हागणदारीमुक्त व स्वच्छ झालेल्या शहरांच्या नगराध्यक्षांचा आणि मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या ठरावीक वेळेच्या तासभर आधीच सभागृह तुडुंब भरले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

## ‘स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट’

महाराष्ट्रातील प्रमुख आणि रमणीय प्रेक्षणीय स्थळ पाचगणी येथे एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात होता. त्यामुळे कालांतराने या ठिकाणाला कचरा पॉईंट अशा नावाने ओळखले जाऊ लागले. परंतु स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या ‘स्वच्छतेची सप्तपदी’ कार्यक्रमांतर्गत पाचगणी नगरपरिषदेने शहरात प्रभावी स्वच्छता अभियान राबवले. त्याला शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. बघता-बघता संपूर्ण शहर कचरामुक्त झाले. कचरा पॉईंट म्हणून प्रसिद्ध असलेले ठिकाण आता ‘स्वच्छ भारत - स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट’ म्हणून ओळखले जात आहे.

स्वच्छ शहर



स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत हागणदारीमुक्त शहर केलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौर अश्विनी रामाण व अधिकाऱ्यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

### ‘स्वच्छ महाराष्ट्र अभियान’

- २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत १९ नगरपरिषदा व मुंबई शहरातील बी व सी वॉर्ड हागणदारीमुक्त
- २ ऑक्टोबर २०१५ ते २६ जानेवारी २०१६ या दुसऱ्या टप्प्यात तब्बल ३२ नगरपरिषदा व एक महानगरपालिका हागणदारीमुक्त
- तीन शहरे संपूर्ण स्वच्छ
- १ मे २०१६ पर्यंत तिसऱ्या टप्प्यात १०० हून अधिक शहरे हागणदारीमुक्त व २५ शहरे संपूर्ण स्वच्छ होणार
- हागणदारीमुक्त नगरपरिषदा - चिखलदरा, मुरुड-जंजिरा, पेण, कर्जत, राजापूर, मालवण, काटोल, मोहपा, रामटेक, उमरेड, महादुला, मुरगुड, गडहिंग्लज, कुरुंदवाड, कागल, वडगाव, जयसिंगपूर, सासवड, इंदापूर, जेजुरी, शिरूर, तळेगाव, रहिमतपूर, दुधणी, मंगळवेढा, अक्कलकोट, मैदर्गी, सांगोला, शिरपूर-वरवडे, फैजपूर, त्रिंबक, शिर्डी.
- हागणदारीमुक्त महानगरपालिका - कोल्हापूर महानगरपालिका.
- संपूर्ण स्वच्छ शहरे - पांचगणी, वेंगुर्ला व देवळाली प्रवरा.

होणार असल्याने बहुतेक नगराध्यक्ष जोडीदारासोबत तसेच मुख्याधिकारी सभागृहात हजर होते. स्वच्छतेच्या सप्तपदीने भारावलेल्या सभागृहात त्यांचा मुख्यमंत्री व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी प्रत्येकाला मुख्यमंत्रिमहोदयांसोबत छायाचित्र घेण्याची इच्छा आवरता आली नाही. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, तुम्ही आपला गाव स्वच्छ करा, ती मला तुमच्यासोबत फोटो काढण्याची संधी असेल. स्वच्छ महाराष्ट्र अभियानात नागपूर, पुणे, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांत ५ पेक्षा अधिक नगरपरिषदा हागणदारीमुक्त केल्याबद्दल पुणे विभागाचे विभागीय आयुक्त एस. चोक्कलिंगम, पुण्याचे जिल्हाधिकारी सौरभ राव, सोलापूरचे जिल्हाधिकारी तुकाराम मुंडे, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांचाही सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

## ‘हॅन्डबूक ऑफ टेक्नॉलॉजी’

घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रियेबाबत ‘हॅन्डबूक ऑफ टेक्नॉलॉजी’ या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी तांत्रिक साहाय्य मिळण्यासाठी जर्मन सरकारच्या सहकार्याने जीआयझेड या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला. कमी खर्चात आपले शहर कसे स्वच्छ करता येईल, त्यासाठी कोणत्या कल्पना आणि तंत्रज्ञान वापरता येईल याचा वस्तुपाठ या हॅन्डबूक ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आहे. नागरिकांवर कराचा अधिक बोजा पडणार नाही अशा तंत्रज्ञानाची ओळख यात आल्याने ते नगरपालिकांसाठी मार्गदर्शक ठरेल.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

### उद्याचे काम आज केले

**लोकप्रतिनिधी, नगरसेवक, पदाधिकारी महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी यांच्या पुढाकारानं उद्याचे काम आज व आजचे काम आता या निर्धाराने तसेच महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळे कोल्हापूर शहर हागणदारीमुक्त करू शकले. सर्वांच्या सहकार्यातून शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्याचा निर्धार आहे.**

**- अश्विनी अमर रामाणे, महापौर, कोल्हापूर महानगरपालिका**

### आधी सुविधा दिल्या

**आधी सार्वजनिक ठिकाणी शौचालये उपलब्ध करून दिली. तेथेही गर्दी होऊ लागल्याने वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून दिली. नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण केली. सर्वांना स्वच्छतेचे महत्त्व पटले. त्यामुळे मोहिमेला चळवळीचे रूप आले.**

**तुकाराम मुंडे, जिल्हाधिकारी, सोलापूर**

### कचऱ्याचे वर्गीकरण केले

**शहर स्वच्छ करण्यासाठी आम्ही आधी कचऱ्याचे वर्गीकरण केले. ओला-सुका कचरा वेगळा केलेला असेल तरच तो उचलला जायचा. त्यामुळे नागरिकांनाही वर्गीकरणाची सवय लागली. याच माध्यमातून १०० टक्के प्लास्टिकमुक्तीही करता आली.**

**श्रीमती लक्ष्मी कराडकर, नगराध्यक्षा, पाचगणी**

### शाश्वत विकासाच्या वाटेवर

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान शाश्वत विकासाच्या वाटेवर आहे. आम्ही घरोघरी शौचालय असावे यासाठी जनजागृती केली. शौचालये बांधून दिली. नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शहर हागणदारीमुक्त झाले.**

**राहुल देशमुख, नगराध्यक्ष, काटोल**

### स्वच्छ महाराष्ट्र अभियान गीत

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला गती मिळावी, मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी या उद्देशाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित स्वच्छता अभियान गीत 'किती दिवस, किती दिवस..' व राज्य अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) निर्मित 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान आशय' गीताचे लोकार्पण करण्यात आले. स्वच्छतेविषयीची जाणीवजागृती व्यापक प्रमाणावर करण्याची शक्ती या गाण्यांच्या बोलामध्ये आहे. अनेक दिग्गज कलाकारांनी या उपक्रमामध्ये सक्रीय सहभाग नोंदवला आहे. ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर लिखित स्वच्छ महाराष्ट्र अभियान आशय गीताला ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांनी संगीतबद्ध केले असून स्वर बेला शेंडे व स्वप्नील बांदोडकर यांचे आहेत.

### स्वच्छ शहरांनी हे केले...

आपले घर आणि शहर स्वच्छ राहावे असे कुणलाही वाटते. परंतु त्यासाठी सुरुवात स्वत:पासूनच करायची असते. ही बाब लक्षात घेऊन अनेक नगरपरिषदांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियानाविषयी जनजागृती केली. शौचालय, कचरामुक्त व प्लास्टिकमुक्त परिसर ही नागरिकांची गरज निर्माण केली. स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटले आणि या अभियानाचे लोकचळवळीत रूपांतर होण्यास सुरुवात झाली. शहरे स्वच्छ होऊ लागली. कागल नगरपरिषदेने हागणदारीमुक्त, घनकचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक बंदी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून स्वच्छतेची सप्तपदी सिद्ध केली. तर कोल्हापूर जिल्ह्यातील मलकापूर नगरपरिषदेने कचरा सफाईसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिला. देवळाली नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनाबरोबरच स्वच्छता सप्ताह राबवून जनजागृती केली. स्वच्छता आणि वृक्षारोपणावर भर दिला. नाल्याची संपूर्ण स्वच्छता केली. नाल्यात कचरा टाकला जाऊ नये यासाठी दोन्ही बाजूंनी जाळ्या बसवल्या. दापोली नगरपंचायतीने इको फ्रेंडली कचरा व्यवस्थापन आभियान राबवून हागणदारीमुक्तीसोबतच राज्यातील पहिली प्लास्टिकमुक्त नगरपंचायत होण्याचा सन्मान मिळवला. काही शहरांनी घर तिथे शौचालय आणि घनकचरा निर्मूलनावर भर दिला. कचऱ्याचे वर्गीकरण केले. शहरातून दररोज निर्माण होणारा ओला तसेच सुका कचरा डंपिंग ग्राऊंड येथे आणून त्याचे विलगीकरण केले. ओला कचरा वीजनिर्मितीसाठी तर सुका कचरा गांडूळखत निर्मितीसाठी वापरला. तर प्लास्टिक, काचा, रबर अशा कचऱ्याचा पुनर्वापर केला.

### स्वच्छ महाराष्ट्र अभियान आशय गीत

*गाव, शहर वा वाडी वस्ती नको कुठेही घाण*
*आरोग्याचे, सुंदरतेचे राज्याचे अभियान*
*हजार कंठामधून गाऊया निर्धाराचे गान*
*आरोग्याचे, सुंदरतेचे राज्याचे अभियान*
*स्वच्छता अभियान*
*स्वच्छ महाराष्ट्र अभियान*
*शहरातील घनकचरा, दूषित पाणी स्वच्छ करून*
*करून प्रक्रिया, त्यातून होतील जैव खते निर्माण*
*शौचालय बांधू सकलांना, घेऊनिया अनुदान*
*उदंड सहभागाने निर्मळ शहरांचे अभियान*
*स्वच्छता अभियान*
*स्वच्छ महाराष्ट्र अभियान*
*हागणदारीचे, दुर्गंधीचे, नको आता ते गाव*
*छानसे संडास बांधुनी, नवे उभारू गाव*
*मार्गी लावू कचरा सगळा, बांधू गटारे छान*
*घराभोवती झाडे थोडी, हिरवाई लेऊन*
*स्वच्छता अभियान*
*स्वच्छ महाराष्ट्र अभियान*
*अबलांच्या डोळ्यातील पाणी, त्यांची करुण कहाणी*
*बदलू आता चला गाऊया नव्या यशाची गाणी*
*सुंदर परिसर असा घराशी रांगोळ्या वेळून*
*सांजेला तुळशी वृंदावन, सुगंध घरभर छान*
*स्वच्छता अभियान, स्वच्छ महाराष्ट्र अभियान...*

**– ना. धों. महानोर**

संपर्क : ०९९७०७२९९६८

# आपली स्मार्ट शहरे

**केंद्र सरकारने स्मार्ट सिटीची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. ही योजना बदलत्या विश्वाचा वेध घेऊन आखली गेली आहे. शहरांचे नियोजन अतिशय योग्यरीत्या आणि बदलती जीवनशैली लक्षात घेऊन ही योजना राबवण्यात येणार आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या पहिल्या १०० शहरांच्या यादीत पुणे आणि सोलापूर यांचा समावेश झाला आहे. या दोन्ही शहरांनी स्मार्ट सिटी होण्याच्या अनुषंगाने राबवलेल्या आराखड्यावर आधारित विशेष वृत्तांत..**




## स्मार्ट पुणे

पुणे ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, राजकीय, सामाजिक आणि माहिती तंत्रज्ञान अशा अनेक अंगाने अतिशय महत्त्वाचे, असे शहर आहे. पुण्याला 'ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट' असे म्हटले जाते. या सर्व बाबींचा विचार करतानाच पुण्याची निवड योजनेत होणे अपेक्षित होते.

### संकल्पना

प्रत्येक शहराची एक परंपरा असते. पुण्याची खास अशी एक संस्कृती आहे. ही संस्कृती वेगाने बदलत आहे. पुण्याच्या गरजा पूर्ण करू शकेल अशी एक सर्वंकष जीवनशैली व कार्यप्रणाली स्मार्ट सिटी योजनेतून साकार होईल. पुणे शहरात शिक्षण घेण्यासाठी देशाच्या विविध भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची, प्रवासाची आणि इतर आनुषांगिक गरजा पूर्ण करण्यासाठीही आवश्यक असणाऱ्या सुविधा या स्मार्ट सिटीच्या योजनेतून पूर्ण होतील.

### सध्याची आव्हाने ...

कार्यक्षम वाहतूक व्यवस्थेच्या अभावी पुण्यात सध्या मोठ्या प्रमाणावर खासगी वाहनांची संख्या वाढली आहे. ही वाढ अतिशय वेगाने होत आहे. कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभी करणेच यावर उत्तर आहे. ते मेट्रोच्या रूपाने होऊ शकते. हा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या प्रकल्पाला मान्यता मिळेल. कामाला सुरुवात होइल. रोजगारासाठी येणाऱ्या लोकांच्या निवासाची व्यवस्था करणे हे एक आव्हान आहे. कारण शहरातील लोकसंख्येच्या २८ टक्के लोकसंख्या सध्या झोपडपट्टीत राहते. त्याचबरोबर वाढत्या शहरीकरणामुळे पायाभूत सुविधांचा विकास करावा लागणार आहे.

### नियोजन

पुणे आणि परिसराचा नियोजनबद्ध विकास व्हावा यासाठी राज्य शासनाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) स्थापना केली आहे. प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट यांनी पुणे आणि परिसराचा भविष्यातील पन्नास वर्षांचा विचार करून नियोजन करण्यास सुरवात केली आहे. पुण्यात दररोज नोकरी आणि इतर कामासाठी येणाऱ्या लोकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी पुणे लोणावळा आणि पुणे-दौंड या मार्गावर रेल्वेसेवेचा विस्तार व्हावा यासाठी पीएमआरडीएने मुंबई रेल्वे विकास कंपनीला आपला हिस्सा देण्यास मान्यता दिली आहे. त्याचबरोबर शिवाजीनगर ते हिंजवडी रेल्वेसेवा, पुणे शहराच्या परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रिंगरोड प्रकल्प हाती घेण्यासही पीएमआरडीएने मान्यता दिली आहे.

### नियोजनबद्ध आराखडा

पुण्याला स्मार्ट सिटी करण्यासाठी प्रामुख्याने वाहतूक, रस्ते विकास, पुण्याची इतर शहरांशी असलेली रोड, रेल्वे आणि एअर कनेक्टिव्हिटी सुधारणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर पुणे शहरातून वाहणाऱ्या दोन्ही नद्या प्रदूषण मुक्त करणे, पर्यावरणाची हानी कमीत कमी होईल अशा योजना



आखणे, उपलब्ध असलेल्या पाण्याचा योग्य आणि नियोजनबध्द उपयोग करून घेणे आणि पुणेकरांचे दैनंदिन जीवनमान सुखकर आणि तणावमुक्त कसे होईल याकडे प्राधान्याने सध्याच्या आराखड्यात लक्ष दिले आहे. मुळा-मुठा नद्यांच्या स्वच्छतेसाठी पुणे महानगरपालिकेला जपान सरकारकडून नुकतीच मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळाली आहे. त्यामुळे मुळा नदीची स्वच्छता होईल.

## स्मार्ट सोलापूर

'आजि सोनियाचा दिनू, बरसे अमृताचा धनू' या गीतामध्ये वर्णन केल्याप्रमाणे जणू सोनियाचा दिन २९ जानेवारी २०१६ रोजीचा दिवस सोलापूरवासीयांसाठी उगवला. देशातील २० 'स्मार्ट सिटी' च्या यादीत केंद्र शासनाने सोलापूरचा समावेश केल्याचे समजताच सर्वत्र

**केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेंतर्गत निवड झालेल्या सोलापूर व पुणे या शहरांसोबतच राज्यातील इतर आठ शहरांचा गतीने आणि प्रभावीपणे स्मार्ट शहरे म्हणून विकास केला जाईल.**



जल्लोष सुरू झाला. सर्वत्र आनंदाला उधाण आले. महापालिका आयुक्त विजय काळम-पाटील यांना अभिनंदनाचे फोन खणखणू लागले. महापालिकेच्या परिसरात हळूहळू नागरिकांची गर्दी वाढू लागली. बग्गीतून आयुक्त, महापौर, पदाधिकाऱ्यांची काढलेली मिरवणूक. फटाक्यांची आतषबाजी. रंगाची मुक्त उधळण. ढोल-ताशांचा निनाद. नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना उचलून नृत्य करत आनंदोत्सव साजरा केला.


महापालिका प्रांगणाशिवाय नवी पेठ तसेच विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या कार्यालयातील परिसरात लाडू, साखर वाटून आनंदोत्सवात सोलापूरकर न्हाऊन निघाले. तर 'सोशल मीडिया' वरही अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. 'फेसबुक' वर आता स्मार्ट व्हायलाच पाहिजे अशा भावना व्यक्त झाल्या. सर्व पक्षाचे, गट-तट, जात-धर्म मतभेद विसरून यानिमित्ताने सोलापूरकरांनी एकत्र येऊन जल्लोष केला ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

देश व राज्यातील मोठमोठ्या शहरांना मागे टाकत सोलापूरची निवड झाली. यासाठी सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात आले. महापालिकेतील पदाधिकाऱ्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता एकमताने प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे स्मार्ट सिटीचा मार्ग सुकर झाला. यासाठी आयुक्त विजय काळम-पाटील यांनी सुरुवातीपासूनच सकारात्मक भूमिका घेतली होती. पालकमंत्री सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी अधिकाऱ्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले.

दुसऱ्या टप्प्यामध्ये 'स्मार्ट सिटी'च्या प्रस्ताव करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न व मेहनत घेण्यात आली. मुख्यमंत्र्याचे सचिव तथा जिल्ह्याचे पालकसचिव व मार्गदर्शक मिलिंद म्हैसकर, नगरविकास विभागाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत १६ सप्टेंबर २०१५ रोजी नागरिकांचा सहभाग, योगदान, सूचना जाणून घेण्यात आल्या. यात सोलापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी करण्यात आलेल्या मार्गदर्शनामुळे सोलापूरकर प्रभावित झाले. आणखी सक्रिय लोकसहभाग वाढला आणि हा लोकसहभाग' स्मार्ट सिटी'च्या दुसऱ्या टप्प्यात निवड होण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

सोलापूरची 'स्मार्ट सिटी'त निवड झाल्याबद्दलचा आनंद आयुक्तांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. लोकसहभागामुळेच सोलापूर शहराचा समावेश होऊ शकला. माझे स्वप्न सत्यात उतरले असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली. या लोकसहभागाबरोबरच पालकसचिव व मार्गदर्शक मिलिंद म्हैसकर, नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरल्याचे सांगितले. याबाबत महापालिकेच्या वतीने स्मार्ट सिटी जाहीर होताच दुसऱ्याच दिवशी सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. सोलापूरकरांचा लोकसहभाग यात अत्यंत महत्त्वपूर्ण होता. सोलापूरकरच 'स्मार्ट सिटी'चे खरे शिल्पकार असल्याचे यावेळी श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी सांगितले. ध्येय ठेवून मनापासून काम केल्यानेच सोलापूरकरांनी ही स्पर्धा जिंकल्याचे सांगून सूत्रबद्धरीतीने स्मार्ट सिटीचा प्रस्ताव सादर केल्याबद्दल आयुक्तांचे, पदाधिकाऱ्यांचे पालकसचिव मिलिंद म्हैसकर यांनी अभिनंदन केले. सोलापूर शहर हे पूर्वी गिरणगाव म्हणून ओळखले जायचे. पण अलीकडच्या काळात ही ओळख पुसली गेली. अनेक सोयी-सुविधा अभावी उद्योगधंदे येण्यास अडचण होती. आता 'स्मार्ट सिटी'त समावेश झाल्याने ही अडचण दूर होईल. शहरात अनेक उद्योग येतील. शहराला भेडसावणाऱ्या अनेक समस्या आहेत. पाणी पुरवठा, रस्ते विकास, झोपडपट्टी निर्मूलन, वाहतुकीची शिस्त आदी. आता पुढची जबाबदारी सोलापूरकरांनी अधिक हिमतीने पार पाडली पाहिजे. 'स्मार्ट सिटी' त निवड हा या शहराचा 'टर्निंग पॉईंट' ठरला आहे.

**– गोविंद अहंकारी, रवींद्र राऊत आणि टीम लोकराज्य**



# पर्यटनाचे दीपगृह

**गेल्या वर्ष दीड वर्षापासून महाराष्ट्रातील अनेक प्रकल्पांना गती आली आहे. अनेक नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले. या प्रकल्पांना मान्यता, परवानग्या मिळवून देण्याच्या कामी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी सदैव तत्पर असतात. मुंबईनजीकच्या ७८ दीपगृहांचा/प्रकाशघरांचा पर्यटन विकास करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. या अनुषंगाने यांच्याशी केलेली खास बातचीत....**

**मुंबईनजीकच्या समुद्रातील बेटांचा पर्यटन विकास करण्याचा केंद्र आणि राज्य शासनाचा प्रस्ताव काय आहे?**

महाराष्ट्र, गुजरात,गोवा, कर्नाटक, केरळ, लक्षद्वीप, तामिळनाडू, पुडुचेरी, आंध्र प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल तसेच अंदमान आणि निकोबार बेटांसह भारतात ७५१७ किमी सागरी किनाऱ्यावर १८९ दीपगृहे असून त्यांचे पर्यटन केंद्रे म्हणून विकास करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात खासगी सार्वजनिक भागीदारीतून देशातील ७८ दीपगृहांचा विकास करण्याचे लक्ष्य आहे. महाराष्ट्रातील कान्होजी आंग्रे आणि संक रॉक या दीपगृहांसह अगौडा (गोवा), चंद्रभागा (ओडिशा), महाबलीपुरम, कन्याकुमारी आणि मट्टम (तामिळनाडू), कडलूर पॉईंट (थिक्कोडी, केरळ) आणि मिनीकॉय (लक्षद्वीप) या आठ दीपगृहांसाठी संभाव्य विकासकांकडून आरएफक्यू मागवण्यात आला आहे. ३४ बेटांवरील दीपगृहांसह ७० निवडक दीपगृहांच्या विकासाची प्रक्रिया सुरू झाली आहे. कोची, विझाग, चेन्नई येथे रोडशो आयोजित करण्यात आले आहेत. एकूण २३६ संभाव्य गुंतवणूकदारांनी या रोड शोज्ला हजेरी लावली.
दीपगृहांचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यासाठी दीड हजार कोटींची गुंतवणूक आम्हाला अपेक्षित असून त्यातून सुमारे एक लाख रोजगारांची निर्मिती होणार आहे.

पर्यटन केंद्रे म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील कान्होजी आंग्रे, वेंगुर्ला रॉक्स आणि संक रॉक या बेटांवरील दीपस्तंभांसह उत्तन पॉईंट, कोरलाई फोर्ट, जयगड, रत्नागिरी, देवगड आणि टोळकेश्वर पॉईंटचा ७८ दीपगृहांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राच्या तुलनेत पर्यटन क्षेत्रामुळे औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रातील रोजगाराला अगदी मागास भागांमध्येही चालना मिळते. पर्यटन क्षेत्रातील प्रत्येक दहा लाखाच्या गुंतवणुकीमागे ७८ नोकऱ्यांची निर्मिती होते. त्यामुळेच दीपगृहांच्या आसपास पर्यटनाचा विकास करताना सरकारने रोजगारनिर्मितीला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. परंपरेने सागरकिनाऱ्यावरील आणि बेटांवरील दीपस्तंभ अनेक शतकांपासून जलवाहतुकीसाठी मार्गदर्शक ठरले आहेत. पण एकविसाव्या शतकात दीपगृहांच्या स्वरूपात आमूलाग्र परिवर्तन होऊ घातले असून ते पर्यटनाचे आकर्षण ठरणार आहेत. जगभरात सर्वत्र दीपगृह सभोवतालच्या निसर्गामुळे पर्यटकांना आकर्षित करतात.




*कान्होजी आंग्रे बेटावर प्रवासी जेट्टीच्या कामाच्या शुभारंभाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग आणि जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अनंत गीते.*

**सुरक्षेच्या दृष्टीने या बेटांच्या विकासात काही अडचणी वाटतात काय किंवा याबद्दल काही उपाययोजना करणार काय?**

दीपगृह हे अतिशय सुरक्षित स्थळ असते. पूर्वीच्या काळात तिथे केवळ लाईट फिरायचा. आता तिथे अत्याधुनिक उपकरणे आहेत. आसपास फिरत असलेली सर्व जहाजे रडारवर येतात आणि त्यांची माहिती इंटरनेटद्वारे कार्यालयात पोहोचते. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने काही प्रश्न उद्भवत नाही.

**काही बेटांना नव्या जेटी बांधण्याचा प्रस्ताव आहे काय? अशा जेट्टी कोणकोणत्या ठिकाणी बांधल्या जाणार आहेत ?**

केवळ बेटेच नाही तर कुठल्याही प्रकारच्या जलवाहतुकीसाठी केंद्र सरकार राज्यांना प्रवासी वाहतुकीसाठी दहा कोटी आणि मालवाहतुकीसाठी २५०० कोटींचे अनुदान देण्याची सरकारची योजना आहे.
महाराष्ट्राकडून याबाबत प्रस्ताव आले नाहीत. मला प्रस्तावांची प्रतीक्षा आहे. महाराष्ट्रात त्या दृष्टीने किती क्षमता आहे याचा अंदाज मेरिटाईम बोर्डाला घ्यायचा आहे.

सुनील चावके

### कान्होजी आंग्रे बेटाच्या विकासाबद्दल केंद्र शासनाचे काही विशेष नियोजन आहे काय?



१८५२ साली ब्रिटिशांनी कान्होजी आंग्रे बेटावर हे दीपगृह विकसित केले. मुंबईच्या दक्षिण किनाऱ्यावर असलेले हे दीपगृह मुंबईत दाखल होणाऱ्या किंवा मुंबईतून बाहेर पडणाऱ्या जहाजांसाठी प्रवेशद्वाराचे काम करते. थळ किंवा मांडव्यापासून तसेच गेटवे ऑफ इंडियापासून थेट स्पीड बोटींनी हे बेट गाठता येते. १८ एकर क्षेत्रात पसरलेल्या या दगडांच्या बेटावर पडक्या किल्ल्याव्यतिरिक्त काही लहान मंदिरे आणि अरेबियन समुद्राचे विहंगम दृश्य बघता येईल, असे अनेक पॉईंटस् आहेत. या ठिकाणी प्रवासी जेट्टीचे बांधकाम आवश्यक आहे. बेटावर पोहोचण्यासाठी समुद्रातील पाण्याच्या पातळीवर अवलंबून राहण्याचे टाळण्यासाठी दीडशे मीटर लांबीचा आणि ४ मीटर रुंदीचा काँक्रीटची प्रवासी जेट्टी किंवा धक्का १५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत आहे. हे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे. पर्यटन विकासासाठी अंदाजे खर्चाचा तपशील ८ जानेवारी २०१६ रोजी प्राप्त झाला असून त्याची तपासणी सुरू आहे. किल्ल्यावरचा काही भाग दीपगृहांनी नौदलाला दिला आहे. किल्ल्यावर एक हेलिपॅड आहे. आधी हेलिकॉप्टरने जाता येईल काय याची चाचपणी केली. पण किल्ल्याची भिंत पूर्णपणे ढासळली आहे. त्यामुळे किल्ल्यावरून खाली उतरणे अवघड आहे. किल्ल्याची भिंत पुन्हा बांधली तर त्याचा हेलिपॅडचा वापर होऊ शकतो. तिथे एक लिमिटेड हॉटेल आहे. त्यात काही खोल्या आहेत. पंधरा वर्षांपूर्वी तिथे कर्मचाऱ्यांना दोन आठवड्यांच्या मुक्कामासाठी राहावे लागायचे. या खोल्यांचे नूतनीकरण करावे लागेल. कॅम्पिंग साइट आणि स्वीस कॉटेजसाठी उत्तम जागा आहे. विशेष म्हणजे बेटावर पुरेसे ताजे पाणी उपलब्ध असते. पावसाळ्याचे पाणी वर साठवून खाली आणले जात असावे. पण या ठिकाणी विजेची समस्या आहे. त्यावर मात करण्यासाठी सौर लाईटिंगची व्यवस्था करण्यात येत आहे. या ठिकाणी लँडस्केपिंग करावे लागेल. गाइडेड टूर आणि हेरिटेज वॉक, लाईट ॲण्ड साऊंड शो, कॅफ्टेरिया, ॲम्पिथिएटर, जलक्रीडा, गेटवे आणि फेरी व्हार्फपासून फेरी सेवा आदींची सोय करावी लागेल. ट्रॅव्हल ऑपरेटर या सर्व सुविधांचा विकास करेल. जो विकासक जास्त महसूल देईल त्याला विकासाचे कंत्राट दिले जाईल.

### मुंबईच्या किनारपट्टीवर दीपगृह उभारण्यासाठीच्या प्रस्तावाची काय स्थिती आहे?

तांत्रिकदृष्ट्या बेटांवरील मालकी राज्यांची असते. केंद्र सरकारच्या मालकीची केवळ दीपगृह बेटे आहेत. देशभरात बेटांवरील दीपगृहांची संख्या ३४ आहे. त्यांचा विकास केंद्र सरकार करू शकते. जमिनींवरील बेटांच्या विकासासाठी केंद्राला राज्यांसोबत काम करावे लागेल. जमिनीवरील दीपगृहांचा विकास राज्यांना करावा लागेल.

### मुंबईच्या पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर जलवाहतुकीचा विस्तार करण्यासाठी प्रस्ताव आहेत काय?

मागच्या सरकारने दोन वर्षांपूर्वी पाच ठिकाणी एमएसआरडीसीने टर्मिनल बांधण्याचे कंत्राट काढले होते. निविदा उघडल्या, पण कंत्राट बहाल न झाल्याने काम सुरू झाले नाही. या कामात केंद्र सरकारची हातभार लावण्याची तयारी असल्याचे आम्ही राज्य सरकारला सांगितले आहे. पण सागरी रस्त्यांच्या कामासोबत या टर्मिनल्सविषयी निर्णय घेण्याचा राज्य शासनाचा विचार आहे. कुठेकुठे टर्मिनल बांधायचे ते राज्य शासनाला ठरवायचे आहे. पश्चिम समुद्रकिनाऱ्यासंबंधात एक समस्याही आहे. पश्चिम किनाऱ्यावर समुद्र पावसाळ्यादरम्यान खवळलेला असतो. त्यामुळे पूर्ण वर्षभराच्या व्यवसायासाठी कुणाला गुंतवणूक करायची असेल तर आठ कोटींची बोट रिकामी ठेवणे परवडणार नाही. लाटांना छेदून जाणारी बोट वापरली तर त्याची किंमत वाढेल. तूर्तास मोठी गुंतवणूक आणि पावसाळा टाळून तरंगत्या जेटींनी सुरुवात करायची. छोट्या बोटींनी सुरुवात करून हा व्यवसाय परवडणारा आहे की नाही, याची कल्पना येऊ शकते. कमी गुंतवणूक करून प्रयोग यशस्वी झाला तर कायमस्वरूपी गुंतवणूक करता येईल, असे मला वाटते. मुंबईत ईस्टर्न वॉटरफ्रंटवर विकास सुरू झाला आहे. भाऊच्या धक्क्याला नवे टर्मिनल, नवी प्रवासी इमारत बनेल. तिथे फ्लायओव्हर बांधण्याचा प्रस्ताव आहे. मांडवा आणि नवी मुंबईमध्येही टर्मिनल्स होतील. हे तिन्ही टर्मिनल्स समान डिझाइनने विकसित केले जातील. या तिन्ही ठिकाणचे प्लॅटफॉर्म समान असतील. यातील दोन टर्मिनल्सचा विकास राज्य सरकार आणि भाऊच्या धक्क्याचा विकास जलवाहतूक मंत्रालय करीत असून त्यासाठी समन्वय साधण्यात येत आहे. भाऊच्या धक्क्यापासून रो-रो सर्व्हिस सुरू करण्यात येईल. लोकांना स्वतःच्या गाडीने गोव्याला जाण्यासाठी ही सेवा खूपच उपयुक्त ठरेल. अर्थात त्यासाठी भरपूर जागा लागणार आहे. भाऊच्या धक्क्याकडे सध्याच्या रस्त्याने जाणे अवघड आहे. फ्लायओव्हर बांधून भाऊच्या धक्क्याशेजारी नव्या टर्मिनलपाशी बांधण्यात येत असलेल्या थेट पार्किंगमधून वाहने जहाजात पोहोचतील.

**(लेखक नवी दिल्ली येथे महाराष्ट्र टाइम्सचे वरिष्ठ सहायक संपादक या पदावर कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९८६८०९२९४८**

# प्रबोधनातून व्यसनमुक्तीकडे...

राज्याच्या राजधानीपासून अतिदूर असलेल्या गोंदिया या दुर्गम जिल्ह्यात पारा सहावर असताना सकाळी ९ वाजता गोंदियातील इंदिरा गांधी स्टेडिअममध्ये हजारो शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक, कर्मचारी आणि अबालवृध्दांनी घेतलेली व्यसनमुक्तीची शपथ. व्यसनमुक्तीच्या संदेशासाठी काढलेली भव्य रॅली, व्यसनमुक्ती साहित्य स्मरणिकेचे केलेले प्रकाशन, व्यसनमुक्तीच्या संदेशासाठी दोन दिवस

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त देशातील चौथे व्यसनमुक्ती साहित्य संमेलन गोंदिया येथे २२-२३ जानेवारीला संपन्न झाले. इंदिरा गांधी स्टेडियम येथे व्यसनमुक्ती दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी व्यसनमुक्तीच्या चित्ररथातून पालकमंत्री राजकुमार बडोले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. त्यानंतर त्यांनी मुक्ता पुणतांबेकर यांच्या उपस्थितीत साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले.**

**शुद्धोदन कठाडे**

आयोजलेली कविसंमेलने, पथनाट्य, एकपात्री नाटिका, परिसंवाद, सिने कलावंत निशा परूळेकर, देवदत्त नागे, जयवंत भालेकर, संगीतकार अवधूत गुप्ते आदी मान्यवरांनी लावलेली हजेरी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालेले पुरस्कार वितरण हे चौथ्या व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.



चौथ्या व्यसनमुक्त साहित्य संमेलनाच्या प्रारंभी निघालेल्या ग्रंथदिंडीत सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले.

## बाबासाहेबांचे व्यसनमुक्तीबाबतचे विचार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संकल्पना व्यसनमुक्त व दु:खमुक्त समाजाची होती. त्यासाठी त्यांनी बहुजन समाजाला बुद्ध-धम्माची दीक्षा दिली. धम्माच्या पंचशीलातील पाचवे तत्त्व 'सुरा मेरय मज्ज पमादठाणा वेरमणि सिक्खा पदमं समाजिदयामि' म्हणजे मी कोणत्याही मादक पदार्थाचे सेवन करणार नाही, अशी प्रतिज्ञा ग्रहण करतो, असे आहे. यावरून बाबासाहेबांची व्यसनमुक्त समाजाची दूरदृष्टी स्पष्ट होते. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'बाबासाहेबांचे व्यसनमुक्तीबाबतचे विचार' या विषयावर सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. सुभाष खंडारे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्रपणे व्यसनमुक्ती संदर्भात कोणताही ग्रंथ लिहिला नाही. कोणत्याही संमेलनात व्यसनमुक्तीसंदर्भात भाषण दिले नाही. परंतु त्यांनी स्वत:च्या आचरणातून व्यसनमुक्तीचा संदेश जनतेला दिला. बाबासाहेबांना कुठलेही व्यसन नव्हते. कारण त्यांनी केलेली व्यसनाची व्याख्याच आगळीवेगळी आहे. ती अशी, 'ज्यामुळे माणसाला लाचारी येते, तो गुन्हेगार बनतो व शेवटी त्याचे अध:पतन होते, त्या निरंतर क्रियेला व्यसन असे म्हणतात.' व्यसनमुक्त व दु:खमुक्त समाजासाठी बाबासाहेबांनी तीन महत्त्वपूर्ण गोष्टी केल्या. एक म्हणजे त्यांनी भगवान तथागत बुद्धांचा धम्म दिला. ज्यात स्पष्टपणे व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याची शक्ती आहे. दुसरे म्हणजे त्यांनी व्यक्तिविशेषाला स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला. ज्यामुळे मनुष्य निर्भय होतो. त्यांच्या तीन दैवतांपैकी एक स्वाभिमान हे होते. तिसरी गोष्ट म्हणजे सदाचरण. सदाचरण हा आचरणाचा उत्कृष्ट पैलू बाबासाहेबांच्या जीवनातून येतो. ज्यामुळे दु:खमुक्त समाजाची निर्मिती होऊ शकते. बाबाहेबांनी सांगितलेल्या या तीन विषयांची आज सर्वाधिक गरज असल्याचे डॉ. खंडारे म्हणाले.

### व्यसनमुक्तीचा निर्धार

'गोंदिया जिल्हा धानाचे कोठार म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याला नैसर्गिक संपन्नता लाभली आहे. येथील पर्यटनस्थळांमध्ये अनेकांना मोठ्या प्रमाणात रोजगार देण्याची क्षमता आहे. देशाला बलशाली व संपन्न राष्ट्र करण्यासाठी येथील युवक आधी व्यसनमुक्त झाला पाहिजे. प्रत्येक तरुणाने व्यसनमुक्त असले पाहिजे'. तरुणांच्या श्रमशक्तीचा वापर



बलशाली महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी व्यसनमुक्त महाराष्ट्र करण्याचा संकल्प सामाजिक न्याय मंत्री आणि गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री राजकुमार बडोले केला आहे.

***'आयुष्याचा काडीकचरा झाला.. दोस्त यार हो..,***
***या नशेने जीवनाचा नाश झाला.....यार हो..,***

अशा भावनात्मक काव्य रचनेतून बडोले यांनी समाजातील तरुणाईला साद घालत व्यसनमुक्त होण्याचे आवाहन केले.

विदर्भातील तीन जिल्ह्यात दारूबंदी आहे. व्यसनमुक्तीचा संकल्प करून भविष्यात गोंदियातसुद्धा दारूबंदी झाली पाहिजे, अशी अपेक्षा संमेलनाध्यक्ष पुणतांबेकर यांनी व्यक्त केली तर या संमेलनामुळे जिल्ह्यात व्यसनमुक्तीचे काम प्रभावीपणे पुढे जाईल, अशी आशा जिल्हाधिकारी डॉ. सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

### प्रबोधन

'प्रत्येक व्यक्ती तणावात असते. मात्र प्रत्येकजण व्यसनाधीन होत नाही. आयुष्य अतिशय सुंदर आहे. त्याला व्यसनाची लागण करुन ते

**व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्या वेळी बोलताना श्री. गडकरी म्हणाले, ''व्यसनाधीनतेमुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होते. समाजाला प्रशिक्षण व प्रबोधनाद्वारे व्यसनमुक्त करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने उचललेले पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजाच्या परिवर्तनात व्यसनमुक्तीची भूमिका महत्त्वाची आहे. समाजाचे स्वास्थ्य चांगले राहावे यासाठी आपण समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून व्यसनमुक्तीसाठी काम करावे. समाजात व राजकारणात सामाजिक दायित्वाची भावना जास्त दिसून येत नाही. सामाजिक दायित्वाची भावना वाढली तर निश्चितच सामाजिक सुधारणांना गती येईल. शासनातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकीतून काम केल्याचे चित्र त्यांना मिळालेल्या पुरस्कारातून दिसून येत आहे. सामाजिक संवेदनशीलतेतून काम केले तर त्याचे कौतुक होते आणि त्यांच्यापासून इतरांना प्रेरणाही मिळते. संस्थांनी व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात केलेले कार्य निश्चित मोठे आहे. समाजच समाजाला बदलवतो. समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन सर्वांनी व्यसनमुक्तीचा संकल्प करावा.''**



संपवू नका. मोठी स्वप्ने पाहा आणि आनंदी आयुष्य जगा', असा संदेश सिने अभिनेत्री निशा परूळेकर यांनी संमेलनात दिला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे, स्वागताध्यक्ष रचना गहाणे यांनीही मनोगत व्यक्त केले. याशिवाय संत साहित्यातील व्यसनमुक्तीचा संदेश, महिलांचा वाद्यवृंद, हास्य कलाकारांचे एकपात्री नाटक आदी भरगच्च कार्यक्रमांची दोन दिवस रेलचेल होती.

व्यसनमुक्ती साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी श्री. गडकरी यांचेसह पालकमंत्री राजकुमार बडोले, खा. नाना पटोले, आमदार सर्वश्री गोपालदास अग्रवाल, संजय पुराम, विजय रहांगडाले, संमेलनाध्यक्ष मुक्ता पुणतांबेकर, जय मल्हार फेम अभिनेता देवदत्त नागे, गोंदिया नगराध्यक्ष कशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप गावडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव उज्ज्वल उके यांनी तर सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले.

**संपर्क : ०९८६७६५३३११**

# आपले वन, आपला अभिमान

**आपल्या महाराष्ट्राची वनसंपदा बघता महाराष्ट्राला वनराष्ट्र म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सह्याद्री, सातपुड्याच्या उत्तुंग पर्वतरांगा अंगावर मिरवणारी, उंच वृक्षांची घनदाट सदाहरित वने, शुष्क पानगळीची वने आणि आगळीवेगळी समुद्रकिनाऱ्यावरची खारफुटीची वने अंगाखांद्यावर खेळवणारी ही महाराष्ट्रभूमी प्रत्येकालाच भुरळ घालणारी आहे. महाराष्ट्र हे देशातील भौगोलिकदृष्ट्या तिसरे सर्वात मोठे राज्य आहे. महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. असून एकूण वनक्षेत्र ६१,६५२ आहे.**

**मिलिंद उमरे**

महाराष्ट्रात महाबळेश्वर, माथेरान, भीमाशंकर, अंबोली आदी भागात ही सदाहरित वने आढळून येतात. त्यानंतर दिसतात ती निम सदापर्णी वने. ही वने आपल्याकडे कोकणचा प्रदेश, घाटमाथ्याच्या नजीकच्या प्रदेशात आहेत. सदाहरित वनांच्या खालच्या बाजूस जेथे पर्जन्यमान २०० ते ३६० सें.मी. आहे आणि उष्णता थोडी जास्त आहे तिथे आहेत. उष्ण कटिबंधीय सदाहरित वने सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, पश्चिम उतारावर आणि दक्षिण कोकणात आढळतात. उष्ण कटिबंधीय अर्ध सदाहरित वने ही उष्ण कटिबंधीय सदाहरित वने व पानझडी वने यांच्यामध्ये असतात. ही वने सह्याद्रीच्या पश्चिम उतारावर पायथ्याकडील भागात व खंडाळ्याच्या परिसरात घाटमाथ्याकडील भागात आढळून येतात. पानझडी वृक्षांची वने महाराष्ट्रात जास्त प्रमाणात आहेत. कोरड्या हवामानात बाष्पाचे प्रमाण टिकवण्यासाठी या वनातील वृक्ष विशिष्ट मोसमात साधारणत: शिशिर ऋतूत आपली पाने गाळतात. या प्रकारच्या वनाचे पावसाच्या प्रमाणावरून आर्द्र पानझडी आणि शुष्क पानझडी वने असे दोन प्रकार आहेत. ही वने चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, सह्याद्री पूर्व उतार, महादेव, हरिश्चंद्र व सातमाळ रांगा, धुळे जिल्ह्यातील सातपुडा पर्वतभाग आणि ठाणे जिल्ह्याच्या डोंगराळ प्रदेशात आहेत. उष्ण कटिबंधीय काटेरी खुरट्या वनस्पतीची वने कमी पावसाच्या प्रदेशात आढळतात. पुणे, सातारा, नगर, सांगली या जिल्ह्याचे पूर्वभाग, मराठवाडा व पश्चिम विदर्भात अशी वने आहेत, तर खारफुटीची वने समुद्रकिनारी दलदलीच्या प्रदेशात व खाऱ्या जमिनीत आढळतात.

यातील प्रत्येक वने वेगळ्या प्रकारची आणि विशिष्ट जैवविविधता जपून असलेली आहेत. महाराष्ट्राच्या पश्चिम घाट भागात दुर्मीळ सरीसृपांच्या अनेक प्रजाती आहेत. तसेच हा भाग विविध रंगी फुलपाखरांसाठी ओळखला जातो. भीमाशंकर परिसरात राज्य प्राणी शेकरू आढळतो. आश्चर्य म्हणजे भीमशंकरनंतर थेट महाराष्ट्राच्या पूर्व भागातील सर्वात शेवटचा जिल्हा असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील जंगलातही ही दुर्मीळ खार आढळते. या जिल्ह्याच्या दक्षिण–पूर्वेकडील



भागात रेड डाटा बुकमध्ये समाविष्ट असलेली दुर्मीळ रानम्हैस आहे. राज्याच्या समुद्रकिनारी भागात सुंदर समुद्री कासव आढळतात. मराठवाड्यात खुरटे जंगल असले तरी चिंकारे, काळवीट आहेत. राज्यातील एकूण ६ व्याघ्र प्रकल्पांपैकी एक सह्याद्री सोडला तर मेळघाट, पेंच, ताडोबा– अंधारी, नवेगाव– नागझिरा आणि बोर हे पाच व्याघ्र प्रकल्प एकट्या विदर्भात आहेत. राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये आणि ४ संवर्धन राखीव क्षेत्रे अशी ५८ वन्यजीव संरक्षित क्षेत्रे अधिसूचित करण्यात आली आहेत.

पूर्वी वनसंवर्धन ही केवळ वनविभागाची जबाबदारी मानली जात होती. पण लोक सहभागाशिवाय वनसंवर्धन शक्य नाही हे लक्षात येऊ लागले आहे. मागील एक वर्षात महाराष्ट्र शासन विशेषतः वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अनेक सकारात्मक पावले उचलली आहेत. विदर्भात शुष्क पानझडी वने अधिक आहेत. या वनात बांबू मोठ्या प्रमाणात आहे.





याचा विचार करीत चिचपल्ली येथे बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे आहे. राज्यातील नवीन बुरूड यांची नोंदणी करण्याला शासनाने मान्यता दिली आहे. चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचा दर्जा वाढवून त्यास वन अकादमीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ४ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सामाजिक वनीकरण व वन विभागाचे एकत्रीकरण करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

पूर्वी वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडल्यास पाच लाख रुपये देण्यात येत होते. आता ही रक्कम वाढवून आठ लाख करण्यात आली आहे. वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान ही आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. शासन निर्णय, महसूल व वनविभाग ९ जुलै २०१५ अन्वये नुकसानभरपाईची रक्कम दुप्पट करण्यात आली आहे. नागपूर शहर व परिसरात पर्यटनाला चालना देऊन रोजगार निर्मिती करण्यासोबतच दुर्मीळ आणि नामशेष होत असलेल्या प्राण्यांचे जतन करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पुनर्स्थापित करण्यासाठी नागपूरच्या गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणिसंग्रहालय उभारण्यात येत आहे. पर्यटकांना जंगलाशी अधिक समरस होता यावे. वनसंवर्धनात त्यांचा सहभाग वाढावा यासाठी ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्प व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्यांसाठी खास रेस्क्यू सेंटर सुरू करण्यात आले आहे. पूर्वीच्या रेस्क्यू सेंटरमध्ये सेकंडरी केजेसची सोय नव्हती. ती आता करण्यात आली आहे. पावसाळ्यात व्याघ्र प्रकल्प बंद असल्याने पर्यटकांची निराशा व्हायची पण आता ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्प अंशत: सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य प्राणी शेकरू, राज्य पक्षी हरियल, राज्य वृक्ष आंबा, राज्य फूल जारुळ यासोबतच आता राज्य फुलपाखरू ब्ल्यू मॉरमॉनची राज्याच्या मानचिन्हात भर पडली आहे. विशेष म्हणजे पुनर्रचित वन्यजीव मंडळाच्या पहिल्या बैठकीत राज्यातील अभयारण्याची संख्या वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यात ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, विस्तारित कर्नाळा अभयारण्य, तोरणमाळ संरक्षित राखीव क्षेत्र आणि अंजनेरी संवर्धन राखीव क्षेत्र या प्रस्तावांचा समवेश असून या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. जल, जंगल, जमिनीचे रक्षण करणाऱ्या, वनावर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. सामाजिक वनीकरणामार्फत प्रत्येक जिल्ह्यात उत्तमराव पाटील वन उद्यानाची निर्मिती करतानाच उच्च तंत्रज्ञानावर आधारित हायटेक रोपवाटिका तयार करण्यात येणार आहे. महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे हरितीकरण आणि महत्त्वाचे रस्ते, लोहमार्गाच्या दुतर्फा वृक्ष लागवड हा हिरवाईचा सुंदर उपक्रम राबवण्यात येणार आहेत. वनेतर क्षेत्रातील पाणस्थळे, सरोवरे आदी ठिकाणांच्या जैवविविधता व्यवस्थापनासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.




**(लेखक हे वन्यजीव व वनसंवर्धन विषयाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**



# घर सुखाचे, घर आनंदाचे

**आयुष्य मावळतीकडे कलताना ज्यांना मदतीच्या हातांची आणि काळजी घेणाऱ्या मनांची गरज असते, त्या ज्येष्ठ नागरिकांसाठी झटणाऱ्या नि:स्वार्थ सेवाभावाचे संजीवन सोशिओ-मेडिकल फाऊंडेशन हे नाव. त्याची स्थापना होऊन १८ वर्षे पूर्ण झाली. संजीवन वृद्धाश्रम सुरू होऊन १३ वर्षे लोटली आहेत. ज्येष्ठ नागरिक हे परिपक्व अनुभवांचे धनी असतात. मात्र ते आपल्या उपयोगाचे असतात तोवर ठीक असते. वृद्धत्वाच्या सावल्या दाटून यायला लागल्या की, त्यांचे असणे कित्येक घरांना नकोसे होऊन जाते. त्यातून या ज्येष्ठांना मानसिक निराधारपणाच्या भावनेला सामोरे जावे लागते. त्यात शारीरिक व्याधी भर घालतात. अशा ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याचे व्रत संजीवनने पत्करले आणि सामाजिक दायित्वाच्या भरवशावर ते सातत्याने चालवण्याचा निर्धार केला आहे.**

फाऊंडेशनच्या स्थापनेचा उद्देशच असा आहे की, ज्या ज्येष्ठ नागरिकांना कोणत्याही कारणास्तव आपल्या कुटुंबात राहता येणे शक्य नाही, किंवा ज्यांना वृद्धाश्रमातच राहायचे आहे किंवा ज्यांना वृध्दाश्रमातच राहण्यावाचून पार्याय नाही, अशा सगळ्यांसाठी एक सामाजिक जबाबदारी अंगावर घेणे अन् ती पार पाडणे. वृद्धसेवा, रुग्णसेवा आणि गोसेवा या त्रिसूत्रीनुसार फाऊंडेशनचे काम चालते. या पवित्र कार्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी एकत्र आली. मग संजीवनच्या सेवाभावाला अनेक धुमारे फुटले. ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम सुरू झाला. मूलभूत सोयीसुविधांची उभारणी फक्त लोकाश्रयावर झाली आहे. त्याचे सारे श्रेय सामाजिक दायित्वाला आहे.

### संजीवनग्राम

वृद्धाश्रमासोबतच ज्या परिसरात इतर सेवाभावी प्रकल्प साकारले जाताहेत, त्याचे नाव संजीवनग्राम. नागपूर शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर (हिंगणा–कान्होलीबारा मार्गावर) एका टेकडीवर–निसर्गाच्या सान्निध्यात संजीवनग्राम वसलंय. संजीवन ही मानवातील शिवत्वाला आणि देवत्वाला अखंड साद घालणारी समाजपुरुषाची निरंतर पूजा आहे. या कार्यसिद्धीसाठी पूरक असे नानाविध प्रकल्प संजीवनमध्ये राबवले जातात.

### संजीवन वृद्धाश्रम

घराला पारख्या झालेल्या वृद्धांसाठी एवढ्या मोठ्या दुनियेत हक्काचे घर असू नये का?... नेमकी ही गरज वृद्धाश्रमाच्या माध्यमातून भागवली जाते. संजीवन वृद्धाश्रम चित्तवृत्ती प्रफुल्लित करणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात वसला आहे. तब्बल २० हजार चौरस फुटांच्या दुमजली निवासी संकुलात ५० लोकांची व्यवस्था आहे. नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकच्या निवासी संकुलाचे उद्घाटन केल्यामुळे पुन्हा ५० वृद्धांच्या राहण्याची सोय झाली आहे.

स्वयंपाकघर, विशाल भोजन कक्ष, भांडार कक्ष, ध्यान कक्ष, मनोरंजन कक्ष, देवघर आदी गोष्टींची अत्यंत कल्पकतेने योजना करण्यात आली आहे. पहिल्या माळ्यावर स्वतंत्र खोल्या आहेत. प्रत्येक खोलीत दोन



संजीवन वृद्धाश्रमातील समाधानी महिला

किंवा तीन व्यक्ती राहू शकतात. एकटेपणावर मात करण्यासाठी वृद्धांनी एकमेकांसोबत राहावे, हा त्यामागचा हेतू आहे.

**अनिल ठाकरे**

वृद्धाश्रमाच्या परिसरात–टेकडीच्या माथ्यावर भव्य शिवालय आहे. वृद्धांना धार्मिक अन् आध्यात्मिक समाधान मिळावे असे तेथील वातावरण.

### कुटीर

डोंगरातून वाट काढत जाणाऱ्या नागमोडी रस्त्यांच्या दुतर्फा टुमदार



संजीवन वृद्धाश्रमाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे

गोशाळेतून उपलब्ध होणाऱ्या शेणाचा वापर करून एकीकडे बायोगॅस निर्माण केला जातो व त्यापासून विद्युत निर्मिती केली जाते, तर दुसरीकडे सौर ऊर्जा व पवन ऊर्जेची सयंत्रेसुद्धा बसवण्यात आली आहेत. सोलर वॉटर, हिटर्स, सोलर स्ट्रीट लाइटस्, सोलर होम लाइट सिस्टिम आणि सोलर (लँटनसल)चा वापरही केला जातो. अपारंपरिक ऊर्जेमुळे पारंपरिक विजेच्या वापरात बरीच घट झाली आहे.

## संजीवन रुग्णालय

संजीवनने याच परिसरात एक रुग्णालय उभारले आहे. रुग्णालयाचा फिरता दवाखाना आहे. बाह्य रुग्ण विभाग, पॅथॉलॉजी विभाग, क्ष-किरण विभाग, ऑपरेशन थिएटर इत्यादी सेवांची व्यवस्था हॉस्पिटलमध्ये आहे. निवासी डॉक्टर आणि प्रशिक्षित परिचारिका हॉस्पिटलमध्ये आहेत. वेळोवळी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, आरोग्य शिबिरे तसेच आरोग्य जागृतीविषयक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या सुविधांचा लाभ फक्त आश्रमनिवासींनाच नव्हे तर परिसरातील गावकऱ्यांनाही होतो. हॉस्पिटलच्या माध्यमातून माता व बाल संगोपनाचे कार्य केले जाते.

कुटीर आहेत. एखाद्या वृद्ध पण आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या दांपत्याला स्वतंत्र राहायचे असेल तर त्यांची व्यवस्था करता यावी यासाठी ही कुटीर उभारली गेली आहेत.

## संजीवन गोशाळा

संजीवन वृद्धाश्रम स्वयंपूर्ण व्हावा या हेतूने संजीवन गोशाळेची सुरुवात करण्यात आली. येथील गाई-म्हशींमुळे दूधदुभते तर मुबलक प्रमाणात उपलब्ध होतेच, शिवाय, शेणाचा वापर करून बायोगॅस प्लांटदेखील चालवण्यात येतो. त्याद्वारे स्वयंपाकासाठी गॅस व विद्युत निर्मिती केली जाते. शिवाय, त्यातून आश्रमाच्या शेतीसाठी खतसुद्धा मिळते.

**संस्थेचे संपर्क भ्रमणध्वनी**
**९८२२४७००११, ९६१९११८८८**

## अपारंपरिक ऊर्जा अन् पर्यावरण

संजीवनग्रामचा परिसर हिरवागार राहावा याची खास काळजी घेतली जाते. हजारो झाडे लावून त्यांची निगा राखण्यावर आमचा कटाक्ष आहे. जलसंधारण आणि मृदसंधारणाचे कामही संजीवनतर्फे केले जाते. स्वयंपाकासाठी बायोगॅस व सौरऊर्जेचा प्रामुख्याने वापर केला जातो. प्रदुषणावर नियंत्रण आणि शक्य त्या सर्व नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर यावर भर देण्यात येतो.

सारांश, संजीवनग्राम परिसर हा आदर्शग्रामाच्या धर्तीवर विकसित केला जात आहे. भविष्यात सेवाभावाचे जिवंत उदाहरण म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाईल याची खात्री बाळगतानाच, त्याकडे नैसर्गिक संसाधनांच्या अर्थपूर्ण विनियोगाचा आदर्श म्हणून पाहिले जावे, अशी अपेक्षा आहे.

## सहयोग

संजीवनचा व्याप असा बहुमुखी स्वरूपाचा आहे. केवळ वृद्धाश्रमीच नव्हे तर पर्यावरण संरक्षण करणारी, ग्रामस्थांना आरोग्य सेवा देणारी संस्था, अपारंपरिक ऊर्जेचा आदर्श देणारी आणि चिरस्थायी विकासाची संकल्पना घेऊन वाटचाल करणारी सामाजिक संस्था असे तिचे स्वरूप आहे. हे सारे सुरळीत चालण्यासाठी अर्थसाहाय्य आवश्यक असतेच त्यामुळे संजीवनने सामाजिक औदार्याला विविध योजनांद्वारे साद दिली आहे.

**अन्नदान मदत निधी कोश:** संजीवनचे सर्व प्रकारचे कार्य अखंड चालावे यासाठी एक स्थायी निधी उभारला जात आहे. किमान १ कोटी रुपये त्यात संकलित व्हावेत, या कामात फूल ना फुलाची पाकळी या स्वरूपात सामान्य नागरिकांना मदत करता येईल.

आश्रमात एक दिवस आपल्या प्रियजनांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विशिष्ट दिवशी वृद्धाश्रमात यायचे आणि वृद्धांना आपल्यातर्फे भोजन द्यायचे, अशी ही संकल्पना. याकरिता दात्यांनी फक्त २१०० रुपये द्यावेत किंवा धान्य द्यावे.

**गोशाळा कोश:** आश्रमातील गाई-म्हशींच्या चाऱ्यासाठी तसेच ढेप, सरकी व औषधोपचार देण्यासाठी देणगी देता येते.

**आरोग्य कोश:** संजीवन हॉस्पिटलचे संचालन व आरोग्यविषयक कार्यक्रमांसाठी हा निधी वापरण्यात येईल. त्यात कोणीही योगदान देऊ शकता.

**दत्तक योजना:** वृद्धाश्रमातील कोणत्याही एका वृद्धाला आपण दत्तक म्हणून स्वीकारावे आणि त्याला लागणारा वर्षभराचा खर्च आपण करावा, अशा प्रकारची ही योजना. रक्तापल्याडचे माणुसकीचे नाते जपण्याची अन् जगण्याची संधी देणारी.

**(लेखक हे नागपूर येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४२२८६८७२४**

# मुख्यमंत्र्यांनी घडवला इतिहास

**हेलिकॉप्टरच्या पात्यांच्या घरघराटाने साऱ्यांच्या नजरा आकाशाकडे वळल्या. हेलिकॉप्टरमधून उतरल्यावर पायलट कार, वाहनांचा ताफा सायरनचे आवाज मागे आले नाहीत. अर्थात या ठिकाणी स्थिती वेगळीच होती. नाही म्हणायला वाहनांचा ताफा तयार होता. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पायीच चालणे पसंत केले. आजूबाजूला अंगरक्षक आणि इतर अधिकारी चालत होते. दंडकारण्याचा हा अतिदुर्गम भाग. गावाचे नाव येमली बुर्गी. या गावात मुख्यमंत्र्यांच्या चालण्याने इतिहास घडला.**



आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आल्याबद्दल अभिनंदन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार व पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव अत्राम.



**दिवसभराची धावपळ असूनही संध्याकाळी येमली बुर्गीत आदिवासी लोकांशी ते प्रत्यक्ष संवाद साधत होते आणि सकारात्मक ऊर्जा त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. विद्यापीठाच्या सुवर्ण विजेत्यांना पदक देण्यापासून पाड्यावरच्या चिमुकलीशी संवाद साधणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रत्येकवेळी वेगळे भासले.**

गडचिरोली राज्याचा सीमावर्ती आणि अतिदुर्गम अशा ठिकाणांनी भरलेला व ७६ टक्के जंगलांनी व्यापलेला जिल्हा. या जागेवर मुख्यमंत्र्यांनी भेट देण्याचे उदाहरण देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा घालून दिले.

## परिवर्तनाची नांदी

मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी सर्वप्रथम दौरा केला तो गडचिरोली जिल्ह्याचा राज्याचा शासक म्हणून नव्हे तर पालक या भूमिकेतून! त्यांनी या दौऱ्यात गडचिरोली जिल्ह्याची रुतून बसलेली विकासरथाची चाके एक प्रकारे मोकळी केली. हे खऱ्या अर्थाने परिवर्तन होते. एका नव्या अध्यायाची ही सुरुवात होती आणि त्याचे प्रतिबिंब २५ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या त्यांच्या या जिल्ह्याच्या दुसऱ्या दौऱ्यात स्पष्टपणे दिसले.

नक्षलकारवायांमुळे विकास खुंटला त्यामुळे त्या नक्षल्यांचा बीमोड करणे हे मोठे आव्हान, त्यासोबतच दुर्गम, अतिदुर्गम भागात दळणवळण साधनांची व संसाधनाची कमतरता. अशा स्थितीत आणखी एक प्रशासनिक आव्हान होते ते रिक्त पदांचे. इथ व्यापार–उदिमासाठी कोणी समोर येत नाही. या साऱ्या समस्या जाणून घेऊन त्यांनी कृती केली आणि गडचिरोलीच्या कायापालटाला सुरुवात झाली. गृहमंत्रिपद त्यांच्याकडे आहे. पालक या नात्यांने पोलीस दलाचे मनोधैर्य उंचावणे आणि सकारात्मक स्थिती निर्माण करण्याचे काम त्यांनी आपल्या भेटीत केले.

**प्रशांत दैठणकर**

त्यानंतर २०१५ यावर्षात पोलीस दलाची कामगिरी अतुलनीय अशीच राहिली. नक्षलवाद्यांनी डावी विचारसरणी सोडून आत्मसमर्पण केल्यास त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी सर्व प्रकारची मदत दिली जाईल, असे

**नक्षल्यांच्या गोळ्यांनी जीव गमावणारे जवान गडचिरोलीने आणि महाराष्ट्राने यापूर्वी वेळोवेळी बघितले. मात्र गेल्या वर्षभरात नक्षल्यांच्या फिरण्याचे मार्ग बंद करून नक्षल चळवळ मोडीत काढण्यात आली. वर्षभरात ५६ नक्षलवादी पोलिसांना शरण आले. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या देखरेखीने २०१५ हे वर्ष सुरक्षित वर्ष ठरले. प्रथमच कुणी शहीद होणार नाही इतकी अचूक कामगिरी पोलीस दलाने केली.**

स्पष्ट करून मुख्यमंत्र्यांनी यासाठी आत्मसमर्पण योजना प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश दिले. पोलीस अधीक्षक संदीप पाटील यांना त्यांनी मुभा प्रदान केली होती. त्यांनी जिल्हा पोलीस ठाण्यांची गतिमान पद्धतीने फेररचना सुरू केली. नव्या पोलीस ठाण्यांना त्वरेने मंजुरी प्रदान करून काम सुरू झाले.

पोलीस दलाच्या यशामागे मुख्यमंत्र्यांचे व्हिजन स्पष्ट होते. नियोजनाने सारे साध्य होत असते. केवळ इथ थांबून चालणार नाही, हे लक्षात घेऊन नगरचे भूमिपूजन करताना मुख्यमंत्र्यांना निश्चितपणे समाधान वाटत होते. आश्वासने पूर्ण करण्याचा हा दिवस होता. आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांना १०६ भूखंडांचे निवासासाठी वाटप करण्यात आले. त्यात ही कोनशीला होती.

## सर्वांगीण विकास

महिला बचतगट आणि कुटीरोद्योग असणाऱ्या गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाला विस्तारण्याची योजना बनवण्यात आली. आजमितीस गडचिरोलीपर्यंत कुणी येवो ना येवो पण घराघरात सकाळ- संध्याकाळ सायकल ब्रँड अगरबत्तीच्या रूपाने गडचिरोलीच्या वनवैभवाचा सुवास दरवळत आहे. समृद्ध अशा वनसंपत्तीमधून रोजगार देण्यासाठी आता पतंजली उद्योग समूह गडचिरोलीत दाखल होत आहे.





त्यांनी केंद्रात वेळोवेळी पाठपुरावा करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मदतीने जिल्हाभरात राष्ट्रीय महामार्गाची उभारणी होईल याची जबाबदारी घेतली. आता ही कामे सुरू आहेत. रेल्वेमंत्र्यांच्या सहाय्याने वडसा (देसाईगंज) - गडचिरोली रेल्वे मार्गाचे काम सुरू केले त्यात राज्याच्या निधीलाही त्वरित जारी केले. गडचिरोली जिल्ह्यात सुरजागडच्या भागात मोठ्या प्रमाणावर लोहखनीज साठे आहेत. ऑटोमोबाइल उत्पादनाचे नवे हब बनलेल्या महाराष्ट्राला दर्जेदार स्टील याच ठिकाणाहून मिळू शकते. 'या ठिकाणी या, येथे उद्योग सुरू करा. आम्ही संरक्षण आणि इतर सुविधा देऊ,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आपल्या लंडन भेटीतही त्यांच्या मनात गडचिरोलीच्या विकासाचा विषय होता. हे स्टील उत्पादक लक्ष्मी मित्तल यांच्या भेटीत दिसले. वर्षभराचा कालावधी विकास प्रक्रियेसाठी खूप छोटा आहे. या ठिकाणी जिल्हाधिकारी रणजित कुमार यांनी सर्व विभागाचे सहकार्य या कामी द्यावे. या मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांचे पालन केले. या भेटीत नवजीवन

## सुसंवाद

पोलीस मुख्यालयातील एकलव्य सभागृहात गडचिरोलीचा बदललेला चेहरा बघून मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. आत्मसमर्पितांना भूखंड वाटप झाल्यावर पोलीस दलाच्या शौर्यपदक विजेत्यांचे त्यांनी कौतुक केले. १९९१ ते २००९ या काळातील थकीत २३ कोटी रुपये मंजूर केल्याची घोषणा त्यांनी केली. न थकता हा प्रवास चालू होता. घरघर करीत हेलिकॉप्टर आकाशात उडाले. धुरळा बसताना जाणवत होते. विकास ही अखंड अशी प्रक्रिया आहे. ती घडवण्यासाठी अशीच ऊर्जा असणारा आणि अथक वाटचाल करणारा विकासपुरुष असावा लागते.

**(लेखक हे गडचिरोली येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९८२३१९९४६६**

# ३६ हजार नागरिकांना लाभ

@वर्धा

**शासनाच्या विविध योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासोबतच संपूर्ण प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी समाधान शिबिर आयोजनाची सुरुवात करण्यात आली. हिंगणघाट मतदार संघात ३६ हजार नागरिकांना एका छत्राखाली १८ प्रकारच्या योजनांचा लाभ देण्यात आला. या शिबिराने हा राज्यात नवीन विक्रम केला असल्याचे गौरवोद्‌गार मुख्यमंत्र्यांनी काढले.**

**श्याम टरके**

शेतकरी, कष्टकरी व सामान्य जनतेचे आपल्या कामांसाठी यापुढे शासकीय कचेरीत चकरा मारण्याचे दिवस संपले असून समाधान शिबिराच्या माध्यमातून शासन जनतेपर्यंत पोहोचले आहे. हिंगणघाट मतदार संघात ३६ हजार नागरिकांना विविध योजनांचा लाभ देऊन राज्यात नवीन विक्रम तयार केला आहे. समाधान शिबिराचा हा उपक्रम राज्यात प्रभावीपणे राबवून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

महाराजस्व अभियानांतर्गत हिंगणघाट तालुक्यातील वडेनर येथे समाधान शिबिर व शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष चित्राताई रणनवरे, खासदार रामदास तडस व आमदार समीर कुणावार, जिल्हाधिकारी आशुतोष सलिल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय मीणा आदी उपस्थित होते. हिंगणघाट मतदारसंघात आमदार समीर कुणावार यांनी राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक करताना मुख्यमंत्री म्हणाले, की हे जनतेचे प्रशासन असल्याची प्रचिती या उपक्रमाच्या माध्यमातून येत आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून यापुढे मागेल त्याला शेततळे या उपक्रमांतर्गत पाच लाख शेततळी निर्माण करून पाणी, सिंचन तसेच कृषिपंप देऊन शेतकऱ्यांना शेतीबरोबर पूरकउद्योग सुरू करण्याला प्रोत्साहन देण्यात येत आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लाभार्थी महिलेला प्रमाणपत्र प्रदान करताना.

हिंगणघाट येथे कापसाची मोठी बाजारपेठ असल्यामुळे वर्धा व यवतमाळ जिल्ह्याचा समन्वय करून येथे टेक्सटाइल पार्क सुरू करण्यात येईल. शेतकरी कष्टाने उत्पादन करतो. परंतु त्यानंतर दलालाच्या हातातून त्याला बाहेर काढण्यासाठी कृषी उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यासाठीचे प्रकल्प सुरू करण्यात येणार आहेत. यामध्ये रामदेवबाबा १ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक विदर्भात करणार असून कोकाकोला ही कंपनी संत्र्यावर प्रक्रिया करणारा उद्योग उभारणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## आजनसरा बॅरेज प्रकल्पाला निधी

आजनसरा बॅरेज हा प्रकल्प १०० ते १२५ गावातील सिंचनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प असून या प्रकल्पाला २००५ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाला येत्या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून देण्यात येणार येईल. अमरावती जिल्ह्याच्या धर्तीवर पालकमंत्री पांदण रस्ता हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबवण्यात येईल.

## ड्रायपोर्टसाठी एक महिन्यात जमीन

सिंदी रेल्वे येथे प्रस्तावित असलेल्या ड्रायपोर्टसाठी जमिनीची अडचण निर्माण झाली असून येत्या एक महिन्यात या जमिनीसंदर्भात निर्णय घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशुतोष सलील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येत्या एक महिन्यात सुरू करून शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातून लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. समाधान शिबिराच्या माध्यमातून जनतेला शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आमदार समीर कुणावार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रशासनाने उत्तमरीत्या जनतेला सेवा दिल्याबद्दल जिल्हाधिकारी आशुतोष सलील, उपविभागीय अधिकारी घनश्याम भूगावकर, तहसीलदार दीपक कारंडे, समुद्रपूरचे तहसीलदार सचिन यादव यांचा गौरव करण्यात आला.

शिबिरात १५ हजार २०४ लाभार्थ्यांना १८ प्रकारच्या विविध योजनांचा थेट लाभ देण्यात आला. प्रातिनिधिक स्वरूपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनेक योजनांच्या लाभार्थ्यांना आवश्यक दस्तवेज देण्यात आले.

**(लेखक हे वर्धा येथे माहिती सहायक आहेत.)**
**संपर्क : ०९८६००७८९८८**

# चला, वाचवू या पाणी...

जलजागृती सप्ताह १६ ते २२ मार्च

नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण आणि पावसाची अनिश्चितता झाल्याने पाण्याचे नियोजन करण्यात अडचणी निर्माण होत आहे. सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे राज्यातील पाणी टंचाईच्या संकटावर उपाययोजना म्हणून आवश्यक त्या पायाभूत सुविधा शासनामार्फत करण्यात येत आहे. यात पाण्याची उपलब्धता, पाण्याचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, नैसर्गिक जलस्रोत, पाण्याचे प्रदूषण रोखणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे आदीबाबत समाजात जागृती व साक्षरता वाढविण्यावर भर दिला जात आहे.

**जागतिक जलदिनाचे औचित्य साधून राज्यात १६ ते २२ मार्च हा सप्ताह 'जल जागृती सप्ताह' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून समाजात जलजागृती व्हावी या उद्देशाने संपूर्ण आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

जल जागृतीसंदर्भातील उपक्रम राबवण्यासाठी जलसंपदा विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नगर विकास विभाग, पर्यावरण विभाग,उद्योग विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, माहिती व जनसंपर्क या विभागांची निवड करण्यात आली आहे. हे विभाग पाणी वापरासंबंधी कायदे, सिंचन प्रकल्पांची रचना, घोषवाक्ये, दूरदर्शनवर चित्रफिती दाखविणे, पुढील वर्षी उपलब्ध पाण्यातून किमान १० टक्के सिंचन क्षेत्र वाढविणे, सूक्ष्म सिंचनाचे फायदे, पिकांसाठी पाण्याची नेमकी गरज, वृत्तपत्रांमधून लेख प्रकाशित करणे, टंचाईग्रस्त भागात पाणी पुरवठ्याची व्यवस्था, अवर्षण परिस्थितीत पाणी दीर्घ काळ टिकून राहण्यासंदर्भात जागृती, नैसर्गिक प्रवाहाचे प्रदूषण रोखणे, विद्यार्थ्यांमध्ये पाण्याचे महत्त्व पटविणे, जलदिंडी, जलशिवार, जल साक्षरता, विहीर पुन:र्भरण आदी कामाचे नियोजन करण्यात येत आहे.

राज्यात जलजागृती सप्ताह कार्यक्रम राबवण्यासंदर्भात जलसंपदा विभागाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून सन २०१६-१७ या वर्षात किमान १० टक्के सिंचन क्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तसेच १६ मार्च ते २२ मार्च या कालावधीत विविध उपक्रम राबवण्याची जबाबदारी पाटबंधारे विकास महामंडळाच्या प्रमुखावर सोपविण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. १६ मार्च २०१६ रोजी मंत्रालयाच्या मुख्य इमारतीमध्ये



**पाण्याचा काटकसरीने वापर व पाण्याचे नियोजन ही काळाची गरज आहे. शासनस्तरावर तर विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. यात जनसहभाग अत्यंत आवश्यक आहे. जलजागृती सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन मी करीत आहे.**

**- गिरीष महाजन, जलसंपदा मंत्री**

जलजागृती सप्ताहाचे उद्‌घाटन होणार असून प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते या सप्ताहाचे उद्‌घाटन होणार आहे. लाभक्षेत्रातील प्रत्येक गावात दिनांक १७ ते २१ मार्च २०१६ या कालावधीत एक कार्यशाळा, चर्चा आणि सभा घेण्यात येणार आहे. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या ठिकाणी २० मार्च २०१६ रोजी 'वाटर रन' या धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी वापर संस्था व लाभधारकांच्या कार्यशाळा या १९ ते २१ मार्च २०१६ या कालावधीत तालुक्याच्या ठिकाणी घेण्यात येणार असून २२ मार्च २०१६ रोजी पालकमंत्री यांच्या उपस्थितीत या सप्ताहाचा समारोप करण्यात येणार आहे.

या सप्ताहात पूर्ण झालेल्या प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनाबाबत जागृती करणे, बांधकामाधीन प्रकल्पाबाबत लाभधारकांमध्ये जागृती निर्माण करणे यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात विविध विभागांमार्फत जलजागृती सप्ताह राबवण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व जिल्ह्यातील संबंधित विभाग, नागरिकांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ व्यक्ती तसेच प्रसार माध्यमाचा समावेश असणारी एक समिती स्थापन करण्यात येत असून, ही समिती नियोजन व अंमलबजावणी करणार आहे. तसेच प्रत्येक महसूल विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या एका जिल्ह्याची निवड करण्यात येणार असून शासनस्तरावर तीन जिल्ह्यांचा महाराष्ट्र दिनी गौरव करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : संजय ओरके**



## तीन महापालिकांना केंद्राचा 'स्वच्छ सर्वेक्षण' पुरस्कार

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत देशातील १५ शहरांना 'स्वच्छ सर्वेक्षण-२०१६' पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि नागपूर महानगरपालिकेचा समावेश आहे.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मीडिया सेंटरच्या सभागृहात केंद्रीय नगर विकास मंत्रालयाच्या वतीने 'स्वच्छ सर्वेक्षण-२०१६' मध्ये निवड झालेल्या शहरांची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेनंतर केंद्रीय नगर विकास मंत्री वैंकय्या नायडू यांच्या हस्ते देशातील १५ महानगरपालिकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.



पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या महापौर शकुंतला धराडे, महानगरपालिका आयुक्त राजीव जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला. बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उपमहापौर डॉ. अलका केरकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. पल्लवी दराडे यांनी पुरस्कार स्वीकारला. नागपूर महानगरपालिकेतर्फे महापौर प्रवीण दटके, अतिरिक्त आयुक्त नैना गुंडे यांनी पुरस्कार स्वीकारला.

'स्वच्छ सर्वेक्षण-२०१६' अंतर्गत निवड करण्यात आलेल्या ७३ शहरांची घोषणा करण्यात आली. यामध्ये १० लाखांच्या वर लोकसंख्या असणाऱ्या ५३ शहरांचा समावेश आहे. तसेच २२ राजधानीच्या शहरांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या शहरांमध्ये सर्वांगीण स्वच्छतेला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले आहे.

७३ शहरांची निवड विविध निकषांद्वारे करण्यात आली आहे. यामध्ये स्वच्छतेचे विविध मापदंड, सेवास्तर दर्जा अंतर्गत १००० गुण ठेवण्यात आले. याअंतर्गत उघड्यावर शौच, एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन, माहिती, शिक्षण, संचार वर्तणुकीतील बदल, घरोघरी जाऊन कचरा उचलणे, सार्वजनिक शौचालय, व्यक्तिगत शौचालय यांचे निरीक्षण करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला उपग्रह तंत्रज्ञानात अग्रेसर शहरांच्या श्रेणीत सर्वोत्कृष्ट शहराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बृहन्मुंबई महानगर पालिकेला मोठ्या शहरांच्या श्रेणीतील सर्वोत्कृष्ट शहराच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पश्चिम क्षेत्रातील उद्योन्मुख महानगरपालिकांमध्ये राज्यातील नागपूर महानगरपालिकेला सन्मानित करण्यात आले. स्मार्ट सिटी योजनेत ४०० शहरांच्या यादीत २५६ व्या क्रमांकावर असणारे नागपूर शहराने स्वच्छतेचे सर्व मापदंड पाळीत आपला क्रमांक २० वर आणला. नागपूर महानगरपालिकेने राबवलेल्या घरोघरी जाऊन कचरा वेचण्याच्या उपक्रमामुळे शहर कचरामुक्त झाले. त्याकरिता नागपूर महानगरपालिकेला गौरवण्यात आले.

## नागरी सेवा परीक्षेच्या मुलाखतीसाठी विनामूल्य प्रशिक्षण

नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०१५ मध्ये बसलेल्या व मुलाखत परीक्षेकरिता निवड झालेल्या उमेदवारांकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेत विनामूल्य मुलाखत प्रशिक्षण कार्यक्रम २० एप्रिल, २०१६ पासून आयोजित करण्यात आला आहे.

नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०१५ या परीक्षेचा निकाल मार्च-२०१६ च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. ज्या उमेदवारांना या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी ११ मार्च २०१६ पर्यंत संध्याकाळी ५ वाजेपर्यंत छायाचित्र लावलेल्या विहित नमुन्यातील अर्जाच्या ६ प्रती व सोबत हॉलतिकिटची छायाप्रत लावून कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. विहित अर्ज कार्यालयात तसेच संस्थेच्या www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार नाही. सविस्तर कार्यक्रम वरील संकेतस्थळावर असेल.

## तारांकित

### मुख्यमंत्र्यांना सलाम...

'मेक इन इंडिया' सप्ताहादरम्यान १४ फेब्रुवारी रोजी गिरगाव चौपाटीवर आयोजित 'महाराष्ट्र रजनी' कार्यक्रम ऐन रंगात असताना सदोष विद्युत उपकरणांमुळे शॉर्टसर्किट होऊन रंगमंचाला आग लागली. या आगीत काही क्षणात रंगमंच खाक झाला. रंगमंचावरील कलाकारांची धावपळ सुरू झाली. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहपरिवार उपस्थित होते. सुरक्षेच्या दृष्टीने आपण हे स्थळ सोडावे, अशी विनंतीवजा सूचना सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना करण्यात आली. परंतु सर्वांना सुरक्षित ठिकाणी नेईपर्यंत तेथेच थांबण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मुख्यमंत्र्यांच्या या धाडसाचे मुंबई पोलिसांनी कौतुक केले आहे.



रंगमंचावर आगीचे लोण पसरल्यानंतर लागलीच मुख्यमंत्री तसेच अन्य अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी सुरक्षा यंत्रणांची धावाधाव सुरू झाली. सहआयुक्तांनी मुख्यमंत्र्यांना सुरक्षित ठिकाणी जाण्याची विनंतीही केली, परंतु ती त्यांनी साफ नाकारली. शेवटची व्यक्ती सुरक्षित बाहेर पडेपर्यंत आपण येथेच थांबणार असे मुख्यमंत्र्यांनी ठामपणे बजावले. नागरिकांच्या सुरक्षेच्या बाबतीतील त्यांच्या या कृतीबद्दल 'मुंबई पोलिसांतर्फे मुख्यमंत्र्यांना सलाम'.. अशा शब्दांत पोलीस आयुक्तांनी ट्विटद्वारे मुख्यमंत्र्यांची प्रशंसा केली आहे.

## महिला बचतगटांना बिनव्याजी कर्ज



राज्यातील महिला बचतगटांना आता बिनव्याजी कर्ज देण्यात येईल व त्याच्या व्याजाची रक्कम शासन भरेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे भरलेल्या महिलांच्या विभागीय मेळाव्यात केली. विभागीय क्रीडा संकुलात नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांतील महिला बचतगटांसाठी २१ फेब्रुवारी रोजी विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे, तर प्रमुख पाहुणे पालकमंत्री व ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते. व्यासपीठावर महापौर प्रवीण दटके, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती निशा सावरकर(नागपूर) आदी उपस्थित होते.

महिला बचतगटातर्फे उत्पादित होणाऱ्या वस्तुंचे पॅकेजिंग व ब्रँडिंग केले तर जगातील मोठ्या कंपन्यांना आपण निश्चितपणे मागे टाकू शकू असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यापुढे महिला बचतगटांना वर्षभर वस्तू विकण्यासाठी जिल्हास्तरावर मॉल उभारण्याच्या कामांना प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे वैविध्यपूर्ण व दर्जेदार साहित्य निर्माण होईल. यासाठी पहिला 'मॉडेल मॉल' नागपुरात बडकस चौकातील जिल्हा परिषदेच्या जागेवर उभारण्यात येईल. घेत असलेल्या कर्जाची १०० टक्के परतफेड महिला बचतगट करतात. त्यांचा प्रामाणिकपणा व स्वाभिमान इतर कर्ज परत न करणाऱ्या उद्योगपतींच्या तुलनेत कितीतरी मोठा आहे. म्हणूनच देश व राज्याच्या प्रगतीत महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

महिला विकास व बाल विकास एकत्र केल्यानंतर राज्याचा सर्वांगीण विकास सहज शक्य आहे. तो कोणीही रोखू शकत नाही. समाजात स्त्री म्हणून काम करत असताना तिने स्त्रीत्व जपून आत्मशक्ती वाढविली पाहिजे. त्यामुळे स्त्रीशक्तीला जास्तीत – जास्त प्राधान्य देण्याची गरज आहे. ते काम स्वयंसहायता बचतगटांच्या माध्यमातून राज्य शासन महिलांच्या पाठीशी भक्कमपणे राहून करीत आहे, असे श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले.

राज्यात चीनप्रमाणे चोवीस तास सुरू राहणारे मॉल सुरू करण्यात येणार आहेत. महिला स्वयंसाहायता बचतगटासाठी राज्यातील पहिल्या मॉलचे नागपूर येथील बडकस चौक परिसरात लवकरच उद्‌घाटन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच असे मॉल राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उभारले जातील. या मॉलमध्ये महिला स्वयंसाहाय्यता बचतगटाने तयार केलेले पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात येतील, असे सांगून पुढे त्या म्हणाल्या की राज्य शासन या बचतगटांच्या पाठीशी भक्कमपणे आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सबलीकरण आणि सक्षमीकरणासाठी शासन नवनवीन धोरणे राबवत आहे. महिला सबलीकरण हा सुद्धा ग्रामविकासाचा महत्त्वाचा भाग आहे.

राज्यातील पन्नास टक्के लोकसंख्या आर्थिकदृष्ट्या सबल झाली तर राज्याला विकास करण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. त्यामुळे महिला बचतगटांना सक्षम करणे आणि त्यांचा विकास करणे गरजेचे असल्याचे श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# तारांकित

### नौदल पूर्व विभाग प्रमुखपदी ॲडमिरल सुनील भोकरे

नौदलाच्या पूर्व मुख्यालयाच्या प्रमुखपदी 'फ्लिट कमांडर' म्हणून रिअर ॲडमिरल सुनील वसंत भोकरे या मराठी अधिकाऱ्याची निवड झाली आहे. विनाशिका, पाणबुडय़ा, क्षेपणास्त्रांचा मारा करू शकणाऱ्या नौका, इंधनवाहू नौका, लढाऊ जहाज अशा जवळपास ३० आयुधांच्या साहाय्याने देशाच्या पूर्व भागातील सागरी सीमा सुरक्षित राखण्याची जबाबदारी नौदलाच्या पूर्व



मुख्यालयाकडे आहे. याच्या प्रमुखपदी श्री. भोकरे यांची निवड महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. विशाखापट्टणमच्या नौदल तळावर झालेल्या एका सोहळ्यात त्यांनी या पदाची सूत्रे स्वीकारली. नौकानयन आणि विमानाचे दिशादर्शन यातील तज्ज्ञ म्हणून त्यांची खरी ओळख. सातारच्या सैनिकी शाळेतून शिक्षण घेतल्यानंतर खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि वेलिंग्टनच्या डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेजमधून भोकरे यांनी लष्करी पदवी प्राप्त केली. याव्यतिरिक्त ऑस्ट्रेलियन संरक्षण महाविद्यालयातून संरक्षण व सामरिक शास्त्राची पदव्युत्तर पदवी मिळवली. संरक्षण क्षेत्रातील सखोल ज्ञान प्राप्त करताना नौदलातील वेगवेगळ्या विभागांची जबाबदारी भोकरे यांनी यशस्वीपणे सांभाळली. सिंधुघोष, सिंधुध्वज, सिंधुशस्त्र या पाणबुड्यांबरोबर आयएनएस वज्रबाहूचे संचलन त्यांनी केले आहे.

## बारावी परीक्षेत अयशस्वी विद्यार्थ्यांना संधी

गेल्या वर्षी दहावीची फेरपरीक्षा तत्काळ घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही याची काळजी शालेय शिक्षण विभागाने घेतली. आता बारावीत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचीही फेरपरीक्षा जुलैमध्येच घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून होणार आहे.



या निर्णयामुळे १२ वीच्या नियमित परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना लगेच फेरपरीक्षेची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचणार असून या यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात त्याच वर्षी सामील होता येईल. गेल्या वर्षी १० वी परीक्षेमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा २१ जुलै ते ५ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत आयोजित करून त्याचा निकाल २५ ऑगस्ट, २०१५ रोजी जाहीर करण्यात आला होता. या फेरपरीक्षेमध्ये ५७,५१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ते नव्याने इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी पात्र ठरले. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान टळले होते.

दहावी आणि बारावीच्या नियमित परीक्षा या फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येतात. पुरवणी परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये घेण्यात येतात. परंतु दहावीच्या फेरपरीक्षा जुलैमध्ये घेण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळाला. आता उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) फेरपरीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर ऐवजी जुलै-ऑगस्टमध्ये घेण्यात येणार आहेत. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) च्या फेरपरीक्षा याच सुमारास होणार आहेत.

## पाणीपुरवठ्याची देयके ऑनलाइन

सामान्य नागरिकांना सर्व सुविधा जलदगतीने व एका छताखाली उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डिजिटल भारत हे उद्दिष्ट देशासमोर ठेवले असून ते साध्य करण्यासाठी विभागामार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्रातील ग्राहकांना घरबसल्या पाणी देयके भरता यावीत यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे, असे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालवण्यात येत असलेल्या २४ नागरी पाणी पुरवठा केंद्रातील सुमारे अडीच लाख ग्राहकांना या ऑनलाइन सुविधेचा फायदा होणार आहे. सध्या वेण्णा, अमरावती, अंबरनाथ व सातारा या चार नागरी पाणी पुरवठा केंद्रातील ग्राहकांसाठी ही ऑनलाइन सुविधा उपलब्ध होणार असून अल्पावधीतच चोवीस नागरी पाणी पुरवठा केंद्रासाठी ऑनलाइन सुविधा विस्तारित करण्यात येत आहे. ही सुविधा वापरण्यासाठी ग्राहकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या https://mjp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सिटीजन्स कॉर्नरमधील वॉटर बिल पेमेंट/पाणी देयक भरणा या लिंकवर क्लिक करावे लागेल.

## तारांकित

### इस्त्रायल गिरवणार मराठीचे धडे

मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार हा विदेशात व्हावा यासाठी मराठी भाषा मंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून इस्त्रायलमधील तेलअविव या विद्यापीठाशी मराठी भाषा शिकवण्याचा सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. विदेशात मराठी भाषेचा अभ्यासक्रम सुरू करण्याची ही बहुधा पहिलीच घटना असून नजीकच्या काळात अन्य देशांमध्येही मराठी भाषेसाठी सामंजस्य करार करण्यात येईल. जेणेकरून मराठी भाषेचा प्रसार जगभरात होईल, असा विश्वास श्री. तावडे यांनी व्यक्त केला.

इस्त्रायलमधील तेलअवीव विद्यापीठात मराठी भाषा शिकवण्यासाठी तेलअविव विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि राज्य मराठी विकास संस्था यामध्ये हा सामंजस्य करार पार पडला. इस्त्रालयमध्ये मराठी भाषिक लोकांची वस्ती अधिक आहे. त्यामुळे तेलअविव या विद्यापीठात सामंजस्य करारामुळे तेथेदेखील मराठी भाषा शिकता येणार आहे. देशविदेशात मराठी भाषेचा प्रसार करणे हा या करारामागील प्रमुख उद्देश्य आहे. या सामंजस्य कराराप्रसंगी मराठी भाषा मंत्री विनोद तावडे, तेलअवीव विद्यापीठाचे उपाध्यक्ष प्रा. रानान रैन, इस्त्रायलचे वाणिज्य दूत डेविड अकोव्ह, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख आणि राज्य मराठी विकास संस्थेचे आनंद काटीकर आदी मान्यवर उपस्थित होते.



## आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची देशातील पहिली वसाहत




चंद्रपूर मार्गावरील नवेगावजवळील मौजा मुरखळा येथे आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या नवजीवननगर या नवीन वसाहतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच झाले. ही देशातील पहिलीच आत्मसमर्पित नक्षलवाद्यांची वसाहत आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी भूखंड मिळालेल्या आत्मसमर्पित नक्षलवाद्यांशी हस्तांदोलन करून सुखी जीवन जगण्यासाठी मुख्य प्रवाहात आल्याबद्दल अभिनंदन केले.

जंगलातील नक्षल चळवळ सोडून हिंसेच्या मार्गाचा त्याग करणाऱ्या नक्षलवाद्यांना सुखसमाधानाने जगण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने आर्थिक मदतीसह रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याचबरोबर त्यांना राहण्याकरिता घरबांधणीसाठी शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत भूखंड वितरण योजना सन २००५ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना भूखंड मिळण्यासाठी पोलीस अधीक्षक गडचिरोली यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी ५.५३ हेक्टर जमीन मंजूर करण्यात आली आहे.

या जागेवर ३० बाय ३० चौ. फुटाचे एकूण १७४ भूखंड तयार करण्यात आले आहे. या जागेवर अंगणवाडी, शाळा, समाज मंदिराकरिता २७६९.३७५ चौ.मी., बाजारासाठी ५१३.१३५ चौ.मी. आणि खुली जागा ३४०८.२० चौ.मी. ठेवण्यात आली आहे. आत्मसमर्पित नक्षलवाद्यांकडून घरबांधणीसाठी केलेल्या भूखंडांच्या मागणीनुसार पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी आत्तापर्यंत एकूण १०६ आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना भूखंड वितरण केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त राज्यातील सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या दलित उद्योजकांना (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती) उत्तेजन देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व स्वयंपूर्ण करण्याबरोबरच औद्योगिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना राबवण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील उद्योगांचा दुर्गम व अविकसित क्षेत्रामध्ये प्रसार करण्यासह त्यांना चालना देण्यासाठी या भागात स्थापन होणाऱ्या नवीन किंवा विस्तारित उद्योगांना प्रोत्साहन म्हणून सामूहिक प्रोत्साहन योजना राबवण्यात येते. शासनाने नुकतेच नवीन औद्योगिक धोरण घोषित केले असून त्याद्वारे शाश्वत औद्योगिक विकास साधण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे राज्यातील औद्योगिक वाढीसाठी सुयोग्य वातावरण निर्मिती करण्यात येते. तसेच जागतिक स्तरावर स्पर्धात्मक स्थान प्राप्त करण्यासाठीही प्रयत्न केले जातात.

# तारांकित

## अरूण खोपकर यांना साहित्य अकादमी पुरस्कार

ज्येष्ठ लेखक व दिग्दर्शक अरूण खोपकर यांना मराठी भाषेसाठीचा २०१५ चा साहित्य अकादमी पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. 'संस्मरणे' या साहित्य प्रकारात लिखित निबंध संग्रह 'चलत चित्रव्यूह' या मराठी भाषेतील सर्वोत्कृष्ट पुस्तकाची निवड करण्यात आली होती. कोकणी भाषेकरिता उदय भेंब्रे यांच्या 'कर्ण पर्व' या पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



### विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार

मराठी साहित्य क्षेत्रात भरीव व मोलाची कामगिरी करणारे ज्येष्ठ समीक्षक व लेखक प्रा. रा. ग. जाधव यांना २०१५ या वर्षासाठीचा 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार', पुणे येथील कॉन्टिनेन्टल प्रकाशन या प्रकाशन संस्थेस २०१५ वर्षासाठीचा श्री. पु. भागवत पुरस्कार जाहीर झाला आहे.

### तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर तमाशा जीवनगौरव पुरस्कार

हा पुरस्कार गंगाराम कवठेकर यांना घोषित झाला आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत प्रतिवर्षी तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ कलावंतास तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या स्मरणार्थ तमाशा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.

**माघ महिन्याच्या थंडीची शिरशिरी थोडी कमी झाली की, वातावरणात थोडासा उबदारपणा येतो. मधूनच येणाऱ्या आल्हाददायक वाऱ्याची झुळूक मन प्रसन्न करू लागते. अशातच झाडांच्या गर्दीत हिरव्याकंच पानातून मध्येच डोकावते ती भडक केशरी रंगाची पळसाची फांदी. लालचुटूक केशरी फुले आंगोपांगी ल्यायलेले, पानांचा मागमूस नसलेले पळसाचे झाड पुढे येणाऱ्या होळीची आणि धुळवडीची वर्दी देऊ लागते. होळी फाल्गुन महिन्यातल्या पौर्णिमेला आणि सौर दिनदर्शिकेप्रमाणे साधारण मार्च महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होळी येते. होळीला हुताशनी पौर्णिमा, मदनदहन असेदेखील म्हटले जाते.**

# रंग धूळमातीचा

होळी का साजरी केली जाते यासाठी भक्त प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू राजाची गोष्ट सगळ्यांनीच लहानपणी ऐकलेली असते. याशिवाय यासंदर्भात असेही सांगितले जाते की, सर्वप्रथम पृथ्वीवर झालेल्या महायुद्धाच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी होळी प्रज्वलित करण्याची परंपरा आहे. होळीला मदनदहन असेही एक नाव आहे. याविषयी असे सांगितले जाते की तपश्चर्येला बसलेल्या शंकराला घायाळ करण्यासाठी मदनाने प्रयत्न केले त्याचा राग येऊन शंकरांना मदनालाच दग्ध केले याची आठवण म्हणून होळी साजरी केली जाते.



होळी येण्याच्या १५ दिवस आधीपासूनच मुलांची होळीसाठी लाकडे जमवण्याची लगबग सुरू होते. होळी कशी पेटवावी याचे एक शास्त्र आहे. कशीही आणि मिळतील ती झाडं, ओरबाडून होळीत टाकणे आपल्या संस्कृतीला मंजूर नाही. सर्वप्रथम जिथे होळी पेटवावयाची तिथली जागा स्वच्छ करून सारवली जाते. त्यावर रांगोळी काढून मग होळी रचली जाते. यासाठी प्रथम एरंड किंवा ऊस मध्यभागी रोवला जातो. त्यानंतर त्याभोवती वर्तुळाकार गोवऱ्या, लाकडे रचली जातात आणि नंतर संपूर्ण होळीभोवती छान रांगोळी रेखाटली जाते. होळीत घालायला शेणाच्या गोवऱ्यांची माळ करण्याची पद्धत होती. घरोघरी मुले वेगवेगळ्या आकाराच्या गोवऱ्या करून त्याची माळ होळीसाठी करून ठेवायचे. आता बदललेल्या जीवनशैलीत हे सारे मागे पडले आहे. होळीला नैवेद्य असतो. पुरणपोळीचा या दिवशी मुले दिवसभर होळीची तयारी करण्यात गढून गेलेली असतात तर स्त्रीवर्गाने स्वयंपाकघरात पुरणपोळीचा घाट घातला असतो. सगळीकडे उत्साह आणि लगबग सुरू असते.

होळीच्या दिवसात बाजार तर अगदी रंगीबेरंगी होतो. लाल, पिवळा, गुलाबी, जांभळा अशा अनेक रंगांचे ढीग लागलेले असतात. दुकानांमध्ये साखरेच्या माळा किंवा केशरी, पांढऱ्या मोठमोठ्या गाठ्यांची तोरण लटकत असतात.

होळीचा दुसरा दिवस अर्थातच धुळवड किंवा शिमगा. शिमग्याला विदर्भात 'धूळमाती' असाही एक शब्द आहे. बोलीभाषेत 'धुयमाती' म्हणतात. भारतीय सणांच्या शिस्तबद्धतेत न बसणाऱ्या या सणाचे मला नेहमी आश्चर्य वाटते. नऊ रसांना जीवनात समान स्थान असले तर जीवन सुंदर जगता येते असा भारतीय शास्त्रांचा विश्वास आहे. त्या नऊ रसांत 'बीभत्स' हा रसही आलाच मग सणांमध्ये त्याला टाळून कसे चालेल? माणसातल्या बीभत्सपणाचे जाहीर प्रदर्शन शिमग्याच्या रूपाने होते. होळीनंतर येते ते नवीन वर्ष, या नवीन वर्षाला सामोरे जाण्यापूर्वी वर्षभरात घडलेल्या वाईटसाईट घटना, अपमान, भांडण, खटकलेल्या गोष्टींचा निचरा करण्यासाठी धुळवडीसारख्या सणांची निर्मिती पूर्वजांनी करून ठेवली आहे. होळीच्या बोंबा मारून विषयाला पूर्णविराम द्यायचा ही एक साधीसोपी पद्धत त्यांनी धुळवडीतून रुजविली आहे. धुळवड कुणी खेळायची हे सांगताना माझे आजोबा म्हणायचे जो वर्षभर सुसंस्कृतपणे वागतो त्याला होळीचा एक दिवस बोंबा मारायची मुभा आहे.

**कीर्ती पांडे**

पूर्वी धुळवड, रंगपंचमीचे रंग पळसाच्या फुलांपासून, कडुनिंबाच्या पानापासून, हळदीपासून वगैरे बनवले जात. खूप घट्ट नसले तरी या वनस्पतींच्या अर्कांचा शरीरावर चांगला परिणाम होत होता.आता आपल्याला लवकर न निघणारे अनेक छटांचे रंग हवे असतात त्यामुळे मग



॥ संस्कृती ॥

या नैसर्गिक रंगाची जागा केमिकल्सनी घेतली आहे. त्यातून अनेक अपघात दरवर्षी होतात. हे सगळे खरेतर टाळता येण्यासारखे आहे. काही प्रमाणात पाणी आणि रंग खेळणे समजण्यासारखे आहे. पण टँकरच्या टँकर एकमेकांच्या अंगावर ओतून पाणी वाया घालवणे कितपत योग्य आहे. महाराष्ट्राच्या काही भागात जेव्हा लोकांना जरुरीपुरतेही पाणी नाही तेव्हा तर पाण्याचा अपव्यय करणे अगदीच अयोग्य. नैसर्गिक कोरड्या रंगांनी होळीची तेवढीच मजा घेता येईल. त्यासाठी पळस, कडूनिंब वगैरे झाडे गावात दरवर्षी लावली गेली तर निसर्गही रंगाची लयलूट मुक्तहस्ताने करेल. शेवटी होळी म्हणजे तरी काय, सभ्यपणाचा बीभत्सपणावर विजय नाही का?

### शिवशिमगा

शिमग्याच्या दिवशी साखरेच्या माळा ज्यांना गाठी म्हणतात त्या लहान मुलांना देण्याची प्रथा आहे. याशिवाय काही ठिकाणी पाच वर्षापर्यंतच्या मुलांचा शिमगा खास कुटुंबातून साजरा केला जातो. त्याला शिवशिमगा म्हणतात. या दिवशी घरातल्या छोट्या मुलांना पांढरे कपडे घातले जातात. त्यांच्या मित्रमैत्रिणींना बोलावले जाते. त्यांच्या आवडीचा काहीतरी खाऊ केला. छोट्या वाट्यांमधून केशराचे पाणी या मुलांना भेट दिले जाते. यामागे या छोट्या मुलांना समाजाच्या प्रवाहात रुजवण्याचा हेतू दिसतो. छोटी मुले रंगांना घाबरतात. त्यामुळे त्यांची ही भीती घालवण्यासाठी शिवशिमगा करण्यात येत असावा. त्याचप्रमाणे नवविवाहितांना सासरहून पांढरे कपडे, गाठी देण्याची पद्धत महाराष्ट्रात काही ठिकाणी रूढ आहे.

आदिवासी समाजात होळी सर्वात महत्त्वाचा सण मानला जातो. कामानिमित्त बाहेरगावी असणारे लोक होळीसाठी गावाची वाट धरतात. ठाणे जिल्ह्यातील वारली, कातकरी किंवा सह्याद्रीच्या कुशीत ठाव घेतलेले भिल्ल, अमरावती जिह्यातील कोरकू तसेच चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील गोंड, कोलाम, परधान, या सार्‍यांसाठी होळी हा महत्त्वाचा सण आहे. ते विजयोत्सव म्हणून होळी साजरी करतात. पेटलेल्या होळीभोवती ढोलकीच्या तालावर धुंद होऊन आदिवासी महिला, पुरुष नाचत असतात.

भिल्लांचे होळी नृत्य प्रसिद्ध आहे. याशिवाय नंदूरबार जिल्ह्यातील आकृर्णी काठी इथली होळी प्रसिद्ध आहे. या होळीपूर्वी या भागात होळीचे साहित्य खरेदी करण्यासाठी भोगऱ्या बाजार भरतो. पारंपरिक वेषभुषेमध्ये आदिवासी या बाजारात होळीला लागणारे, नारळ, गूळ, खोबरे, कपडे, गाठ्या, रंग इ. वस्तूंची खरेदी करण्यासाठी येतात. वेगवेगळी वेषभुषा करून होळीभोवती स्त्रीपुरुष वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने नाचतात. या वेषभुषेमध्ये, बुढ्याबाबा, होलीबाय, देवमोगरा, मिस्क्या, वागली अशा वेषभुषांचा आणि आदिवासी जीवनातील पारंपरिक चरित्रांचा समावेश असतो. कमरेभोवती भोपळे लटकवून नाचणारे हे आदिवासी आपल्या नृत्यातून पृथ्वीला आनंदित करण्याचा प्रयत्न करीत असतात. मेळघाटातील कोरकुंची होळी खूप प्रसिद्ध आहे. ढोलकी, टिमकी आणि बासरीच्या संगीतावर 'फाग' गीते गाताना कोरकू स्त्री-पुरुष भान हरपून जातात.

**(लेखिका या संस्कृती विषयाच्या अभ्यासक आणि महाराष्ट्र अहेडच्या संपादिका आहेत.)**
**संपर्क : ०९५९४९४४८००**



**बंजारा समाजाची वस्ती महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आहे. विशेषत: अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये हा समाज आढळतो. बंजारा समाजात होळी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने साजरी केली जाते. त्यांची होळी तीन दिवस चालते. ही होळी प्रत्यक्ष फाल्गुन पौर्णिमेला न पेटवता ते दुसऱ्या दिवशी म्हणजे धुळवडीला पेटवतात. रंगीबेरंगी पारंपरिक वेषभूषा करून स्त्री-पुरुष, लहान-थोर होळीभोवती वर्तुळाकार नाचतात. या तीन दिवसात प्रत्येक तांड्यावर होळीचे रंग उधळले जातात. होळीच्या या गीतांना लेंगी गीत म्हणतात. डफाच्या तालावर ही पारंपरिक लेंगी गीत गात, नृत्य करीत साजरी होणारी होळी वैशिष्ट्यपूर्ण असते.**



# गडावर पाणी कसे आले?


शिवाजी आणि संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर 'आज्ञापत्र' हा अत्यंत महत्त्वाचा आणि शिवकाळावर प्रकाश टाकणारा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहून घेतला. या ग्रंथातील दुर्ग आणि त्यांची व्यवस्था या प्रकरणात त्यांनी गड किल्ल्यांचे महत्त्व नमूद केले आहे. गड किल्ल्यांवरील पाण्याचे महत्त्वदेखील या ग्रंथामध्ये नमूद केलेले आहे.

या ग्रंथातील अत्यंत महत्त्वाचे वाक्य म्हणजे 'उदक पाहून किल्ला बांधावा'. याचाच अर्थ असा की ज्या जागेवर पाणी नाही ती जागा किल्ल्याच्या बांधकामासाठी योग्य नाही. तरीदेखील संरक्षणात्मक दृष्टीने महत्त्वाच्या अशा जागेवर किल्ला बांधण्याची गरज भासलीच तर त्या डोंगरावर तळी आणि टाकी खोदावित. जेणेकरून पावसाचे पाणी साठवून ते पावसाळ्यापर्यंत वापरता येईल अशी सोय करावी. यापुढे जाऊन रामचंद्रपंत आज्ञापत्रात असेही म्हणतात की, गडावर काही मोजकीच टाकी बांधून निश्चिंत राहू नये कारण युद्धामध्ये तोफांचे आवाज होतात आणि त्या आवाजाने दगडात असलेले झरे त्यांची दिशा बदलतात. अशा प्रकारे गडकिल्ल्यावर पाण्याचे मोठे संकट येऊ शकते. यासाठी गडावर ठिकठिकाणी खडक फोडून टाकी बांधावीत.

**महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांमध्ये जे मुख्य तीन प्रकार आपल्याला दिसतात त्यामधील गिरिदुर्ग हे कायमच दुर्गम ठिकाणी बांधलेले असतात. त्यामानाने भुईकोट हे दुर्गम ठिकाणी नसून ते शक्यतो नदीच्या काठावर किंवा मोकळ्या मैदानी प्रदेशामध्ये बांधलेले असतात. उंच डोंगरावर, मोकळ्या मैदानावर, समुद्रकिनाऱ्यावर किंवा सागरी बेटांवर किल्ला बांधायचा असल्यास त्यामध्ये पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पाण्याशिवाय कोणत्याच प्रकारचे बांधकाम कोठेही होऊ शकत नाही.**

**डॉ. सचिन जोशी**

आज्ञापत्रात पाण्याविषयी दिलेल्या माहितीप्रमाणे संह्याद्रीतील अनेक गडकिल्ल्यांवर खडकात खोदलेली पाण्याची टाकी बांधलेली दिसतात. काही ठिकाणी खडकात खोदलेल्या टाक्यांच्या सर्व बाजूने बांधीव दगडाची भिंत उभी करून त्या टाक्याची उंची वाढवलेली दिसते. यामुळे टाक्याची पाणी साठवण्याची क्षमता वाढते. खडक फोडून जेव्हा टाकी तयार केली जातात तेव्हा तो काढलेल्या खडकाचा उपयोग हा गडावरील तटबंदी, वाडे, दरवाजे यांच्या बांधणीसाठी केला जातो. मध्ययुगीन काळात किल्ल्यांवर जेव्हा पाण्याचे टाके खोदले जाते तेव्हा प्रत्येक टाक्याला जिवंत झरा लागेल या उद्देशाने ते कधीच खोदले गेले नाही. डोंगरावरील जागा ही दुर्गम असते. अशा ठिकाणी पाण्याचा साठ करावा लागतो. त्यामुळे अनेक टाकी ही पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी खोदली गेली. हे पावसाचे पाणी गडावर पावसाळ्यानंतर किमान तीन ते चार महिने वापरता येत असे. गडकिल्ल्यांवर वेगवेगळ्या प्रकारची टाकी खोदलेली दिसून येतात. आकाशाकडे तोंड असलेली, डोंगराच्या कपारीत खोदकाम करून तयार केलेली, दगडाचे कोरीव खांब असलेली, डोंगर उतारावर इंग्रजी 'डी' या अक्षराच्या आकाराची, इ. पुणे जिल्ह्यातील चावंड, सिंहगड, नाशिक




**''तैसेच गडावरी आधी उदक पाहून किल्ला बांधावा, पाणी नाही आणि ते स्थळ तर आवश्यक बांधणे प्राप्त जालें तरी आधी खडक फोडून तळी-टाकी पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे यैसी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे, जैसे- तैसे पाणीही पुरते, म्हणोन तितक्यावर निश्चिती न मानिता उद्योग करावा. किंनिमित्त कीं, जुझामध्ये भांडीयाचे आवाजाखाले झरे स्वल्प होतात. आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हा संकट पडते. याकरिता तैसे जागा जकेरीयाचे पाणी म्हणोन, दोन-चार तळी - टाकी बांधोन ठेऊन त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन राखावे.''**

**- आज्ञापत्र**

जिल्ह्यातील डेरमाळ, अहमदनगर जिल्ह्यातील पट्टा यासारख्या अनेक किल्ल्यावर समूहात बांधलेली टाकी दिसून येतात. सिंहगडावर २४ टाकी समूहात बांधलेली आहेत. रायगडावर बारा टाकी नावाचा टाक्यांचा समूह जगदीश्वर मंदिराजवळ आहे. खांब टाकी हा एक पाण्याच्या टाक्यांचा एक वेगळा प्रकार गडकिल्ल्यांवर पाहायला मिळतो. शिवनेरी, हरिश्चंद्रगड येथील खांब टाक्यांचा कालखंड साधारणतः १२ ते १३व्या शतकापर्यंत मागे जातो. रसाळगड, शिवनेरी या किल्ल्यांवरील खांब हे नक्षीदार आहेत. काही ठिकाणी या खांब टाक्यांना दरवाजे असल्याच्या खुणा देखील चौकटीवर दिसून येतात. सामानगड या नावाचा एक मोठा किल्ला कोल्हापूर जिल्ह्यात आहे. या किल्ल्यावर जांभा दगडात खोदलेल्या तीन मोठ्या विहिरी आहेत. याला स्थानिक लोक घोदेबाव असेही म्हणतात. वास्तविक या विहिरी नेहमीप्रमाणे गोलाकार नसून चौकोनी आहेत. विहिरीत उतरण्यासाठी जांभा दगडात खोदलेले कोरीव दरवाजे आणि मोठ्या पायऱ्यादेखील आहेत. कमळगड आणि दतेगड या गिरिदुर्गांची भौगोलिक स्थिती एकसारखी आहे. या दोनही विहिरी जांभा दगडात खोदलेल्या आहेत. उंच डोंगरावर पूर्णपणे सपाट असे छोटे पठार असून त्यावर एक आयताकृती आकाराची विहीर खोदलेली आहे. या विहिरीच्या तोंडाचा आकार छोटा असला तरीही याची खोली खूप जास्त आहे. विहिरीत उतरण्यासाठी खडकामध्येच पायऱ्या केलेल्या आहेत. साधारणतः १०० ते १२५ फूट खोल अशी विहीर दातेगड आणि कमळगडावर दिसते.





आकाराने हे दोन्ही किल्ले अगदीच छोटे असल्यामुळे या मोठ्या विहिरी व्यतिरिक्त किल्ल्यांवर इतर कोणताही पाणवठा नाही. राजगड, रायगड, सिंहगड, वसंतगड यासारख्या अनेक किल्ल्यांवर मोठमोठे तलाव बांधलेले दिसतात. विशेष म्हणजे पद्मावती तलाव, चंद्रतळे, गंगासागर, हत्ती तलाव अशी या तलावांची नावे सुद्धा ऐतिहासिक कागदपत्रात आलेली आहेत. या तलावांचा आकारदेखील खूप मोठा असून त्याला सर्व बाजूने कठडा बांधला जात होता. राजगड किल्ल्यावरील पद्मावती तलावात प्रवेश करण्यासाठी तर दरवाजा देखील बांधलेला दिसतो. लोहगड या प्रसिद्ध किल्ल्यावरील द्वादशकोनी तलावावर एक देवनागरी लिपीतील शिलालेख आहे. हा शिलालेख पेशवे काळात लिहिला गेला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील माणिकदुर्ग या किल्ल्यावरील टाक्यावर यक्ष प्रतिमा कोरलेल्या आहेत तर विसापूर किल्ल्यावरील पाण्याच्या टाक्यावर ब्राह्मी लिपीमध्ये शिलालेख कोरलेला दिसतो. नारायणगड या पुणे नाशिक महामार्गावरील किल्ल्याच्या टाक्यावर देवनागरी लिपीतील शिलालेख कोरलेला आहे. रायगड आणि विसापूर किल्ल्यावरील पाण्याच्या टाक्यांवर हनुमानाच्या प्रतिमा कोरलेल्या असून त्यापैकी रायगडावरील टाक्यालाच 'हनुमान टाके' असे नाव आहे. मुल्हेर आणि हातगड यासारख्या काही किल्ल्यांवर पाण्याच्या मोठ्या आकाराच्या टाक्यांमध्ये मधोमध एक दगडाचा स्तंभ दिसतो. याचा उपयोग पाण्याच्या टाकीची पातळी मोजण्यासाठी केला जात असावा. गडावरील पाण्याची टाकी कधीही सुरुंग लावून फोडली जात नाहीत. उलट युद्धजन्य परिस्थितीमध्ये पाणी खूप जपून वापरले जात असे. गडावरील पाणी किती प्रकारे अडवले जाते. याचे उत्तम उदाहरण आपल्याला मुल्हेर गावाजवळील हारगड या किल्ल्यावर दिसून येते. हारगड या ४५० मि. उंच असलेल्या किल्ल्याचा माथा सपाट नाही. किल्ल्याच्या दक्षिणेकडील उतारावर गडमाथ्याच्या साधारणतः ३५ फूट खाली नाळेमध्ये भिंत बांधून पाणी अडविले आहे. गडावरील या दोन नाळावाटे पावसाळ्यात पाणी गडाखाली वाहून जात असे. हे पाणी अडवून येथे तलाव बांधलेले आहेत. अशाच प्रकारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हनुमंतगड या गडावरदेखील पाणी अडवून चार तलाव बांधले आहेत. या सर्व गोष्टींवरून असे लक्षात येते की, पाण्याशिवाय दुर्ग वसवता येऊ शकत नाहीत. याच गडकिल्ल्यांवरील पाण्याची टाकी व तलाव यातील गाळ काढून त्याचे पुनरुज्जीवन केले तर त्या परिसरातील काही गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल.



**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)**

**संपर्क : ०९८२२१०९३६२**

# काळजी स्वतःची, हमी आरोग्याची

संपूर्ण राष्ट्रीय आरोग्याच्या दृष्टीने महिलांच्या आरोग्याचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. सुदृढ समाजासाठी महिलांचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे. आपल्या कुटुंबाच्या प्रत्येक गरजांकडे आणि त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणाऱ्या महिला स्वतःच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करतात. मुलगी जन्मल्यापासून तिची काळजी घेतली तर पुढे अनेक समस्या उद्भवणार नाहीत.

**सकस आहार आवश्यक**

बालपणी मिळणारा योग्य पोषक आहार महिलेचे पुढील आरोग्य ठरवत असतो. मासिक पाळी मातृत्व आणि त्याअनुषंगाने येणाऱ्या विविध आजारांवर मात करायचे झाल्यास लहानपणी सकस आहार मिळणे आवश्यक आहे. आपल्याकडील विशेषत: ग्रामीण आणि आदिवासी भागातील गरोदर महिलांची स्थिती खूपच बिकट आहे. गरोदर मातेलाच सकस आहार मिळत नसल्याने गर्भाचे नीट पोषण होत नाही आणि कमी वजनाचे आणि कुपोषित बालक जन्माला येते. त्याची वाढ त्याच पद्धतीने होत असल्याने या दुष्टचक्रात महिलांचे आरोग्य अडकते. ग्रामीण आणि आदिवासी महिलांना सकस आहार मिळावा, यासाठी राज्य आणि केंद्र शासनाने विविध योजना सुरू केल्या आहेत. कार्यकर्त्यांतर्फे त्या पोहोचवण्यात येत आहेत. सरकार गेली ५० वर्षे महिलांसाठी लोहाच्या आणि कॅल्शियमच्या गोळ्या वाटते. तरी त्यांच्या संपूर्ण समस्या सुटल्या असे म्हणता येणार नाही. हे सर्व थांबवायचे असेल तर महिलांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर त्यांच्या आरोग्याविषयी जागृती निर्माण करावी लागेल.

घरातील गृहिणींचे आरोग्य जर उत्तम असेल तर ती इतरांकडे नीटपणे लक्ष देऊ शकते; परंतु ती स्वत: काही समस्यांनी त्रस्त झाली असेल तर संपूर्ण कुटुंबच अस्वस्थ होते. हा सर्वांचा अनुभव आहे. महिलांची मानसिकता बऱ्याचदा रोग अंगावर काढण्याची असते. तो बळावला तर त्या वैद्यकीय सल्ला घेण्यास तयार होतात. त्याही दृष्टीने त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. गरोदर महिलेचे उत्तम पोषण होण्यासाठी ग्रामीण भागात अंगणवाड्यांमधून मिळणारा आहार विशेषत: गायीच्या तुपाने युक्त असावा. तो ठरवताना भारतीय आहारशास्त्राचे सिद्धांत विचारात घ्यावेत.



**बदलत्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत महिलांचे आरोग्य आणि त्यातून उद्भवणाऱ्या विविध समस्या वेगवेळया बनल्या आहेत. एकीकडे गरिबीमुळे पोषक आहाराचा अभाव आणि दुसरीकडे फास्ट फूडच्या अतिसेवनामुळे आलेली स्थूलता. कमी वयात होणाऱ्या लग्नांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्याचवेळी उशिरा होणाऱ्या लग्नामुळे होणाऱ्या समस्या अशा विरोधाभासात महिलांच्या आरोग्याचा विचार करावा लागेल. महिला आरोग्याचा विचार करताना मुलगी, युवती, माता आणि रजोनिवृत्तीनंतर येणाऱ्या समस्यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे महिलांनी स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे. याविषयी सांगताहेत जे. जे. रूग्णालयाच्या स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. रेखा डावर.**

**वयाच्या विविध टप्प्यांवर घ्या काळजी**

पुरुषांपेक्षा महिलांचे आरोग्य खूप जटिल असते. तिच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या समस्या येतात, त्यामुळे त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. वय वर्षे ० ते १२ पर्यंत मुलींच्या वाढीकडे लक्ष द्यायला हवे. त्यासाठी सकस आहार, छोट्यामोठ्या आजारांकडे दुर्लक्ष न करणे, मासिक पाळी सुरू झाल्यावर शरीराची स्वच्छता, गर्भधारणा आणि लैंगिक शिक्षण यांविषयी माहिती करून देणे आवश्यक असते. त्यानंतर गर्भधारणा व्यवस्थित आणि माता-बालकाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी आहार, त्यात घ्यायची काळजी, बालसंगोपनात घ्यायची काळजी आणि रजोनिवृत्तीनंतर हार्मोन बदलामुळे होणारी चिडचिड आणि कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडांचा ठिसूळपणा आणि त्यामुळे निर्माण होणारी सांधेदुखी यांचा विचार करून आहार आणि विहाराचा समन्वय राखला पाहिजे.

विशेषतः ३० ते ५० वयोगटातील स्त्रियांना त्यांच्या आरोग्याबाबत अधिक सजग राहण्याची गरज असते; पण हा काळ म्हणजे स्त्रिया मुलांचे संगोपन, घरची जबाबदारी, नोकरी या सगळ्यांमध्ये इतक्या अडकून जातात की, त्यांना स्वतःकडे लक्ष देण्यास वेळच उरत नाही. छोटी-छोटी आजारपणे अंगावर काढून त्या भविष्यातील मोठ्या आजारांना आमंत्रण देत असतात, हे त्यांच्या लक्षातच येत नाही. या वयोगटातील स्त्रियांनी आरोग्य कसे जपावे याबद्दलची माहिती आपण जाणून घेणार आहोत.

**वय वर्षे ३० ते ४०**

महिलांच्या आयुष्यातील ३० ते ४० वर्षांचा काळ म्हणजे सर्वसाधारणपणे लग्नानंतर एखादे अपत्य झाल्याचा काळ असतो; पण आजकाल नोकरी आणि करियरच्या नावाखाली पहिली काही वर्षे अपत्य होऊ न देण्याकडेच स्त्रियांचा कल असतो. महिलांमध्ये ३० वर्षांपर्यंत हार्मोन्स व्यवस्थित असतात. मात्र त्यानंतर हार्मोन्स कमीजास्त होण्यास सुरुवात होते. त्यामुळे ३० वर्षांपर्यंत अपत्यप्राप्तीसाठी पहिली संधी घेणे हे अधिक श्रेयस्कर ठरते. मूल झाल्यानंतर जी काळजी घेणे आवश्यक असते, ते अनेक स्त्रियांच्या बाबतीत घडताना दिसत नाही.



यामुळे वजन वाढणे त्याशिवाय काही शारीरिक व्याधीही जडतात. त्यामुळे महिलांनी वेळ न दवडता योग्य तो निर्णय घेण्याची गरज असते.

## नियमित तपासणी

चाळिशीनंतर विशेषतः पाळी बंद झाल्यानंतर कॅन्सरसारखा रोग होण्याचा धोका वाढतो. गर्भाशय मुखाचा कॅन्सर हासुद्धा चाळिशीनंतर होणारा एक आजार आहे. त्यामुळे महिलांनी नियमितपणे शरीराच्या तपासण्या करणे हाच सल्ला डॉक्टर्स देतात. त्याशिवाय अलीकडे या कॅन्सरवर एक लसही निर्माण झाली आहे.



# निरामय

साधारणपणे लग्नाच्या आधी ही लस घेतल्यास गर्भाशय मुखाचा कॅन्सर होण्याचा धोका ८० टक्क्यांपर्यंत टळतो.

आजच्या स्त्रियांवर मानसिक, शारीरिक आणि आर्थिक जबाबदाऱ्या असतात. स्त्रिया संपूर्ण कुटुंबाची काळजी घेतातच. परंतु स्वत:कडे बरेचदा दुर्लक्ष करतात. स्त्रियांनी कुटुंबाबरोबर स्वत:ची काळजी घेणे आवश्यक आहे. कुटुंबाची काळजी आणि स्वत:चे आरोग्य याचा समतोल राखला जाणे गरजेचे आहे.

**आजकाल पाठदुखी, कंबरदुखी असा त्रास होत असल्याचे वारंवार आपल्या कानावर येते. ही समस्या सततच्या बैठ्या कामामुळे होते. अशा वेळी व्यायाम करणे हा उत्तम उपाय होऊ शकतो. कुठल्याही वयोगटातील स्त्रियांसाठी व्यायाम हा एक चांगला उपचार असतो. रोज सकाळी चालणे, धावणे, योगा, मार्गदर्शकांच्या नजरेखाली व्यायाम या गोष्टी आरोग्यासाठी आवर्जून कराव्या. किमान ३५ ते ४० मिनिटे चालणे आवश्यक असते. रक्तदाबाचे त्रास, हृदयरोग यांसारखे आजारही आजकाल लहान वयातच महिलांना होतात. त्यासाठी मानसिक त्रास अधिक कारणीभूत असतो. असा त्रास असणाऱ्या महिलांना गर्भारपणात खूप काळजी घ्यावी लागते, कारण पुढचे धोकेही ओघाने येतात.**

## स्त्रियांसाठी असलेल्या काही विशेष योजना

शासनाने दोन विशेष योजना मातांसाठी अंमलात आणल्या आहेत. मातृत्व अनुदान व जननी सुरक्षा या दोन योजना गावागावात राबवल्या जात आहेत. मातृत्व अनुदान योजनेंतर्गत मातांना ४०० रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. जननी सुरक्षा योजनेंतर्गत मातेला ६०० रुपयांचे अनुदान देण्यात येते. खेड्यापाड्यात राहणाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे.

## वेळीच सल्ला घ्या

अंगावरून पांढरे जाणे अर्थात श्वेतपदर ही समस्या अनेक मुलींमध्ये असते; पण त्या गोष्टीचे गांभीर्य अनेकींना नसते. ही समस्या मुख्यत्वे संसर्गामुळे होते. वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेऊन ही समस्या सोडवावी. अन्यथा त्याचेही गंभीर परिणाम होऊ शकतात.

### मानसिक आधाराची गरज

**महिलांच्या समस्येबाबत घरातील लोकांना खूप थोडी माहिती असते. मुलीला आपली आई इतकी काळजी का करते आहे, याचे कारण उमगत नाही. नवऱ्याला आपली पत्नी विनाकारण चिडचिड का करते आहे, हे कळत नाही. खरे तर मेनोपॉजच्या काळात महिलांना मानसिक आधाराची गरज असते. घरच्यांनी अधिक समजूतदारपणे वागले, तर ही समस्या उद्‌भवणारच नाही. डॉक्टरांकडे उपचारासाठी येणाऱ्या बहुतांशी महिला आपल्या घरच्यांना या गोष्टींची माहिती नसल्याचे सांगतात. अशा वेळी कुटुंबीयांना समजावून सांगण्याची मागणी महिला करतात. अनेक सुशिक्षित घरांमध्येही या गोष्टींबद्दल अज्ञान असते.**

**शब्दांकन: प्रवीण कुलकर्णी**



# अद्भुत लोणार...

**जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर असलेले लोणार हे ऐतिहासिक व प्राचीन परंपरा लाभलेले शहर आहे. येथील सरोवराचे पाणी अत्यंत खारट व मचूळ आहे. मात्र काठावरील व आजूबाजूच्या विहिरींमधील पाणी गोड आहे. खरे तर हे जगाला पडलेले एक कोडे आहे. सरोवराच्या पाण्यात आढळणारे क्षार, मीठ आणि अन्य पदार्थ अन्यत्र कोठेही न सापडणाऱ्या प्रकारचे आहेत. त्यामुळे येथे संशोधक, पर्यटक व भाविकांची दररोज प्रचंड गर्दी असते. सरोवरासोबत या परिसरातील प्राचिन मंदिरे, अखंड जलधारा असलेली गोमुख धार, येथील दैत्यसूदन मंदिर, हनुमान मंदिर पर्यटकांसाठी एक पर्वणी आहे. अननस व पपईचे चिप्स या नैसर्गिक नाश्त्याचा आनंद घेत लोणारचा परिसर व येथील शिल्पकलेचे नमुने डोळ्याचे पारणे फेडतात. त्यामुळे या अद्भुत सरोवराची सैर एकदा करायलाच हवी...**

विवेक चांदूरकर

खाऱ्या पाण्याचे सरोवर सुरुवातीपासून सर्वांसाठी एक कोडे होते. पूर्वी विज्ञान प्रगत नसल्यामुळे याचा नेमका उलगडा होऊ शकला नाही. परिणामी अनेक दंतकथांनी जन्म घेतला. विविध ग्रंथांमध्ये याबाबत कथा सांगण्यात आल्या आहेत. सरोवरातील पाणी, क्षारापासून विविध व्यवसाय उपलब्ध झाल्याने मोठी बाजारपेठ तयार झाली व लोकवस्तीही वाढत गेली. पुरातन काळापासून लोणार येथे मोठी बाजारपेठ होती. त्यामुळे या समृद्ध शहरावर अनेक आक्रमणे झाली. यामुळे इतिहासात रंजकता येत गेली व लोणारचा इतिहास समृद्ध झाला. बेसॉल्ट खडक रचना असलेल्या प्रदेशातील अशा स्वरूपाचे हे जगातील एकमेव विवर असावे. जगातील उल्कापाषाण पतनामळे निर्माण झालेल्यांमध्ये हे तिसऱ्या क्रमांकाचे मोठे विवर आहे. या विवरात दडला गेलेला उल्कापाषाण साधारण ६०० मी. खोलीवर रुतून बसला असावा, असा अंदाज आहे.

### सरोवराचा वैज्ञानिक इतिहास

जगभरातील संशोधकांनी या सरोवराचा अभ्यास केला असून आता या सरोवराविषयी मोठ्या प्रमाणावर माहिती समोर आली आहे. या सरोवरावर इंग्रजांपासून विविध देशातील संशोधकांनी बरेच संशोधन केले. तरी संशोधकांमध्ये सरोवराच्या निर्मितीबद्दल एकमत नाही. सरोवराच्या निर्मितीबद्दल दोन मतप्रवाह आहेत. काही संशोधकांच्या मते आकाशातून एक मोठी उल्का पडल्यामुळे हे विवर तयार झाले तर काहींच्या मते ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे तयार झाले. नासा, इस्त्रो यासह जगभरातील संशोधकांनी याचा अभ्यास केला आहे. प्रत्येकाने वेगवेगळी मते मांडली. यातील पाणी खारे का आहे, यावरदेखील संशोधकांमध्ये एकमत नाही. लोणार विवर किती जुने आहे, ते कोणत्या प्रकारचे आहे, चंद्र व मंगळावरील विवराचे लोणार विवराशी संबंध आहेत काय, हे प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहेत. जिऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाचे गिल्बर्ट यांनी उल्कापातामुळे होणारे विवर व लोणार सरोवर यातील साम्य दाखवून हे विवर उल्कापातामुळेच तयार झाले, असा दावा केला. या पाण्यात सल्फाईड आहे. अनेक संशोधकांनी विविध प्रकारे सरोवर निर्माण होण्याची व यातील पाणी खारे होण्याची कारणे सांगितली आहेत.

### पौराणिक इतिहास

ऋग्वेदापासून तर भागवत पुराणापर्यंत अनेक ग्रंथामध्ये लोणारचा उल्लेख आढळतो. सत्ययुगात कश्यप नावाचे एक ऋषी होते. त्यांना १३ पत्नी होत्या. त्यांच्यापैकी दिली नावाच्या पत्नीला गयासूर, कोल्हासूर व लवणासूर ही तीन मुले झाली. तिघांनी महादेवाची आराधना केली. महादेव प्रसन्न झाले व त्यांनी या तिघांनाही अतिशय कठीण परिस्थितीतच मृत्यू येईल, असा वर दिला. वर मिळाल्यावर या तिघांचाही उत्पाद वाढला. त्यामुळे ब्रम्हदेवाने बिहार येथील ब्रम्हगया येथे गयासुराचा वध केला. कोल्हासुराचा वध रुद्राने रूद्रगया येथे केला. ही वार्ता लवणासुराला कळताच तो पळून लोणार येथे आषाढा व

कऱ्हाडा या दोन बहिणींसह आला व एक विवर खोदून त्यामध्ये राहायला लागला. येथेही ऋषी मुनींना त्रास द्यायला सुरुवात केली. त्यामुळे विष्णूने लवणासुराच्या वधासाठी बालरूप धारण करून पायाच्या अंगठ्याच्या नखाने विवरावरील झाकण उडवले. विष्णूने लवणासुराच्या नाभिस्थानी पायाच्या नखाने पोटात छिद्र पाडून लवणासुराचा वध केला. विष्णूच्या अंगठ्याला लागलेले रक्त धुण्याकरिता गंगा भागवती अवतरली, अशी आख्यायिका आहे. अजूनही सरोवराच्या वरच्या भागाला अखंड पाणी सुरू असलेली गोमुख धार आहे. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची संख्या वाढल्याने येथे काही खोल्यांचेही बांधकाम करण्यात आले. येथून पायऱ्यांद्वारे खाली उतरल्यास महादेवाचे प्राचिन मंदिर आहे. या मंदिरासमोर अखंड जल बरसणारी पाण्याची दुसरी धार आहे. येथे सीतेने आंघोळ केल्यामुळे याला सीता न्हाणी म्हटले जात असल्याचे रूढ आहे. त्यानंतर आणखी खाली गेल्यावर एक महादेवाचे मंदिर आहे. येथून दोन किलोमीटर गेल्यावर मंगळसा देवीचे मंदिर आहे. सरोवराच्या सभोवताली अनेक प्राचीन मंदिरे आहेत. तसेच सरोवराजवळ एक झोपलेल्या हनुमानाची मूर्ती आहे. ही मूर्ती चुंबकीय असल्याचे सांगण्यात येते. लवणासूर राक्षसाच्या नावावरून लोणार असे नाव पडले, असे सांगण्यात येते.









## मूर्तिकला व स्थापत्य शैलीचा अद्‌भुत नमुना : दैत्यसूदन मंदिर

शहराच्या मध्यभागी सतराव्या शतकात उत्खननात एक भव्य मंदिर सापडले. या मंदिरावरील प्रत्येक दगड कोरला आहे. मूर्तिकला व स्थापत्य शैलीचा एक अद्‌भुत नमुना म्हणजे दैत्यसूदन मंदिर आहे. हिंदू धर्मातील कथा, भागवत कथा, रामायणातील अनेक प्रसंग या मंदिरावर कोरले आहेत. १८७८मध्ये मातीच्या टेकडीचे उत्खनन करीत असताना या मंदिराचा शोध लागला. मंदिराला तीन प्रवेशद्वार असून, मुख्य प्रवेशद्वार उत्तरेकडून आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स. १२४१ पूर्वी झाले आहे. चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा म्हणजे विजयादित्य याने त्याच्या पत्नीच्या लोकपालदेवीच्या आग्रहास्तव त्रिभुवनकीर्ती नावाच्या एका शिल्पतज्ज्ञाच्या आराखड्यानुसार हे मंदिर बांधले. हे हेमाडपंथी मंदिर नसून, द्रविडी मंदिर आहे.

## मूर्ती, शिल्प व शिलालेख

लोणार येथे पावलोपावली पुरातन दगड, मूर्ती आढळतात. दैत्यसूदन मंदिरालगत असलेल्या एका छोट्या मंदिरात तीन मूर्ती ठेवलेल्या आहेत. एकाच दगडामध्ये या तीन मूर्ती कोरलेल्या आहेत. यापैकी एक ब्रम्हदेवाची असून, एक विष्णू व तिसरी मूर्ती गरुडाची आहे. ब्रम्हदेवाची मूर्ती सहसा कुठेच आढळत नाही. येथे गोमुख धार, पापारा धार, तसेच सरोवरातील मंदिर, दैत्यसूदन मंदिर या ठिकाणी भिंतीवर खांबावर, पायऱ्यांवर विविध शिल्पे कोरली आहेत. हे शिल्प नसून, साक्षात जागृत इतिहासच आहे. यामध्ये पुराण, भागवत, महाभारत, रामायणातील अनेक प्रसंग जिवंत करण्यात आले आहेत. दैत्यसूदन मंदिराच्या चौथऱ्यावरील पायरीवर एक मराठीत शिलालेख लिहिला आहे. मंदिराच्या दुसऱ्या पायरीवर हा शिलालेख असून, सध्या तो पुसटसा दिसतो. हा शिलालेख देवगिरीचे यादव कृष्णदेव यांनी कोरला असून, यावर त्यांच्या व चक्रधर स्वामीदरम्यान झालेल्या भेटीची माहिती आहे. अन्य एक शिलालेख हा या मंदिराच्या बाजूलाच असलेल्या एका खोलीमध्ये दगडावर कोरला आहे.

**(लेखक हे विदर्भातील पर्यटन स्थळाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९५५२८४७०९२**

| कसे जाल ? | जवळचे रेल्वे स्थानक | जवळचे विमानतळ | निवास व्यवस्था | गाईड |
|---|---|---|---|---|
| लोणार हे बुलढाणा जिल्ह्यात असून, संत गजानन महाराजांचे शेगाव येथून ११३ किमी अंतरावर आहे. तसेच बुलढाणा येथून ७९ किमी अंतरावर आहे. अकोला व वाशिमवरूनही बसने जाता येते. | जालना येथे रेल्वे स्थानक असून, येथून लोणार ९० किमी आहे. जालनावरून लोणारसाठी एस.टी.बस व खासगी वाहने भाड्याने मिळतात. | औरंगाबाद येथील विमानतळापासून लोणार १६० किमी अंतरावर आहे. येथून लोणारसाठी एसटी बस उपलब्ध असते. | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रशस्त विश्रामगृह आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह तसेच खासगी हॉटेलदेखील आहेत. | लोणारचे दर्शन करण्याकरिता येथे गाईड आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या संकेतस्थळावरून राहण्याचे व गाईडचे बुकिंग करता येते. |

# प्रशासनाला महिलाशक्तीची गरज

**महिला प्रशासनात प्रभावी भूमिका बजावत आहेत. उत्तम प्रशासनासाठी आवश्यक असलेले कार्यतत्पर, प्रामाणिक, संवेदनशील, वक्तशीर आदी सर्वच गुण महिलांमध्ये असल्याने भ्रष्टाचारमुक्त कारभारासाठी त्यांनी प्रशासनात यायला हवे, असे आवाहन करणाऱ्या महिला आयएएस विजया जाधव यांनी लोकराज्यशी संवाद साधला. महिलांची प्रशासनात गरज असून यूपीएससीची निवड प्रक्रिया महिलांसाठी पोषक असल्याचे सांगत त्यांनी आपला यशापर्यंतचा प्रवास उलगडला...**



**विजया जाधव**
साहाय्यक जिल्हाधिकारी,
झारखंड, भा.प्र.से. (२०१४)

आपल्या हातून खूप लोकांचे भले व्हावे असे वाटत असेल तर यूपीएससीसारखा कोणताच चांगला पर्याय नाही. नागरी सेवा परीक्षेच्या तयारीसाठी मला लहानपणापासून पोषक वातावरण मिळाले. आईवडलांनी नागरी सेवेत येण्याचे स्वप्न दाखवले. त्यामुळे माझी या परीक्षेची तयारी अप्रत्यक्षरीत्या शालेय शिक्षणापासूनच सुरू झाली होती. मी आणि लहान भाऊ-बहीण अशी आम्ही तीन भावंडे. लोकसत्ताचे किशोरकुंज, वृत्तपत्रीय वाचनाची सवय आईने बालपणीच आमच्यात रुजवली. याचा प्रभाव असा की लहान बहीण कावेरी जाधव महाविद्यालयीन शिक्षण विशेष प्रावीण्यासह पूर्ण करून प्राध्यापक झाली तर भावाने अभियांत्रिकीमध्ये पदवी मिळवली. मला दहावीनंतर चांगले गूण होते. सायन्स घेऊन डॉक्टर, इंजिनीअरच्या वाटेने सहज जाता आले असते. परंतु माझे ध्येय स्पष्ट आणि तेवढेच ठाम होते.

### यशाची शिडी

बी.ए.ला असतानाच यूपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. दरम्यान भारतीय रिझर्व्ह बँकेचा व्यवस्थापकपदाचा कॉल आला. यासाठी झालेल्या परीक्षेत माझा देशात चौथा क्रमांक आला होता. या बँकेच्या हैदराबाद येथील कार्यालयात मुद्रा विभागात मी रुजू झाले. दरम्यान आरबीआयचे तत्कालीन गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी हैदराबाद कार्यालयास भेट दिली. ते १९६४ च्या बॅचचे भारतीय प्रशासन सेवेचे अधिकारी आहेत. आयएएस अधिकारी गव्हर्नरपदी नियुक्त होत असल्याचे मला कळले. भारतीय प्रशासन सेवा मला वेळोवेळी खुणावतच होती. यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी दीड महिना सुटी घेतली. दुसऱ्या प्रयत्नात भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) मिळाली. रिझर्व्ह बँकेतून कार्यमुक्त होऊन मी राजस्व सेवेत रुजू झाले. मुंबई-फरिदाबाद येथे प्रशिक्षण पार पडले. या निवडीच्या कराराप्रमाणे दोन वर्षे पुन्हा परीक्षेला बसता आले नाही. बडोदा येथे नियुक्ती मिळाली. दरम्यानच्या काळात मात्र माझा अभ्यास सुरू होता.

परीक्षेच्या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास केला. २०१३ च्या परीक्षेसाठी नियोजनबद्ध अभ्यास केल्यामुळे पूर्व, मुख्य परीक्षा आणि मुलाखत अशा तिन्ही पातळ्यांवर यश मिळवले. २०१४ मध्ये आलेल्या या निकालात ४१८ वी रँक मिळाली. मी आयएएस झाले.

### यशाचे श्रेय आईवडलांना

सांगली जिल्ह्यातील वाळवा हे आमचे मूळ गाव. मात्र वडील नारायणराव जाधव पोलीस दलात अधिकारी असल्याने कुटुंब पुण्यात स्थिरावले. वडलांमुळे प्रशासन बऱ्यापैकी कळले. वडलांनासुद्धा यूपीएससीची परीक्षा द्यायची होती. त्यांचा अभ्यासही होता. परंतु वयोमर्यादा आड आल्याने ते शक्य होऊ शकले नाही. मात्र चांगला अधिकारी त्यांनी सदैव माझ्या डोळ्यासमोर ठेवला. वेळोवेळी कर्तबगार अधिकाऱ्यांची ते उदाहरणे देत असत. आईनेदेखील घरातील एखादे काम न लादता माझे वाचन, अभ्यास अधिक कसा होईल, याचीच काळजी घेतली.

प्रशासनात येण्याचा निर्णय पक्का असल्याने मी दहावीनंतर फर्ग्युसन कला महाविद्यालयात प्रवेश घेतला. बी.ए. ला असताना तेव्हाचे पुण्याचे मनपा आयुक्त अरुण भाटिया यांनी अतिक्रमण विरोधी मोहीम प्रभावीपणे राबवली होती. त्यांना राजकीय वर्तुळातून मोठ्या प्रमाणावर विरोध झाला होता. त्यांची बदलीही करण्यात आली. परंतु त्यांच्या चांगल्या कामामुळे लोक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. जनहित याचिका दाखल केली गेली. त्यांची बदली शासनाला रद्द करावी लागली. दरम्यान 'लोकप्रशासनातील जबाबदाऱ्या आणि अडचणी' या विषयावर श्री. भाटिया सरांनी आमच्या महाविद्यालयात आम्हाला मार्गदर्शन केले होते. त्यामुळे उत्तम प्रशासकाची छबी मनावर कायमची बिंबवली गेली. त्यानंतर बी.ए. च्या दुसऱ्या-तिसऱ्या वर्षाला असतानाच मी यूपीएससीच्या नियोजनबद्ध तयारीला लागले होते.

### अभ्यासाचा फार्म्युला

या परीक्षेसाठी कसलाही शिकवणी वर्ग न लावता मला यश मिळवता



आले. बहुधा कसल्याही परीक्षेच्या दृष्टीने मला येथे सांगावेसे वाटेल की, शिकवणी लावलीच पाहिजे हा ग्रह सर्वांनी मनातून काढून टाकावा. वर्गात शिकवत असताना लक्ष न दिल्यास तेच पुन्हा शिकण्यासाठी शिकवण्या लावाव्या लागतात. त्यामुळे शिकवताना लक्ष दिल्यास जवळपास ८० टक्के लक्षात राहते व घरी त्याचा अभ्यास केल्यास कसल्याही परीक्षेची तयारी पूर्ण होते.

प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण चांगले झाले तर स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे सोपे होते. तरी अभ्यासक्रम लक्षात घेऊन सात-आठ महिने दररोज दहा-बारा तास नियोजनबद्ध अभ्यास केल्यास कुणालाही परीक्षेत यश मिळवता येणे शक्य आहे. या अभ्यासाच्या एकूण वेळात गटचर्चा, वृत्तपत्रीय वाचन आदी अभ्यास पद्धतींचा समावेश असावा. दूरचित्रवाहिन्यांवरील मालिकापासून दूर राहायला हवे. दररोज न चुकता



महत्त्वाची दैनिके वाचल्यास खूप ज्ञान मिळते. संपूर्ण वृत्तपत्र न वाचता महत्त्वाचे तेवढेच वाचावे. जसे संपादकीय, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आदी. यातील घटना, बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास करावा. प्रत्येक घटनेकडे तुलनात्मक दृष्टीने बघण्याचा दृष्टिकोन विकसित करून सदैव सकारात्मकता अंगी बाळगायला हवी. एनसीइआरटीच्या पुस्तकांसह दर्जेदार साहित्य वाचावे.

## निबंधलेखन

सामान्य अध्ययनातील नीतिमूल्ये, निबंध व वैकल्पिक विषय गेम चेंजर असतात. अनेकजण सराव न करता परीक्षेत पहिल्यांदा निबंध लेखन करतात. आयएएस टॉपर्स निबंधलेखनामुळे अधिक गुणांची कमाई करताना दिसतात. त्यामुळे आठवड्याला किमान एक तरी निबंध लिहावा. त्यात वस्तुनिष्ठ माहिती, आकडेवारी, संबंधित विषयासंदर्भात देशविदेशात काही चांगले नियम कायदे आहेत काय आदींच्या दृष्टीने तुलनात्मक लिखाण करावे. भाषा ओघवती असावी.

## मुलाखत

मुलाखतीच्या बाबतीत इंग्रजीचा बाऊ करण्याचे कारण नाही. परीक्षा व मुलाखत आपण आपल्या भाषेत देऊ शकतो. ही संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची चाचणी असते. मुलाखत घेणारे अधिकारी खूप वरिष्ठ असतात. त्यांचे सहकार्यदेखील मिळते. आपल्यातील नेतृत्वगुण, चुणूक, आपला दृष्टिकोन तपासला जातो. सामान्य ज्ञान बाजूला ठेऊन आपल्या बायोडेटासंबंधी प्रश्न विचारले जातात. त्यामुळे स्वत:ला व्यक्त करणे आणि उत्तरात प्रामाणिकता असणे महत्त्वाचे ठरते.

### यशाची सूत्रे

- जुन्या प्रश्नपत्रिका सोडवाव्या. यशस्वी विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकांतील उत्तरांची शैली, मांडणी लक्षात घ्यावी.
- नियमित वृत्तपत्र वाचन तुलनात्मकदृष्ट्या करावे.
- कसलीही शिकवणी न लावता सुसूत्रता, नियोजबद्ध अभ्यास, उजळणी, स्वत:च्या नोट्स काढून तयारीत शिस्त ठेवली तर या परीक्षेत यश मिळवता येते.
- ऑप्शनल विषय निवडताना महत्त्वाचे आणि नेहमीचे विषय घेतलेच पाहिजे असे नाही. २२ विषयांपैकी पाली, संस्कृत असा कुठलाही विषय घेऊन चांगले गुण मिळवू शकता.
- सदैव सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.
- अभ्यासक्रम पाठ करा. काहीही वाचताना अभ्यासक्रम लक्षात घेऊन अभ्यास करा.
- आठवड्याला किमान एक तरी निबंध लिहा.
- खूप परिश्रम घ्या.
- अभ्यासासाठी एखादा ग्रुप केल्यास बोलण्याची सवय होते, समोरच्याकडून प्रेरणा मिळते व विविध विषयांचे अनेक पैलू अल्पावधीत कळतात.

***मैत्रिणींनो,***

या परीक्षेत मुलाखतीपर्यंत जाणाऱ्या जवळपास सर्वच मुलींची निवड होते. प्रशासनाला उत्तम प्रशासनासाठी महिला अधिकाऱ्यांची गरज आहे. आपण खूप हुशार असले पाहिजे किंवा महाविद्यालयीन शिक्षणात चांगले गुण घेतले पाहिजेत, हा ग्रह मनातून काढून टाकावा. साधी पदवी पास झालेले कुणीही ही परीक्षा अभ्यासक्रम समजून घेऊन व नियोजनबद्ध अभ्यास करून उत्तीर्ण होऊ शकतो. खूप काम करणे आणि कामावर श्रद्धा असणे ही आपली वैशिष्ट्ये प्रशासनात खूप महत्त्वाची ठरतात. त्यामुळे डगमगून न जाता या परीक्षेची तयारी करावी. शिवाय ज्या मुलींना स्वत:च्या पायावर लवकर उभे राहणे आवश्यक आहे. त्यांनी विविध परीक्षा देऊन लहानमोठ्या नोकरीच्या माध्यमातून स्वत:चा आत्मविश्वास वाढवावा. स्वत:च्या पायावर उभे राहिल्याशिवाय लग्नाचा विचार शक्यतो डोक्यात आणू नका. vijjadhav06.vj@gmail.com या ई-मेलवर आपण परीक्षेसंदर्भातील आपल्या अडचणी मला कळवू शकता.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

# महाराष्ट्र आता जगाची फॅक्टरी

**देशाचा विकास व्हायचा असेल तर तरुणांच्या हाताला काम मिळायला हवे. त्यासाठी देशातील मॅन्युफॅक्चरिंग अर्थात उत्पादन उद्योगाला चालना मिळणे गरजेचे आहे. ही गरज ओळखुनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया'चा नारा दिला. महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे इंजिन आहे. या इंजिनच्या नेतृत्वात देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईला १३ ते १८ फेब्रुवारी दरम्यान पहिला 'मेक इन इंडिया सप्ताह' आयोजित करण्यात आला. या महाउद्योग मेळ्यात अनेक उद्योग समूहांशी सामंजस्य करार करण्याबरोबरच उद्योगपूरक उपक्रम आयोजित करण्यात आले. या आयोजनापूर्वी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा हा गोषवारा...**




**ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत घेताना.**

**'मेक इन इंडिया'विषयी लोकांना प्रचंड उत्सुकता आहे. नेमकं 'मेक इन इंडिया' म्हणजे काय ?**

भारत हा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असला तरी गेल्या २०-२५ वर्षात चीनची जगाची फॅक्टरी म्हणून ओळख होती. मात्र, चीनमध्ये उत्पादनांची निर्मिती न परवडण्यासारखी आहे. तिथल्या अर्थव्यवस्थेत स्टॅग्नन्सी आली आहे. त्यामुळे जग गुंतवणुकीचे एक नवे स्थान शोधत आहे. नेमके हेच ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशात उद्योगांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक गुंतवणूक करीत रोजगार निर्मितीसाठी 'मेक इन इंडिया' कार्यक्रमाची सुरुवात केली. भारताकडे डेमोग्राफी (भौगोलिक परिस्थिती), डेमॉक्रसी (लोकशाही) आणि डिमांड (मागणी) हे तीन डी आहेत. हे तिन्ही डी एकत्र आले तर भारताकडे जगाची फॅक्टरी होण्याची क्षमता आहे. त्यामुळे मा. प्रधानमंत्र्यांनी 'मेक इन इंडिया'चा नारा दिला आहे. मेक इन इंडियाच्या सिंहाची ताकद काय आहे, हे मेक इन इंडिया सप्ताहाच्या माध्यमातून आपण जगाला दाखवणार आहोत.

**मेक इन इंडियाच्या निमित्ताने 'मेक इन महाराष्ट्र' हा आपला प्रयत्न नेमका काय असणार आहे ?**

मेक इन इंडियाची संकल्पना मेक इन महाराष्ट्रशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कारण महाराष्ट्र हे भारताचे पॉवरहाऊस आहे. देशातील मॅन्युफॅक्चरिंग आपल्याला २८ टक्क्यांपर्यंत न्यायचे आहे. त्यासाठी २० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य समोर ठेवले असून त्या दृष्टीने काम सुरू आहे.

**उद्योगस्नेही धोरण...**

इझ ऑफ डुईंग बिझनेस यावर गेल्या एका वर्षात मोठ्या प्रमाणावर काम झाले आहे. नवीन उद्योग सुरू करायचा असल्यास ती प्रक्रिया सुलभ असण्याची गरज आहे. उद्योगांसाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या ७५ वरून ३७ वर व त्यानंतर ३७ वरून २५ पर्यंत खाली आणण्यात आल्या आहेत.


**मेक इन महाराष्ट्रमध्ये मुंबई, पुण्याव्यतिरिक्त राज्यातील इतर उद्योगांना काय स्थान ?**

मुंबई व पुण्याजवळ बंदरे आहेत. त्यामुळे या भागांचा विकास हा झपाट्याने झाला आहे. त्यामानाने उर्वरित राज्यात उद्योगांचे जाळे कमी आहे. येत्या काळात उर्वरित महाराष्ट्र या बंदरांशी जोडण्यासाठी १४ जिल्हे जेएनपीटीशी जोडली जाणार आहे. यासोबतच मुंबई-नागपूर या कम्युनिकेशन एक्सप्रेसवेची निर्मिती केली जाणार आहे. त्यामुळे नागपूरवरून जेएनपीटीला आठ ते दहा तासात तर औरंगाबादवरून चार तासात जेएनपीटीत पोहोचता येणे शक्य होईल. यातून उद्योगपूरक वातावरण निर्मिती होऊन उद्योगांची भरभराट होईल.

**महाराष्ट्राचे स्थान उद्योगात अबाधित राहावे यासाठी शासकीय पातळीवर काही दीर्घकालीन उपाययोजना केल्या आहेत का ?**

महाराष्ट्राचे स्थान उद्योगात अग्रेसर राहावे यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यासाठी प्रत्येक विभागाला केआरए (की रिझल्ट एरिया) देण्यात आला आहे. वर्षाला काय करायचे याचे लक्ष्य देण्यात आले आहे. मुंबईला आंतरराष्ट्रीय फायनान्शियल सेंटर करण्यासाठी अर्थराज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. सेंटरच्या उभारणीसाठी जागा ठरवली आहे. मुंबईला या केंद्राचा फायदा झाल्यास त्याचा निश्चित महाराष्ट्रालाही होईल.

**शब्दांकन: अतुल पांडे**




# मेक इन इंडियात 'महाराष्ट्र अहेड'

मुंबईत झालेल्या मेक इन इंडिया सप्ताहमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित महाराष्ट्र अहेड या मासिकाने देशविदेशातील गुंतवणूकदारांना आकर्षित केले. या सप्ताहाच्या निमित्त महाराष्ट्र अहेडचा विशेषांक प्रकाशित करण्यात आला होता. हा विशेषांक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मॅग्नेटिक महाराष्ट्र या दालनात अग्रभागी ठेवण्यात आला होता. या अंकात महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील प्रगती आणि विकासाची विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

या अंकाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभेच्छा मिळाल्या. औद्योगिक वाढीसाठी महाराष्ट्र शासन करत असलेल्या विविधांगी प्रभावी प्रयत्नांची दखल या अंकात घेण्यात येत असल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेक इन महाराष्ट्रसाठी राज्य शासन करीत असलेल्या विविध योजना, निर्णय, उपक्रम याविषयी दिलेली प्रदीर्घ मुलाखत हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

मुख्यमंत्र्यांनी 'मेक इन महाराष्ट्र' कार्यक्रमाची घोषणा केल्याने त्याची प्रभावी अंमलबजावणी या विषयी महाराष्ट्र अहेडने वेळोवेळी विस्तृत माहिती दिली आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र अहेडने फेब्रुवारी-२०१६ चा अंक 'मेक इन इंडिया वीक' विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला. महाराष्ट्र अहेडचा अंक महाराष्ट्राच्या दालनाला भेट देणाऱ्या प्रत्येकाला आकर्षून घेत होता. मेक इन इंडियाच्या महाराष्ट्रासंदर्भातील चर्चासत्रादरम्यान आणि महाराष्ट्राच्या दालनात या अंकाचे देशविदेशातील शिष्टमंडळाला वितरण करण्यात आले. या अंकाचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले.







व्यासपीठावरून मुख्यमंत्री महाराष्ट्रामध्ये औद्योगिक पार्श्वभूमी कशी उत्तम आहे, हे एकीकडे सांगत असताना या संदर्भातील संपूर्ण लेखाजोखा महाराष्ट्र अहेडच्या माध्यमातून देशविदेशातील शिष्टमंडळांना मिळत होता. या चर्चेसाठी तयार करण्यात आलेल्या माहितीच्या बॅगमध्ये महाराष्ट्र अहेड देण्यात आले होते. देशविदेशातील शिष्टमंडळे, उच्चपदस्थ आणि राज्याराज्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाती हा माहितीचा खजिना अशाप्रकारे गेला. याशिवाय संपूर्ण आठवडाभर महाराष्ट्राची महती सांगणाऱ्या महाराष्ट्र पॅव्हेलियनमधून या अंकाचे वाटप करण्यात आले. या ठिकाणी येणाऱ्या व्यापार, वाणिज्य क्षेत्रातील दिग्गजांच्या हाती हा अंक पडावा, यासाठी येथील कर्मचारी कार्यरत होते.

**टीम लोकराज्य**




महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून आलेल्या माहिती अधिकारी यांच्या कार्यशाळेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले.

# सुसंवादाचा स्मार्ट दुवा

**माध्यमांतील बदलते प्रवाह आणि त्यातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकाऱ्यांसाठी 'माहिती अधिकारी कार्यशाळा-२०१६' चे मुंबईत आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. दोन दिवस चाललेल्या या कार्यशाळेत शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी अधिकाऱ्यांशी साधलेला थेट संवाद, माध्यमांतील आधुनिक तंत्रज्ञान, मुद्रित-इलेक्ट्रॉनिक्स मीडियाबरोबरच सोशल मीडिया, जाहिरात कला आदी विषयांवर तज्ज्ञांनी केलेले मार्गदर्शन कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महत्त्वपूर्ण ठरले.**

**किशोर गांगुर्डे**

कार्यशाळेच्या उद्घाटनाला लाभलेली मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन त्याशिवाय विविध वक्त्यांनी दिलेल्या मोलाच्या सूचनांमुळे कार्यशाळा आयोजनाचा उद्देश निश्चितच सफल झाला.

कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांचे बदलते तंत्र माहिती-जनसंपर्क अधिकाऱ्यांनी आत्मसात करून, सांघिक भावनेने काम करावे आणि जनकल्याणाच्या शासकीय योजना, उपक्रम जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. माहिती व जनसंपर्क विभागाच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध असल्याचीही त्यांनी ग्वाही दिली. शासनाकडच्या संवादाचे माध्यम हा माहिती व जनसंपर्क विभाग असून कार्यशाळेस उपस्थित सगळे शासनाच्या संवादाचे उपकरण आहेत, ज्या माध्यमातून लोकशाहीमध्ये सामान्य माणसाशी आपण संवाद साधत असतो, आणि तो दुतर्फा असतो. बातम्यांच्या संकलनातून सामान्य माणसाच्या मनात काय चाललेय? त्याचे प्रतिबिंब हे आपल्यापर्यंत पोहोचले पाहिजे अशाप्रकारचा प्रयत्नदेखील हा विभाग करत असतो. शासनाचा अत्यंत महत्त्वाचा आणि 'मेक ऑर ब्रेक' अशी शक्ती असलेला फक्त माहिती व जनसंपर्क विभागाच असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

नवीन सरकार आल्यानंतर माहिती व जनसंपर्क विभागाच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या विभागाची क्षमतावाढ करण्याचा प्रयत्न असून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या श्रेणीवाढ करण्याच्या विषयावर शासनाने सकारात्मक निर्णय घेतला आहे. लवकरच यावर अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

माहिती व जनसंपर्क विभाग हा अत्यंत सक्षम असा विभाग असल्याचे विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी सांगितले. महासंचालनालय लोकराज्य मासिकासह 'जय महाराष्ट्र', 'दिलखुलास', 'महान्यूज' आदी विविध माध्यमांचा तसेच सोशल मीडियाचा प्रभावी वापर करीत असल्याचे त्यांनी सांगितले. आकाशवाणीवर सादर होणाऱ्या 'दिलखुलास' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी 'मन की बात' करावी अशी इच्छाही श्रीमती पाटणकर-म्हैसकर यांनी व्यक्त केली.

महासंचालनालयातील अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद होत असतो, मात्र वैयक्तिक पातळीवर संवाद साधत सांघिक बांधिलकी वृद्धिंगत करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी प्रास्ताविकात सांगितले.

कार्यशाळेच्या उद्घाटनानंतरच्या सत्रात दूरदर्शन सह्याद्री वाहिनीचे



**बदलत्या काळामध्ये माध्यमांशी स्पर्धा करताना माध्यमातील स्पर्धा, रोज आत्मसात केले जाणारे बदल आणि त्या पद्धतीने कार्य करण्याचा कित्ता शासकीय माध्यमांनी गिरवणे आवश्यक आहे. माध्यमांशी स्पर्धा करताना पुढच्या काळात या स्पर्धेत निश्चितच उतरावे लागणार आहे.**
**– भरतकुमार राऊत, ज्येष्ठ पत्रकार तथा माजी खासदार**


**जाहिरातीचे तंत्र आणि मंत्र समजून घेताना शासकीय माध्यमांनी सर्वसामान्यांच्या अपेक्षांचा अभ्यास केला पाहिजे. लोकमनाला भिडणारे सादरीकरण करताना सरकार संदर्भात आत्मीयता निर्माण करण्याचे दुहेरी कसबदेखील या प्रयत्नात असावे.**
**– रवी देशपांडे, ज्येष्ठ जाहिरात निर्मितीतज्ज्ञ**






**'अलीकडच्या बार्क पद्धतीमुळे आता ग्रामीण भागातील बातम्यांना प्राइम टाईममध्येही वृत्तवाहिन्यांवर मोठ्या प्रमाणात स्थान मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील विकासवार्तांची व वृत्तांची उपलब्धी बाळगणाऱ्या माहिती व जनसंपर्क विभागाने अशा घटनाक्रमांचा वृत्तांत वाहिन्यांना दिल्यास मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रसिद्धी मिळू शकते.'**
**– निलेश खरे, व्यवस्थापकीय संपादक, 'जय महाराष्ट्र' वृत्तवाहिनी**

उपसंचालक शिवाजी फुलसुंदर आणि 'जय महाराष्ट्र' वृत्तवाहिनीचे व्यवस्थापकीय संपादक निलेश खरे यांनी 'दृकश्राव्य माध्यमे आणि शासकीय योजनांचा प्रसार' या विषयावर मार्गदर्शन केले.




**महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी असून ११ लाख नागरिकांपर्यंत लोकराज्य पोहोचवण्याचे आव्हान माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने स्वीकारावे, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. लोकराज्यमार्फत शासनाच्या योजना, निर्णय, धोरणे थेट लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यास साहाय्य होत असते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाणारे हे एकमेव मासिक आहे. त्याचे वर्गणीदार वाढल्यास शासनाच्या लोकोपयोगी योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.**




त्यानंतर ज्येष्ठ माध्यम सल्लागार तथा माजी खासदार भारतकुमार राऊत यांनी 'बदलत्या काळात शासकीय प्रसिद्धीसमोरील आव्हाने' या विषयावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यानंतरच्या सत्रात मनोज व कांचन चौधरी यांनी 'संकल्पना ते सादरीकरण' आणि जाहिरात निर्मितीतज्ज्ञ रवी देशपांडे यांनी प्रभावी जाहिरात कलेविषयी आणि मानवी अभिरुचीचा स्पर्श लाभलेल्या जाहिरातींविषयी उपस्थितांना माहिती दिली. त्यानंतर वर्षपूर्तीनिमित्त नागपूर–अमरावती विभागात राबवलेल्या प्रसिद्धी मोहिमेबद्दल संचालक मोहन राठोड यांनी सादरीकरण करून राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी राज्याचे शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधला. 'प्रसिद्धी विभागाकडून शासनाच्या अपेक्षा' या विषयावर त्यांनी संवाद साधत अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून बदलत्या माध्यमांना सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाची पुनर्बांधणी आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन विभागाचे डॉ. विश्राम ढोले यांनी 'सोशल मीडिया'च्या बदलत्या तंत्रज्ञानाबद्दल आणि त्याच्या प्रभावाबद्दल माहिती दिली. नंतर मुख्यमंत्री महोदयांचे माध्यम सल्लागार रविकिरण देशमुख, विशेष कार्य अधिकारी केतन पाठक, श्रीमती निधी कामदार, जनसंपर्क अधिकारी हेमराज बागूल यांनी 'माहिती व जनसंपर्क विभाग आणि भविष्यातील आव्हाने' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. दुपारच्या सत्रात स्ट्रेस रिलिज फाऊन्डेशन, पुणे येथील अशोक देशमुख यांनी 'ताणतणावमुक्तीचा' संदेश दिला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये नागपूरचे माहिती संचालक मोहन राठोड, नाशिकचे उपसंचालक सतीश लळीत, प्रदर्शने शाखेच्या उपसंचालक सीमा रनाळकर, वृत्तचित्र शाखेच्या मीनल जोगळेकर वर्ध्याचे जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर, उर्दू लोकराज्यचे संपादक मोहम्मद असलम या अधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.


**(लेखक हे वृत्त शाखेत वरिष्ठ सहायक संचालक आहेत.)**
**संपर्क : ०९९८७१७६४००**



**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता – ४ नियम ८ वा**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–३२ |
| २) | प्रकाशन काल | : मासिक |
| ३) | मुद्रकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| | पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) | संपादकाचे नाव | : चंद्रशेखर ओक |
| | भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| | पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी चंद्रशेखर ओक असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**चंद्रशेखर ओक**
**मुद्रक व प्रकाशक**




**शासनाने घेतलेले निर्णय व योजनांची माहिती तातडीने देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ट्विटर माध्यमाचा अत्यंत प्रभावीपणे वापर करतात. यामुळे नागरिकांना शासनामध्ये चाललेल्या विविध घडामोडींची तत्काळ माहिती मिळते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

कविवर्य कुसुमाग्रज यांचा आज जन्मदिन! ज्येष्ठ गायिका उषाताई मंगेशकर यांना स्व. शाहीर साबळे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करताना यावेळी मनापासून आनंद झाला.

दणदणीत विजयासह ४१ वेळा रणजी चषकाचा मानकरी ठरल्याबद्दल मुंबई संघाचे मन:पूर्वक अभिनंदन !

केंद्रीय मनुष्यबळ मंत्री स्मृती इराणी यांचे प्रभावी भाषण शेअर करताना...

Don't miss watching the truth! - much needed, powerful articulate speech reply by Hon smritiirani ji, to all lies. https://www.youtube.com/embed/3PIGs8NCMWE

नागपूर येथील विभागीय महिला मेळाव्यादरम्यान महिला बचतगटांसाठी शून्य व्याजदराची घोषणा करताना...

Announced loan to women self help groups at 0% interest. Govt to set up malls for their products.1st mall be set up Nagpur

नागपूर पोलिसांनी आयोजित केलेल्या तंत्र टेक प्रदर्शनाला भेट दिल्यानंतर...

Very happy to visit'Tantra Tech Expo'by NgpCityPolice. Great citizen connect as it beautifully exhibits the strength

शिवस्मारकाविषयी बोलताना...

We are committed to work as the Sevaks of Raja Shiv Chhatrapati to give justice to the common man would make his biggest ever memorial.

भारतीय बनावटीच्या रोबोटबद्दल बोलताना...

Made in India, Made by Indians! Congrats T-LManufacturingSoltns for launching1st indigenous robot'Brabo' makeinindia

अमृत योजनेसाठी निधी मंजूर केल्यानंतर...

Govt has sanctioned Rs 200 crore for this developmental projects under -MRUT scheme.

जलयुक्त शिवारसाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने ५५ लाख रुपयांची मदत केल्यानंतर आभार व्यक्त करताना...

Thank you Maharashtra Natural Gas Ltd for the contribution of 55,00,000/- for JalYuktShivar to CM Relief Fund!

## शूरा मी वंदितो...

**शहीद शंकर शिंदे, सुनील सूर्यवंशी व हनुमंथप्पा यांना अभिवादन करताना...**

**Saluting Shaheed Shankar Shinde from Nashik district who sacrificed his life in Kupwara while fighting for nation.**



मेक इन इंडियांतर्गत महाराष्ट्राने आठ लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित केल्यानंतर...

Proud to inform that Maharashtra Govt succeeds to attract investments worth 8 lakh crore in just one week during the makeinindia week!

स्मार्ट शहरांविषयी बोलताना...

SmartCity is about creating strong IT backbone, solid and liquid waste management and simultaneous infra facilities.

आचार्य बालकृष्ण यांच्यासोबत नागपुरात अन्न प्रकिया उद्योग उभारण्यासंदर्भात चर्चा करताना...

Had a good discussion with Patanjali -AyurvedYogpeeth's -Acharya Balkrishna ji to set up a food processing unit at Nagpur. This unit at Nagpur will help farmers of Vidarbha, generating 10000 direct employment; actual production to start within a year.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@ २५१७
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८३५ भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ७४ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th March 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य



सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक